%

## ग्रंथ प्रारंभ

%

# आचार्य श्री कुंदकुंददेवरचितबारसाणुवेक्खा

## मंगलाचरण (छंद गाहा)

णमिऊण सव्वसिद्धे झाणुत्तमखविददीहसंसारे ।
दस दस दो दो य जिणे दस-दो अणुपेहणं वोच्छं ॥ १ ॥

नत्वा सर्वसिद्धान् ध्यानोत्तमक्षपितदीर्घसंसारान् ।
दश दश द्वौ द्वौ च जिनान् दशद्वावनुप्रेक्षणं वक्ष्ये ॥ १ ॥

अन्वयार्थ - (झाणुत्तमखविददीहसंसारे सव्वसिद्धे)उत्तम ध्यानाच्या बलाने दीर्घ संसाराचा नाश करणाऱ्या सर्व सिद्धांना(दस दस दो दो जिणे) चौवीस तीर्थंकरांना (णमिऊण) नमस्कार करून (दस-दो अणुपेहणं वोच्छम्)बारा अनुप्रेक्षांचे–भावनांचे स्वरूप सांगेन.

भावार्थ - आपल्या शुद्ध स्वरूपाचे व स्वभावाचे आणि तत्त्वांचे वारंवार चिंतवन करणे, आत्म्यावर श्रद्धा-ज्ञान-चारित्रपूर्वक संस्कार करणे यासभावना अथवा अनुप्रेक्षा म्हणतात. चिंतन म्हणजे शुद्धात्मतत्त्वाचा प्रतीतिपूर्वक विचार. साधारणपणे चिंतन म्हणजे वारंवार ज्ञानाचे संस्कार. परंतु त्या चिंतनामध्येही विषयाच्या कारणाने विविधता दिसून येते; आ. शुभचंद्र 'ज्ञानार्णव' ग्रंथामध्ये भावनांचे महत्त्व विशद करताना सांगतात[१] -''या बारा भावनांचे वारंवार चिंतन करण्याने जीवामध्ये अनादिकालापासून असणारा कषायरूपी अग्नी शांत होतो; परद्रव्यामध्ये प्रवृत्त होणारा रागही नाश पावतो; तसेंच अज्ञानरूपी अंधःकार नष्ट होऊन सम्यग्ज्ञानाचा उदय होतो. '' म्हणूनच पं. दौलतरामजी छहढालेतील पाचव्या ढालेमधील पहिल्याच श्लोकांत म्हणतात की,''वैराग्य उपावन माई, चिंतै अनुप्रेक्षा भाई'' म्हणजे ह्या "बारा भावना वैराग्य उत्पन्न करण्यामध्ये मातेसमान आहेत. त्याचे चिंतवन करावे." ज्याचे चिंतवन करावे, ध्यान करावे ती गोष्ट त्याप्रमाणे प्राप्त होते[१]. अशुभ ध्यान -

टीप १ - समयसार गाथा १०६ संवराधिकार.

चिंतवनाने कषाय वाढतात, फलतः संसार वाढतो, आकुलता व दुःख वाढते. शुद्ध आत्मस्वरूपाच्या ध्यानाने कषाय घटून रत्नत्र्याची प्राप्ती होते, मोक्षाची व अविनाशी सुखाची प्राप्ती होते. एकाग्र चिंतवन हेच ध्यानाचे लक्षण आहे. एकाग्रता ही श्रद्धेशिवाय होत नाही आणि तेथे स्थिरता चारित्राने होऊ शकते. म्हणून मोक्षास साधनभूत ध्यानामध्ये सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राची एकता असते आणि संसारात कारणभूत ध्यानामध्ये मिथ्या-विपरीत-दर्शनज्ञानचारित्राची एकता असते. धर्म, अनुप्रेक्षा व परिषहजय हे ध्यानाची कारणे आहेत. अनुप्रेक्षेमध्ये ज्ञानाची एकाग्रता प्रधान आहे तर ध्यानामध्ये तीन प्रवृत्तीची एकाग्रता अपेक्षित आहे.

अतएव बारा अनुप्रेक्षाचे मोक्षमार्गामध्ये महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे समग्र जिनशासनामध्ये, पुराणामध्ये सर्वत्र बारा अनुप्रेक्षांचे वर्णन दिसून येते.

अद्धुवमसरणमेयत्तमण्णसंसारलोगमसुचित्तं ।
आस्रवसंवरणिज्जर-धम्मं बोहिं च चिंतेज्जो ॥ २ ॥

अध्रुवमशरणमेकत्वमन्य संसार लोकमशुचित्वम् ।
आस्रवसंवर निर्जरधर्मं बोधिं च चिंतयितव्यम् ॥ २ ॥

अन्वयार्थ - (अध्रुवं असरणं एयत्तं अण्णसंसारलोगं असुचित्तं आसवसंवरणिज्जरधम्मं बोहिं च चिंतेज्जो) अध्रुव, अशरण, एकत्व, अन्यत्व, संसार, लोक, अशुचित्व, आस्रव, संवर, निर्जरा, धर्म आणि बोधी या बारा भावनांचे चिंतवन करावे.

भावार्थ - संयोग आणि रागादि विकारामध्ये रस घेणारा जीव जेव्हा तत्त्वांचे अनुचिंतन करतो तेव्हा त्या सर्वांची असारता, अनित्यता, स्वरूपापासून भिन्नता प्रतीत होते आणि एकत्व, अन्यत्व, आस्रव, संवर, निर्जरा, धर्म व बोधी यांच्या अनुचिंतनामुळे जीव स्वभावसन्मुख होतो, मोक्षमार्गामध्ये स्थिर राहतो. म्हणून या बाराही भावना वारंवार चिंतवन करण्यायोग्य आहेत.

भावना, आराधना, साधना म्हणजे धर्मभावना, ज्ञानानंदस्वरूप आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाची आराधना, आणि त्याचीच साधना हे धर्माचे तीन सोपान, पायऱ्या आहेत. म्हणून जो शुद्ध आत्मस्वरूपाची साधना करतो तोच खऱ्या अर्थाने साधु आहे. साधूंना सहजच या बारा भावनांचे चिंतवन असते.

अनित्यानुप्रेक्षा (उग्गाहा)

वर-भवण-जाण-वाहण-सयणासण देवमणुवरायाणं ।
मादुपिदुसजनभिच्चा-संबंधिणो य पिदिविर्याणिच्चा ॥ ३ ॥

वरभवन-यान-वाहन-शयनासनं देवमनुजराज्ञाम् ।
मातृ-पितृ-सजन-भृत्या-संबंधिनो या पितृव्याश्च अनित्याः ॥ ३ ॥

अन्वयार्थ - (देवमणुजरायाणं) देव, मनुष्य आणि राजांचे (वरभवणजाणवाहनसयणासण) श्रेष्ठ महाल, पालखी, वाहन, शय्या, सिंहासन (मादुपिदुसजणभिच्चा संबंधिणो य पिदिविया अणिच्चा)माता-पिता, स्वजन-नातलग, नोकरचाकर, संबंधी आणि पितृपक्ष आदि सर्वच अनित्य आहेत. यापैकी कोणीही शाश्वत, टिकाऊ नाही. म्हणून ते निश्चयाने क्षणभंगुर आहेत.

भावार्थ - जे उत्पन्न झालेले आहे ते नियमाने नाश पावते व जे उत्पन्न होत नाही ते स्थायी - अविनश्वर असते. प्रत्येक वस्तु द्रव्यगुणपर्याय या स्वरूपाची आहे. पुद्गल सोडून चार अजीव अमूर्त द्रव्यामध्ये साधारणतः जीवांची प्रीति नसते. संसारी जीवांना एकमात्र पुद्गलाचीच प्रीती दिसून येते. पंरतु पुद्गलामध्येही द्रव्य व गुण हे त्रिकाली स्थायी असतात. त्यावर संसारी जीवांची प्रीती नसते. त्यांची प्रीती पुद्गलाच्या पर्यायामध्येच असते. सर्वच संसारी जीवांना पर्यायमूढतेचा रोग जडलेला आहे. त्या रोगावरील रामबाण उपाय आहे. या पुद्गलांच्या परिणामांचे चिंतवन करून त्यावरील प्रीती सोडणे, आपल्या रागादि विकारांनाही अशुचि, अपवित्र जाणून त्यामधील आत्मत्वबुद्धी सोडणे व आपल्या त्रिकाली ध्रुव आत्मतत्त्व आणि चैतन्यस्वभाव यास जाणून त्यांचे चिंतवन करणे, आश्रय घेणे हाच एकमात्र रामबाण उपाय आहे.

अज्ञानी प्राणी घर, जमीनजुमला आदि पुद्गलरूप अस्थायी परिणामांना व आपल्या रागद्वेषादि पुण्यपापादि विकारांना स्थायी मानून त्यात दंग आहेत; परंतु आपल्या केवळ मान्यतेने तर अस्थिर पर्याय स्थायी होऊ शकत नाही. आपण कोणत्याही पर पदार्थाला आपल्या अभिप्रायानुसार परिणमवूं शकतच नाही. हा वस्तुचा स्वभाव आहे की, ती आपल्या उपादानाच्या सीमेतच स्वभावानुसार परिणमन करते. अन्य द्रव्यांना आपणास अनुकूल परिणमविण्याच्या चक्रामध्ये सर्व जीव पराधीन व कष्ठी होत आहेत. त्यावर पर्यायदृष्टी सोडून द्रव्यदृष्टीचा स्वीकार करणे व आत्मसात् करणे हाच एकमेव उपाय आहे. म्हणून पंडितप्रवर जयचंदजी आपल्या बारा भावनामध्ये सांगतात की-

द्रव्यरूपकरि सबही थिर परजय थिर है कौन ।
द्रव्यदृष्टि आपा लख्यो परजयनय करि गौन ॥

अर्थ - द्रव्यदृष्टिने स्वभावदृष्टीने सर्वच शाश्वत आहेत पण पर्याय तर स्वभावतःच उत्पादव्ययरूप - अशाश्वत आहे. कोणताही पर्याय, जेथे अज्ञानी जीव दंग आहे, रंगला आहे त्यास स्थायी मानून बसला आहे ! म्हणून द्रव्यदृष्टी आत्मसात करावी व

त्यासाठी पर्यायदृष्टी गौण करावी. त्याचा आश्रय न घ्यावा.

गाथा- सामग्गिंदियरूवं आरोग्गं जोव्वणं बलं तेजं ।
सोहग्गं लावण्णं सुरधणुमिव सस्सयं ण हवे ॥ ४ ॥
सामग्रींद्रियरूपमारोग्यं यौवनं बलं तेजः ।
सौभाग्यं लावण्यं सुरधनुरिव शाश्वतं न भवेत् ॥ ४ ॥

अन्वयार्थ - (सामाग्गिंदियरूपं आरोग्गं जोव्वणं बलं तेजं सोहग्गं लावण्णं सुरधणुमिव सस्सयं ण हवे)संपूर्ण इंद्रिये, रूप, आरोग्य, यौवन, बल, तेज, सौभाग्य, लावण्य हे सर्वच इंद्रधनुष्याप्रमाणे अस्थिर आहेत.

भावार्थ - या गाथेत व मागील गाथेत सांगितलेले संयोग बल आणि तेज, सौभाग्य, लावण्य हे सर्वच इंद्रधनुष्याप्रमाणे टिकाऊ नाहीत. एकतर ते प्रत्यक्ष भिन्न परद्रव्याश्रित आहेत. महाल, वाहन, नातलग, मातापिता आदि. अथवा ती इंद्रिये वगैरे जीवासह संबद्ध अशा शरीराश्रित आहेत. यौवन, लावण्य, बल, कांति वगैरे. हेही तर सर्वच शेवटी पुद्गलाचे परिणाम आहेत अथवा पुद्गल कर्मनिमित्ताने होणारे रागादि अथवा पुण्यपापदि अस्थायी विकारी भाव आहेत. ते सर्वच आत्म्याच्या शुद्ध स्वरूपापासून भिन्न आहेत. ज्ञानी त्यांना आपले मानत नाही. त्यामध्ये आनंद अनुभवत नाही. आकुलता व दुःख दूर करण्यासाठी उपरोक्त सांयोगिक भावापासून भेदविज्ञान हे आवश्यकच आहे आणि अनिवार्य पण आहे. रागद्वेषाची परंपरा हाच खरा संसार आहे. म्हणून या सर्व भावांना नाशवंत जाणून आत्म्यापासून भिन्न मानून एक चिदानंदधन आत्म्याचा तेवढा आश्रय घ्यावा.

गाथा - जलबुब्बुद-सक्कधणु-खणरुचि घनसोहमिव थिरं ण हवे ।
अहमिंदट्ठाणाहिं बलदेवप्पहुदि पज्ञाया ॥ ५ ॥
जलबुद्बुदशक्रधनुक्षणरुचि-घनशोभेव स्थिरं न भवेत् ।
अहमिन्द्रस्थानानि बलदेवप्रभृति पर्यायः ॥ ५ ॥

अन्वयार्थ - (अहमिंदट्ठाणाहि बलदेवप्पहुदि पज्ञाया) अहमिंद्राची पदे, तसेच बलदेव आदि त्रेसठ शलाका पुरुषाची पुण्यमय द्रव्यपर्याय सुद्धा(जलबुब्बुद सक्कधणु-खणरुचि-घनसोहमिव थिरं ण हवे )पाण्यावरील बुडबुडे, इन्द्रधनुष्य, वीज आणि मेघाच्या शोभेप्रमाणे स्थिर नाहीत; अर्थात् अस्थिर आहेत.

भावार्थ - मोठेमोठे इन्द्र, चक्रवर्ती, बलदेव वगैरे महान पुण्यशाली जीव आहेत. त्यांची ही पदे व्यवहारात पुण्यमय अवस्था मानल्या जातात. परंतु याही सर्व अवस्था पर्याय ध्रुव नाहीत. आयु संपताक्षणीच या अवस्था टिकतच नाहीत. नारायण-



चक्रवर्तीचे वैभवही त्यांच्या वारसाच्या कामी येत नाही. ते तेथेच वीजेच्या लोळाप्रमाणे थिजून नष्ट होतात. परंतु अज्ञानीला त्याबाबत स्वामीत्वाची भावना असते, त्यामुळे तो ममत्वाने मूढ होतो व शेवटी परिग्रह नाश पावतो तेव्हा पश्चातापाने व्याकुळ होतो.

ही सर्व पुण्यमय पदेही म्हणजे प्रवाशांनी एका झाडेच्या छायेत विश्रांतीसाठी एकत्र यावे तद्वत काही क्षणमात्र आहेत. हा जीवाचा प्रवास म्हणजेच संसार आहे. शेवटी तथ्य तर कविवर पं. दीपचंदनी म्हणतात त्याप्रमाणेच आहे.

द्रव्यदृष्टी से वस्तु थिर पर्याय अथिर निहार ।
तासे योगवियोगसे हर्षविषाद निवार ॥

अर्थ - द्रव्यदृष्टीने वस्तुमात्र व स्वभाव स्थिर आहे; पर्यायमात्र अस्थिर आहे हे जाण. म्हणून अनुकूल संयोगामध्ये हर्ष व प्रतिकूल संयोगामध्ये विषाद करु नकोस !

गाथा - जीवणिबद्धं देहं खीरोदयमिव विणस्सदे सिग्घं ।
भोगोपभोगकारणदव्वं णिच्चं कहं होदि ॥ ६ ॥
जीवनिबद्धो देहः क्षीरोदकमिव विणस्सदे शीघ्रम् ।
भोगोपभोगकारणद्रव्यं नित्यं कथं भवति ॥ ६ ॥

अन्वयार्थ - (जीवणिबद्धं देहं)जीवाशी एकक्षेत्रावगाहरूपाने एकरूप दिसणारा हा देह सुद्धा(सिग्धं खीरोदयमिव विणस्सदे) शीघ्रच दूध पाण्याप्रमाणे नाश पावतो. (भोगोपभोगकारणदव्वं णिच्चं कहं होदि ?)तर मग सर्वच भोग आणि उपभोगास कारणभूत द्रव्य (पुद्गलपर्याय असल्याने) नित्य कसे असतील ?

भावार्थ - या विश्वामध्ये कोणताही संयोगसंबंध हा वास्तव आणि स्थायी नाही. जो काही परिग्रह, देह, इंद्रियादिकांचा संयोग आहे तो सर्व पुद्गलाचा समानजातीय द्रव्यपर्याय आहे. पर्यायमात्र हा उत्पादव्ययरूप आहे. त्यामुळे तो संबंध विनाशिकच आहे. जेथे देहाचाही संबंध नियमाने नष्ट होतो - तेथे अन्य संयोगसंबंध टिकाऊ कसे काय असू शकतील ? कोणताही परिग्रह कोणत्याही पुण्यशाली जीवासही नियमाने सोडून जातोच.

अवश्य यदि नश्यन्ति स्थित्वापि विषयाश्चिरं ।
स्वयं त्याज्यास्तथा हि स्यान्मुक्तिः संसृतिरन्यथा ॥

अर्थ - जर इंद्रियांचे विषय काही काळ राहूनही अवश्यमेव नाश पावतात तर त्यांना स्वतःहून सोडण्यातच बुद्धिमानी आहे. जर स्वतःहून सोडावेत तर मुक्ती आहे. अन्यथा जर स्वतः न सोडता नाईलाजाने सोडावेच लागतील तर संसारमात्र आहे.

परिग्रहाबाबत रागादिक हेही सांयोगिक विकारी परिणाम असून तेही मलीन

नाशवंत आणि निर्मल चैतन्यापासून भिन्नच आहेत. त्यांना हेय रूपाने स्वीकारले तरच रत्नत्रयाची प्राप्ती होऊन मोक्षमार्ग प्रशस्त होतो.

गाथा - परमट्ठेण दु आदा देवासुरमणुयराय-विभवेहिं ।
वदिरित्तो सो अप्पा, सस्सदमिदि चिंतए णिच्चं ॥ ७ ॥

परमार्येन तु आत्मा देवासुरमनुजराजविभवैः ।
व्यतिरिक्तः स आत्मा शाश्वत इति चिंतयेन्नित्यम् ॥ ७ ॥

अन्वयार्थ -(दु परमट्ठेण आदा) परंतु परमार्थाने तर हा आत्मा(देवासुरमणुय रायविहवेहिं वदिरित्तो )देव, असुर, सुर, मनुष्य याही वैभवापासून भिन्न असा आहे. (सो अप्पा सस्सदमिदि णिच्चं चिंतये)तोच आत्मा एकमात्र शाश्वत आहे, शुद्ध आहे असे चिंतवन करावे.

भावार्थ - वस्तुतः तर एक चिदानंदघनस्वरूप भगवान आत्मा तेवढा माझा आहे त्याचे वैभव संसारातील तुच्छ वैभवापेक्षाही महान् अतिशयरूप आहे. हे जाणून घेण्यातच या मानवजन्माची कृतार्थता आहे. अनित्यतेमध्ये अडकलेल्या आत्म्याला नित्य व शुद्ध आत्माच वर काढू शकतो. म्हणून फक्त संसाराच्या अनित्यतेचे चिंतवन एवढेच अनित्यानुप्रेक्षेचे प्रयोजन नाही. तर या अनित्यतेच्या अतीत एक चेतनामात्र शुद्ध आत्मा आहे हे जाणून जर त्याचा अवलंब घ्यावा हेच तर खरे अनित्यानुप्रेक्षेचे एकमात्र प्रयोजन आहे. फक्त पर्यायरूप भोगोपभोग सामग्री व इंद्रियविषयांच्या अनित्यतेचे चिंतवन एवढेच मात्र पुरेसे नाही. तर त्या सर्व पर्यायामध्ये सदैव व्यापून असणारा द्रव्याचा स्वतःसिद्ध भाव जाणून घेवून त्याचा आश्रय घेणे एवढा एकमात्र पर्यायदृष्टीच्या रोगावरील हमखास उपाय आहे. हेच एकमेव रहस्य येथे अनित्यानुप्रेक्षेमध्ये आचार्यांनी प्रगट केले आहे व यावरून पं. जयचंदजी छाबडा यांनी ते जाणून त्यांच्या बारा भावनेतील अनित्यानुप्रेक्षमध्ये सूचित केलेले आहे.

●●●



# अशरणानुप्रेक्षा

मणि-मंतोसह-रक्खा हय-गय-रहओ य सयलविज्ञा य ।
जीवाणं ण हि सरणं तिसु लोए मरणसमयम्हि ॥ ८ ॥

मणिमंत्रौषधरक्षा हयगजरथाश्च सकलविद्याश्च ।
जीवानां न हि शरणं त्रिषु लोकेषु मरणसमये ॥ ८ ॥

अन्वयार्थ - (मरणसमयम्हि तिसु लोए)मरणाची वेळ आली असतांना या तीनही लोकामध्ये(मणिमंतोसहरक्खा य हयगयरहओ य सयलविज्जा)मणि, मंत्र, औषध, रक्षक आणि घोडे-हत्ती-रथ वगैरे तसेच संपूर्ण सर्व विद्या सुद्धा(हि जीवाणं सरणं ण) निश्चयाने या जीवास मरणापासून वाचविण्यास समर्थ नाहीत.

भावार्थ - मनुष्य, देव, नारक व तिर्यंच या चार गतीमध्ये परिभ्रमण करत आहे म्हणजे संसार चार गतीमध्ये आहे. जोपावेतो गतिनामकर्म व त्यासह अविनाभावी आयुकर्म यांचा उदय आहे तोपावेतो या चार गतीमध्ये राहावे लागते आणि जेव्हा त्यांचा उदय संपतो तेव्हा नियमाने मरण प्राप्त होते व त्यानंतर पुनः गतिनामकर्म व आयुच्या उदयानुसार अन्य गती प्राप्त होते. हेच संसाराचे स्वरूप आहे. या चार गतीमध्ये एकही गती शाश्वत नाही.जातस्य हि ध्रुवो मृत्युः । जो जन्माला आला त्याला मृत्यु निश्चितच आहे.मरण हीच संसारामध्ये प्रकृति आहे. ते कोणत्याही उपायाने टळत नाही. शेवटी राजे-महाराजे, देव, सर्वार्थसिद्धी मधील देव, चक्रवर्ती, नारायण-प्रतिनारायण आदि पुण्यशाली शलाका पुरुषांनाही मरण चुकलेले नाही. कारण या चार गती म्हणजेच जीव आणि पुद्गलात्मक असमानजातीय द्रव्यपर्याय आहेत व त्या स्वभावतःच उत्पादव्ययस्वरूपच आहेत; पर्यायमात्र विनाशिकच आहे, ती स्थायी कधीही असतच नाही.

परंतु हा अज्ञानी संसारी प्राणी ह्या चार गतीरूप पर्यायांना आत्मरूपाने स्वीकारून त्यांना स्थायी मानतो. परंतु आपल्या स्थायी मानण्याने तर पर्यायाचा व्यय हा टळू शकत नाही. त्यामुळे तो सदैव मरणभयाने ग्रस्त व त्रस्त असतो. त्याचा इलाज म्हणून नाना प्रकारचे निष्फळ प्रयत्न करतो. पण कितीही प्रयत्न केले तरी मरण येतेच. तेव्हा मणि मंत्र तंत्र काहीच कामी येत नाहीत. डॉक्टर, वैद्य, रामबाण औषध हे सर्व काहीच उपयोगी पडत नाहीत. जेव्हा आयु संपते तेव्हा देवांनाही संसारसुखाचे स्थान असा

स्वर्गही सोडावाच लागतो. न घोडे, न हत्ती वा न रथ वाचवूं शकतात, न कोणतीही विद्या तारक होऊ शकते. विषवैद्य गारुडी हेही विषाने व सर्पविषाने मेलेले दिसून येतात. उत्तम ज्योतिषांच्या सर्व मुली आणि सुना सुद्धा विधवा झालेल्या दिसून येतात. अज्ञानी प्राणी सर्व दुःखावरील अमोघ उपाय अशा आत्मस्वभावाच्या विद्येचा कधीही आश्रयच घेत नाही. त्यामुळे व्याकूळ होऊनही शेवटी हा भव सोडावाच लागतोऽजन्म ही जशी नियती आहे तद्वत् मृत्यु हीही नियतीच आहे.त्यात परिवर्तन हे कोण्याही पुण्यशाली जीवाच्या सुद्धा स्वाधीन नाही.

अज्ञानी प्राणी अस्थायी पर्यायांना शाश्वत मानून आपल्याच अज्ञानाने अपराधाने कष्टी व व्याकुळ होतो आहे; परंतु जीवास कधीही न सोडणाऱ्या आपल्या नियत चैतन्य स्वभावाला ओळखतच नाही.अनित्य वस्तु ही स्वभावतःच अशरण असते; स्थायी स्वभाव हाच एकमात्र शरणभूत आहे हे तत्त्व तो कधीही मान्यच करीत नाही; आणि म्हणूनच अनित्यास नित्य स्वीकारून ठगविलेला हा अज्ञानी प्राणी त्यास शरण मानून पुनः पुनः ठगविल्या जातो व दुःखी होतो.

गाहा ९ -

सग्गो हवे हि दुग्गं, भिच्चा देवा य पहरणं वज्जं ।
अईराबणो गइंदो, इंदस्स ण विज्जदे सरणं ॥ ९ ॥

स्वर्गो भवेद्धि दुर्गं भृत्या देवाश्च, प्रहरणं वज्रम् ।
ऐरावतो गजेन्द्रः, इन्द्रस्य ण विद्यते शरणम् ॥ ९ ॥

अन्वयार्थ - (सग्गो हवे हि दुग्गं) स्वर्ग हाच ज्याचा किल्ला आहे; (ये भिच्चा देवा य पहरणं वज्जं) देवच ज्याचे नोकर चाकर आहेत व प्रहरण नामक ज्याचे वज्रधनुष्य आहे; (अईरावणो गइंदो) आणि ऐरावत हा ज्याचा गजेन्द्र आहे अशा (इंदस्स सरणं ण विज्जदे) इन्द्रालाही स्वर्गातही कोणीही शरण नाही; आयुष्य संपल्यानंतर मरणापासून कोणीच वाचवू शकत नाही.

भावार्थ - या संसारामध्ये देवांचे सुख हे सर्वोत्कृष्ट मानले जाते. त्यांना आयु संपण्यापूर्वी कोणत्याही कारणाने मरण येतच नाही. स्वर्गासारखे किल्ल्याप्रमाणे सुरक्षित स्थान, देवच तेथे आज्ञाकारी नौकर चाकर आहेत, प्रहरणासारखे सर्वश्रेष्ठ आयुध आहे, ऐरावतासारखा गजेन्द्र आहे तरीही इंद्रालाही आयुष्य संपले म्हणजे स्वर्गातून मरणद्वारा च्युत व्हावेच लागते. स्वर्गातही मरणापासून सुटका नाही. जेथे शक्तिशाली देवांची चक्रवर्ती आदिकांची ही गत आहे तेथे इतर हीन दीन क्षुद्र पापी जीवांची काय कथा ! त्यांना तर वाचविण्यास निमित्त ही मिळत नाहीत.



जो भयग्रस्त आहे, आशापाशांनी वेढलेला आहे, धनाची लालसा आहे तोच संसारात नवे नवे भव धारण करून जन्ममरणाचे चक्रांत अडकून बसतो. त्याचा पिच्छा यम, मृत्यु सोडतच नाही. परंतु जो आपल्या अविनाशी स्वरूपाला जाणून आत्म्यास अविनाशी मानतो, त्यामुळे भय, आशा या पासून मुक्त असतो तोच तर शुद्ध सिद्धस्वरूप होऊन शाश्वत सुखाचा भागीदार होतो. ज्ञानी आपल्या स्वानंदरसामध्ये तल्लीन होऊन आपल्या ध्रुव आत्म्याच्या मंगलगीतामध्ये स्थायीरूपाने मग्न असतो.

अब हम अमर भये न मरेंगे, अब हम अमर भये न मरेंगे ।
तन कारन मिथ्यात्व दियो तज, क्यों कर देह धरेंगे ।

ज्ञानी, सम्यग्दृष्टी धर्मात्म्याला मरणाचे ही भय नाही आणि सात प्रकारच्या भयापैकी कोणतेही भय असत नाही. चेतन आत्म्याला तर मरण ही नाही, आकुलता दुःख नाही, रागद्वेषादि विकारही नाहीत. त्याचा हा विश्वास असतो की, शरण तो इक धर्म आतम जाहि मुनिजन गहत है। या जगांत शरण तर एक मात्र आत्मा व धर्मच आहे. त्यास मुनी सदैव ग्रहण करतात -

णवणिही-चउदहरयणं, हयमत्तगइंद-चाउरंगबलं ।
चक्केसरस्स ण सरणं, पेच्छंतो कद्दिये काले ॥ १० ॥

नवनिधयश्चतुर्दशरत्नानि, हयमत्तगजेन्द्रचतुरंगबलम् ।
चक्रेशस्य न शरणं, पश्यत कर्दिते काले ॥ १० ॥

अन्वयार्थ - (णवणिहि-चउदसरयणं हय-मत्तगइंद-चाउरंगबलं) नवनिधी, चौदा रत्न, घोडे, मत्त हत्ती, चतुरंग सैन्य हे सर्व (कद्दिये काले पेच्छंतो चक्केसस्स सरणं ण) समोर यम-काळ उभा असलेला दिसत असतांनाही चक्रवर्तीला शरण नाहीत.

भावार्थ - चारगतीमध्ये देवगतीमध्ये अनुकूलता जास्त असल्यामुळे ती सुखप्रद मानली जाते. तसेच मनुष्यगतीमध्ये तीर्थंकर, चक्रवर्ती, नारायण, प्रतिनारायण बलदेव, कामदेव हे महान पुण्यशाली आहेत. चक्रवर्तीला नवनिधी[१] व चौदा[२] रत्नाची प्राप्ती झालेली असते; १८ लाख सुलक्षणी घोडे व ८४ लाख मत्त हत्ती यांचा ताफा असतो,

१. नवनिधी - १ कालनिधी २ महाकाल ३ पिंगला ४ नैसर्प ५ प्रद्म ६ महापद्म ७ पांडु ८ शंख ९ रत्न. यापैकी प्रत्येकापुढे निधी शब्द जोडावा. ह्या ९ निधी आहेत.
२. चौदा रत्न - १ सेनापति २ स्थपति ३ शिल्पकार ४ पुरोहित ५ स्त्री ६ हत्ती ७ अश्व हे सात सजीव रत्ने व ८ काकिनी, ९ मणि चूडामणि १० चक्र १२ चामर १३ छत्र १४ खड्ग हे ७ अजीव रत्न.
३. चतुरंग सेना - १ पदाति सैन्य २ घोडदळ ३ गजदळ ४ रथ.

सर्व प्रकारे उत्तम चतुरंग सेनादल[३] असते. परंतु मृत्यु डोळ्यासमोर नर्तन करत असतांना यापैकी कोणीही दुष्ट यमाच्या पकडीतून सोडूवं शकत नाही. संसारामध्ये प्रत्येक वस्तूचे परिणमन नियत आहे. तद्वत् चार गतीरूप संसारामध्ये जन्ममरण ही नियत आणि अवश्यंभावी आहे. चक्रवर्ती हा मनुष्यगतीमध्ये महान पुण्यशाली जीव! परंतु त्यासही मरण चुकले नाही. तेव्हा सामान्य मनुष्य आणि तिर्यंचाची काय गत!

जाइ-जर-मरण-रोग-भयादो रक्खेदि अप्पणो अप्पा ।
तम्हा आदा सरणं बंधोदयसत्तकम्मवदिरित्तो ॥ ११ ॥
जातिजरामरणरोगभयतो रक्षति आत्मनो आत्मा ।
तस्मादात्मा शरणं बन्धोदयसत्त्वकर्मव्यतिरिक्तः ॥ ११ ॥

अन्वयार्थ - (अप्पणो अप्पा जाइजरमरणरोगभयादो रक्खेदि)आपला शाश्वत आत्माच जन्म, मरण, म्हातारपण, रोग व भयापासून आत्म्याची रक्षा करतो.(तम्हा बंधोदयसत्तकम्मवदिरित्तो आदा सरणं)म्हणून कर्माचा बंध, उदय सत्ता यापासून अत्यंत भिन्न आत्माच एकमात्र शरणभूत आहे.

भावार्थ - आत्मा आपल्या चैतन्यस्वभावाने सदैव युक्त, शाश्वत आहे. तो जन्म, म्हातारपण, मरण, रोग या सर्व विकारांनी स्वरूपतःच रहित आहे. शुद्ध आत्माच एकमेव रक्षक व शरण आहे. नरनारकादि पर्याय संयोगरूप आहेत. रागादिक हे क्षणिक विकार आहेत व कर्मसापेक्ष आहेत. कर्म हे तर पुद्गलमयच आहेत. कर्माचा बंध उदय, सत्ता, हे आत्म्यापासून अत्यंत भिन्न आहेत. असा एक शुद्ध, एकरूप चैतन्यमात्र आत्माच शरण आहे. त्यास शरण गेल्याने रत्नत्रयाची प्राप्ती, विकास व साधना होते व त्यामुळे आत्मा हा शुद्ध सिद्धपदाची प्राप्ती करतो. म्हणून एकमात्र आत्माच शरण आहे.

यह संसार असार महान, सार आप मे आपा जान ।
सुख तै दुःख दुःख तै सुख होय, समता चारो गती नहि कोय । बुधजन
शरण न जिय के जगत में, सुर-नर-खगपति सार ।
निश्चय शुद्धातम शरण, परमेष्ठी व्यवहार ॥ पं दीपचंदनी

अर्थ -१ हा संसार असार असून त्यामध्ये महान् सारभूत आत्मस्वरूपांत लीन असा आपला आत्माच आहे. सुखापासून दुःख व दुःखापासून सुख असा विषमतामय द्वैतभाव हा तर संसार आहे. समता चार गतीरूप संसारात कोठेही नाही.

२. या जगामध्ये या जीवास कोणीही शरण नाही. मग तो देव, मनुष्य वा विद्याधर असो. निश्चयाने एक शुद्ध आत्मा आणि व्यवहाराने पंचपरमेष्ठीच शरण आहेच.



अरुहा सिद्धाइरिया, उवझाया, साहू पंचपरमेट्ठी ।
ते वि हू चेट्ठदि आदे, तम्हा आदा हु मे सरणं ॥ १२ ॥
अर्हात्सिद्धाचार्या उपाध्यायाः साधुपंचपरमेष्ठिनः ।
तेऽपि हि चेष्टन्ति आत्मनि, तस्मादात्मा खलु मे शरणं ॥ १२ ॥

अन्वयार्थ - (अरुहा सिद्धाइरिया, उवझाया साहू पंचपरमेट्ठी)अरिहंत, सिद्ध आचार्य, उपाध्याय व साधु हे पांच परमेष्ठी(ते पि हु आदे चेट्ठदि) आपल्या शुद्ध आत्म्यामध्येच आहेत. म्हणून(तम्हा हु मे आदा सरणं) म्हणून खरोखर मला एक आत्माच शरण आहे.

भावार्थ - अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू हे पाच परमेष्ठी आहेत. ह्या अन्य जीवरूप पंचपरमेष्ठीची भक्तिपूजा हा परद्रव्यप्रवृत्त परिणाम असल्यामुळे राग आहे. तो शुभोपयोग आहे.परंतु तत्त्वतः आपला शुद्ध आत्माच पंचपरमेष्ठीस्वरूप आहे. पंचपरमेष्ठी आपल्या शुद्ध स्वरूपात शोधणे हीच निश्चयाने भक्ती आहे. आत्मसाधना, अनुभूती हीच वास्तविक पाच परमेष्ठीची पूजा अर्चा आहे. शुभोपयोग परिणाम ही तर व्यवहाराने भक्ती आहे.

अरिहंत म्हणजे अनंतचतुष्टयाने संपन्न सकल परमात्मा आहे. कोणताही आत्मा शक्तिअपेक्षेने अनंतचतुष्टयाने संपन्न आहे. आणि त्या शुद्ध आत्म्याची प्राप्ती एक चेतन आत्म्याच्या ध्यानानेच होते; म्हणून तत्त्वतः अरिहंत शुद्ध आत्म्याच्या स्वरूपातच समाविष्ठ आहेत.

सिद्ध परमेष्ठी हे आठ कर्म व नोकर्माने रहित असून शुद्ध स्वभावाच्या आश्रित पर्यायरूपाने परिणत आहेत. म्हणून आत्मा, प्रत्येक जीव निश्चयाने ज्या अर्थी कर्म-नोकर्माने रहित व स्वभावाने पूर्ण आहे त्याअर्थी सिद्धही आपल्या शुद्ध स्वरूपांत तत्त्वतः सामावलेले आहेत.

आचार्य, उपाध्याय व साधु हे आपल्या शुद्ध आत्म्याची साधना करणारे साधकच आहेत. त्यामुळे शुद्ध आत्मस्वरूपांत लीन ज्ञानी हा स्वयं धर्माचे आचरण करणारा आहे, व शास्त्राचे रहस्य आत्मसात् करणारा आहे म्हणून तोच उपाध्याय आहे. म्हणून हे पंच परमेष्ठी शुद्ध आत्मस्वरूपच आहेत.

म्हणून जेव्हा जीव व्यवहारानेही पंच परमेष्ठीला शरणभूत मानतो तेव्हा तो व्यवहार समीचीन तेव्हाच असतो की, जर अंतरंगांत तो श्रद्धेने शुद्ध आत्मस्वरूपाची श्रद्धा करीत असेल. म्हणून शेवटी जेव्हा पंच परमेष्ठी हे व्यवहाराने शरण आहे मानतो तेव्हां तत्त्वतः एक आत्माच शरण असतो. -

सम्मत्तं सण्णाणं सच्चारित्तं च सत्तवो चेव ।
चउरो चेट्ठदि आदे, तम्हा आदा हु मे सरणं ॥ १३ ॥
सम्यक्त्वं सज्ज्ञानं सच्चारित्रं च सत्तपश्चैव ।
चत्त्वारि चेष्टयन्ति आत्मनि तस्मादादा खलु मे शरणं ॥ १३ ॥

अन्वयार्थ - (सम्मत्तं सण्णाणं च सच्चारित्तं च सत्तवो एव चउरो आदे चेट्ठदि) सम्यक्त्व, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र व तसेच सम्यक् तप हे आत्मस्थितच आहेत (तम्हा हु आदा मे सरणं) म्हणून तत्त्वतः मला एक आत्माच शरण आहे.

भावार्थ - ज्यांना पाच परमेष्ठी असे म्हणण्यांत येते तेही जीवाच्या शुद्ध स्वरूपातच सामावलेले आहेत हे मागील गाथेमध्ये सांगितलेले आहे. त्या पदाच्या प्राप्तीचा मार्ग म्हणजे चार प्रकारची आराधना आहे. ही चार प्रकारची आराधनाही तत्त्वतः पाहिले तर शुद्धात्मस्वरूपाची साधनाच आहे. म्हणजे चार प्रकारच्या आराधनेचा जो उपदेश दिल्या जातो तोही वास्तविक शुद्ध आत्म्याच्या आराधनेचाच उपदेश आहे हे या गाथेत सांगितलेले आहे.

केवढीही महान शक्ति असो ती कोणासही मरणापासून वाचवूं शकत नाही. मग ते अनंतवीर्य संपन्न अरहंत असोत ! तसेच ज्या चार प्रकारच्या आराधना सांगितल्या आहेत त्या जरी व्यवहाराने पंच परमेष्ठीच्या आराधना आहेत असे व्यवहाराने सांगितले जाते. परंतु तत्त्वदृष्टीने या चारही प्रकारच्या आराधना म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपाचीच आराधना आहे.

या १२ व १३ या दोन्ही कुंदकुंदाच्या गाथेचे रहस्य श्री. पं. जयचंदजी छाबडा यांनी आपल्या बारा भावनेत अशरणभावनेचे स्वरूप सांगतांना प्रगट केले आहे.

शुद्धातम अरु पंचगुरु जगमें सरणा दोय ।
मोह उदय इस जीवको आन कल्पना होय ॥

अर्थ - जगामध्ये दोनच शरणभूत आहेत. (१) शुद्ध आत्मा आणि (२) पाच परमेष्ठी. येथे शुद्ध आत्म्यामध्ये सर्वच सामावलेले आहे. पांच परमेष्ठीच्या शरणामध्ये व्यवहार आराधना समाविष्ट आहे आणि शुद्ध आत्म्यामध्ये निश्चय आराधना अंतर्भूत आहे. परंतु या व्यतिरिक्त जे कांही अन्य शरण मानण्यात येते ती विपरीत कल्पना असून ते मोहाच्या उदयात संभवणारे कार्य आहे, विपरीत मान्यता आहे.

सम्यक्त्व म्हणजे सम्यग्दर्शन याचा तत्त्वतः अर्थ तर हाच आहे की, आपल्या त्रिकालधुव ज्ञायक वा चैतन्यभावस्वरूप आत्म्याचे श्रद्धान करणे; सम्यग्ज्ञान म्हणजे आपल्या उपयोगरूप ज्ञानाच्या पर्यायद्वारा त्याच त्रिकाल ज्ञायक चेतनस्वभावाचा



अनुभव करणे; सम्यक्चारित्र म्हणजे आपल्या शुद्ध आत्म्याच्या अनुभूतीमध्ये स्थिरता प्राप्त करणे; सम्यक् तप म्हणजे आपल्या शुद्ध चैतन्यस्वरूपांत तपन करणे लवलीन होणे. या प्रमाणे तत्त्वतः या चारही आराधना म्हणजे आपल्या शुद्ध चैतन्यस्वभावाची आराधना किंवा साधना आहे. म्हणून ज्या अर्थी चार आराधनाही आत्म्याचीच साधना आहे त्या अर्थी चार आराधना म्हणजे वास्तविक शुद्ध आत्म्याचीच साधना आहे. म्हणून आपला एक शुद्ध आत्माच शरण आहे.

सम्यग्दर्शन म्हणजेच भेदविज्ञान व आत्मानुभूती. ते च स्वरूपाचरण चारित्र आहे. तेच आत्मस्वरूपामध्ये एकाग्रता, तप आहे. म्हणजे या सर्वांचा विषय एकमात्र शुद्ध आत्माच आहे. म्हणून सर्व आराधना म्हणजे शुद्ध आत्म्याची साधनाच आहे. त्या आराधनेमध्ये शुद्ध आत्म्याव्यतिरिक्त अन्य ज्ञेय गौण पडतात. म्हणून तेथे संकल्प-विकल्पाचा अभाव आहे. अतएव एक शुद्ध आत्म्याची शरण घेणे हे एकच अशरणानुप्रेक्षेचे फलित आहे.

●●●

# एकत्वानुप्रेक्षा

गाहा - एक्को करेदि कम्मं, एक्को हिंडदि य दीहसंसारे ।
एक्को जायदि मरदि य, तस्य फलं मुंजदे एक्को ॥ १४ ॥

एकः करोति कर्म, एको हिण्डति च दीर्घसंसारे ।
एको जायते म्रियते च, तस्य फलं भुङ्क्ते एकः ॥ १४ ॥

अन्वयार्थ - (एक्को कम्मं करेदि) जीव हा एकटाच कर्म करतो; (य एक्को दीहसंसारे हिंडदि) आणि एकटाच दीर्घ संसारामध्ये परिभ्रमण करतो;(य एक्को जायदि मरदि) आणि एकटाच जन्म घेतो आणि मरतो;(एक्को[४] तस्स फलं भुंजदे) तसेच एकटाच आपण केलेल्या कर्माचे फल भोगतो.

भावार्थ - हा जीव या संसारामध्ये सदैव संयोग, परिवार, साथीदारांची अपेक्षा करतो; परंतु त्यास कोणत्याही स्थितीत व गतीत एकटेच राहावे लागते. गूळ आहे तोवर माशांचा घोळका असतो; संपल्यानंतर राहात नाही. सांगताना सर्वच आठवतात. परंतु कामी कोणीच येत नाही. तो सदैव विकल्पाचे जाळे विणत असतो.संकल्प-विकल्प हेच संसाराचे स्वरूप आहे.अनादि काळापासून त्याला त्यामध्येच रस आहे. परंतु त्याच्या संकल्प-विकल्पानुसार कधीतरी घडते काय ? सर्व संयोग वगैरे नियतीला अनुसरून मिळतात.

परंतु विचारांती दिसून येते की, जन्म, मरण, जीवन, सुख दुःख हे सर्व त्याने एकट्याने केलेल्याच कर्माचे फल असून जीव एकटाच फल भोगतो. कोणाचेही पुण्य-पाप व त्याचे फल त्यालाच मिळते व भोगावे लागते. कोणीही कोणासही पुण्य-पाप व फल देऊ शकत नाही. या श्लोकांच्या टीपेतील उद्धृत दोन्ही कवींच्या भावनास्वरूपात हाच भाव स्पष्ट केलेला आहे.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

४ आप अकेलो अवतरे, मरे अकेला होय ।
यूँ कबहूँ इस जीव को, साथी सगा न कोय ॥ कवि भूधरदास

५ शुभ अशुभ करम फल जेते, भोगे जिय एकही तेते ।
सुत दारा[७] होय न सीरी[६], सब स्वारथ के है भीरी ॥
पं. दौलतरामजी छहटाला

६ सिरी = साथीदार, ७ दारा = पत्नी; भीरी - भिडस्त, संबंधी



गाहा - एक्को करेदि पावं, विसयणिमित्तेण तीव्वलोहेण ।
णिरयतिरयेसु जीवो, तस्स फलं भुंजदे एक्को ॥ १५ ॥

एकः करोति पापं, विषयनिमित्तेन तीव्रलोभेन ।
निरयतिर्यक्षु जीवो, तस्स फलं भुंजदे एक्को ॥ १५ ॥

अन्वयार्थ - (विसयणिमित्तेण तीव्वलोहेण एक्को पावं करेदि) जीव, इंद्रियविषयांच्या प्रयोजनाने तीव्र लोभाचे वश होऊन एकटाच सर्व पापे करतो(एक्को जीवो णिरयतिरयेसु तस्स फलं भुंजदे) एकटाच जीव नरक आणि तिर्यंच गतीमध्ये त्याचे फल भोगतो.

भावार्थ - हा जीव एकटाच कर्म करतो व त्याचे फल भोगतो. एकाने पुण्य व पाप कर्म करावे आणि दुसऱ्याने त्याचे फल भोगावे असे कधीही घडत नाही. जीवच आपल्या परिणामांचा कर्ताभोक्ता आहे. कवी मंगतराय म्हणतात -

पाप-पुण्य सो जीव जगत में, नित सुखदुःख भरता ।
अपनी करनी आप भरे, सिर औरन के धरता ।

अर्थ - हा जीव या संसारामध्ये आपल्या पुण्यपापानुसार सुखदुःख भोगतो; आपल्या कर्माचे फल स्वतःच भोगतो. याची जबाबदारी तो दुसऱ्याचे डोक्यावर धरू इच्छितो. पण ते शक्य होत नाही.

हा जीव स्वयं पाप वा पुण्य करतो व स्वयंच त्याचे फल भोगतो. आपल्या विषयभोगासाठी व शरीरसुरक्षा आणि संगोपनासाठी वाटेल ती पापे करतो व नीच गतीमध्ये उत्पन्न होऊन दुःखे भोगतो. आपल्या पुण्याचे फलही तो वाटू शकत नाही. तेही तो एकटाच भोगतो.करणे आणि भोगणे संकल्प-विकल्पमात्र आहेत.हे सर्व कर्मवश होऊनच करतो.

गाहा - एक्को करेदि पुण्णं, धम्मणिमित्तेण पत्तदाणेण ।
मणुवदेवेसु जीवो, तस्स फलं भुंजदे एक्को ॥ १६ ॥

अन्वयार्थ - (एक्को धम्मणिमित्तेण पत्तदाणेण पुण्णं करेदि) एकटा जीवच धर्मासाठी मात्र सत्पात्रदान दिल्याने पुण्यसंचय करतो.(एक्को जीवो मणुयदेवेसु तस्स फलं भुंजदे) तोच एकटा जीव मनुष्य व देवगती प्राप्त करून तेथे पुण्याचे फल भोगतो.

भावार्थ - धर्माच्या साधनेसाठी सत्पात्री दान दिल्याने पुण्याचा संचय होतो. पात्रांना चार प्रकारचे दान देणे हे गृहस्थाला पुण्याचे साधन आहे. मिथ्यादृष्टी जीवाची गणना सत्पात्रात नाहीच. त्यास दिलेले कोणतेही दान गृहस्थाच्या त्यागधर्मातही समाविष्ट नाही. त्यास लौकिक व्यवहाराने मात्र दयादत्ती, समदत्ती अथवा अन्वयदत्ती म्हणता येईल. पण पात्रदानाचे अभावी त्याची धर्मामध्ये गणना होऊ शकत नाही. या दानानेच
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

गृहस्थ पुण्यसंचय करतो व तो त्या पुण्याने श्रेष्ठ मानवपद व देवगती प्राप्त करतो व तेथे धर्मभावना सांभाळून सांसारिक सुख सहजासहजी प्राप्त करतो. मिथ्यादृष्टि एक तर कुदेवात जन्म घेतो आणि कदाचित् शुभ लेश्या असतील तर श्रेष्ठ देवामध्येही कदाचित् जन्म घेईल. परंतु तेथेही विषयसुखाच्या लालसेने व्याकुळच असतो व अन्य देवांचे वैभव पाहून मनात ईर्षेने सारखा झुरत असतो व मरून फलस्वरूप नीच गती प्राप्त करतो.

सुरगति में परवैभव देखे, राग उदय दुःख होई ।
मानुषयोनि अनेक विपत्तीमय सर्व सुखी नही कोई ॥
जो संसारविषै सुख होता, तीर्थंकर क्यों त्यागे ।
काहेको शिवसाधन करते, संयम सो अनुरागे ॥

अर्थ - देवसुद्धा आपल्यापेक्षा श्रेष्ठ देवांचे वैभव पाहून रागोत्पत्तीने दुःखी आहेत. मानव योनी अनेक विपदामय आहे. सर्व सुखी, असा कोणीही नाही ॥

अर्थ - जर संसारामध्ये सुख आहे तर तीर्थंकरांनी संसाराचा त्याग कां केला असता ? ते मोक्षाची साधना करत संयमावर प्रीती कां करतात ?

उत्तमपत्तं भणियं, समत्तगुणेण संजुदो साहू ।
सम्मादिट्ठी सावय, मज्झिमपत्तो त्ति विण्णेओ ॥ १७ ॥

उत्तमपात्रं भणितं सम्यक्त्वगुणेन संयुतः साधुः ।
सम्यग्दृष्टिः श्रावकः मध्यमपात्रः इति विज्ञेयो ॥ १७ ॥

अन्वयार्थ - (समत्तगुणेण संजुदो साहू उत्तमपत्तं भणियं)सम्यग्दर्शनाने संपन्न साधू हा उत्तम पात्र म्हटलेला आहे.(सम्मादिट्ठीसावय मज्झिमपत्तो त्ति विण्णेओ)सम्यग्दृष्टि पंचमगुणस्थानवर्ती श्रावक हा मध्यम पात्र आहे असे जाणावे.

भावार्थ - जैनशासनामध्ये सम्यग्दर्शनाने सहित असेल त्यालाच पात्र म्हटले आहे. जो सम्यग्दर्शनाने रहित आहे, मिथ्यादृष्टि आहे त्यास चार प्रकारच्या दानासाठी पात्र म्हटलेले नाही.

सम्यक्त्व गुणसंपन्न साधु म्हणजेच भावलिंगी साधू हा उत्तम पात्र आहे आणि सम्यग्दृष्टि व्रती श्रावक हा मध्यम पात्र आहे व सम्यक्त्वी अविरत श्रावक हा जघन्यपात्र आहे हे पुढील श्लोकांत सांगणारच आहेत. परंतु जो सम्यग्दर्शनाने रहित आहे तो अपात्र अथवा कुपात्रच मानलेला आहे.

या चार दानापैकी आहारदान हे श्रेष्ठ दान आहे. पात्रास आहार देणाऱ्याने तर पात्रास रत्नपात्राची अनुकूलता प्राप्त करून दिलेली आहे. म्हणून ते दान श्रेष्ठ आहे.



त्यामुळे पात्र सुखपूर्वक शास्त्राध्ययन व ध्यानधारणा करू शकतो. आहारदान हे लौकिक व्यवहाराने प्राणदानच आहे. अतएव आहारदानामध्ये औषधदान, ज्ञानदान व अभयदान दिल्यासारखेच आहे.

दान देणे हा शुभभाव पुण्यभाव आहे. कारण दान हे चतुर्विध संघाच्या स्थिरतेचे व स्वास्थाचे कारण आहे. त्यामुळे - दानतीर्थामुळे - तीर्थाची परंपरा अविच्छिन्न चालू राहते - पात्रानुसार दानाचे फलामध्ये विशेषता येते.

णिद्दिट्ठो जिणसमये अविरदसम्मो जहण्णपत्तो त्ति ।
समत्तरयणरहिओ अपत्तमिदि संपरिक्खेज्जो ॥ १८ ॥

निर्द्दिष्टो जिनसमये अविरतसम्यक्त्वो जघन्यपात्र इति ।
सम्यक्त्वरत्नरहितः अपात्रमिति संपरीक्षितव्यः ॥ १८ ॥

अन्वयार्थ -(जिणसमये अविरदसम्मो जहण्णपत्तोत्ति णिद्दिट्ठो)जैन परंपरेमध्ये अविरत सम्यग्दृष्टी हा जघन्य पात्र सांगितलेला आहे.(समत्तरयणरहिओ अपत्तं इदि संपरिक्खेज्जो) सम्यक्त्वरत्नाने रहित हा अपात्र आहे असा परीक्षापूर्वक निर्णय करावा.

भावार्थ - दानामध्ये पात्र आणि अपात्राचा निर्णय हा रत्नत्रयाच्या सद्भावामुळे व अभावामुळे करण्यात आलेला आहे. सत्पात्रीं दिलेले दान यास व्यवहारामध्ये दानतीर्थ - धर्मतीर्थ म्हटले आहे. त्यातही पात्र-अपात्र विवेकामध्ये सम्यग्दर्शनाचा सद्भाव व अभाव हा महत्त्वाचा मुद्दा आहे. रत्नत्रय व त्यातही सम्यक्त्वरत्न असेल व तो जरी व्रतरहित असेल तरी देवपद प्राप्त करून ऋद्धी-सिद्धी प्राप्त करतो. परंतु सम्यक्त्वाने रहित हा द्रव्यलिंगी असेल तरी त्यास अपात्र म्हटले आहे. आणि अपात्री दानाचे फळ हीन पुण्य आहे. पात्रदानच व्यवहाराने धर्म आहे. अपात्रदानास व्यवहारानेही धर्म म्हणत नाहीत.

रत्नत्रयाच्या विशुद्धीच्या तरतमतेमुळे पात्र ही अनेक प्रकारचे आहेत. त्यातही दानामध्ये पात्र-अपात्राच्या निर्णयामध्ये व्यवहार रत्नत्रयाचा मुख्यतेने विचार असतो. कारण दान हाही तर व्यवहार धर्मच आहे.

गाहा - एक्को खवेदि कम्मं, अइविसमं जोण्हकहियमग्गेण ।
मोक्खसुहं उक्किट्ठं, एक्को अणुहवइ सुद्धप्पा ॥ १९ ॥

एकः क्षपयति कर्म अतिविषमं जोण्हकहियमार्गेण ।
मोक्षसुखं उत्कृष्टं, एकः अनुभवति शुद्धात्मा ॥ १९ ॥

अन्वयार्थ - (एक्को जोण्हकहियमग्गेण अइविसमं कम्मं खवेदि)एक जिनप्रणीत

मार्गाने जाणारा साधक - रत्नत्रयाचा आराधक अत्यंत विषम कर्मांचाही क्षय करतो. (मोक्खसुहं उक्किट्ठं)वास्तविक तर कर्मक्षयाने उत्पन्न होणारे मोक्षसुखच सर्वश्रेष्ठ आहे. (एक्को सुद्धप्पा अणुहवेइ)वास्तविक समीचीन मोक्षमार्गाचा पथिकच हा शुद्धात्मा असून तोच शुद्ध आत्म्याचा अनुभव घेतो.

भावार्थ - भेदविज्ञानाच्या अविरत संस्काराने हा जीव कर्माचा क्षय करून आपल्या शुद्ध आत्म्यास प्राप्त करतो. कारण शुद्ध आत्मा हा इंद्रियांना अगोचर आहे. बुधजन छहढालेत म्हणतात -

इंदिनतै जाना न जावै, तू चिदानंद अलख है ।
स्वसंवेदन करत अनुभव, होत तब प्रत्यक्ष है ॥

अर्थ - आत्मा इंद्रियाकरवी जाणल्या जात नाही. तूं तर इंद्रियास अविषय, अमूर्त चिदानंदस्वरूप आहेस. एकमात्र स्वसंवेदन ज्ञानाने अनुभव आला तेव्हा तो प्रत्यक्ष अनुभवात येतो. ज्ञानाचे परिणमन जर स्वसंवेदन प्रत्यक्ष नसेल तर इष्ट तत्त्वाची सिद्धीच होणार नाही.

अतएव हा आत्मा खऱ्या अर्थाने एकाकी आहे. आत्म्यास एकाकी चेतनमात्र पाहणे हेच सम्यग्दर्शन आहे व जेथे सम्यग्दर्शन आहे तोच जीव पात्र आहे व जेथे सम्यग्दर्शन नाही तो पात्र नसून अपात्र आहे. हे या ३-४ गाथेत सांगितलेले आहे.

एक्कोहं णिम्ममो सुद्धो णाणदंसणलक्खणो । (उपगीति)
सुद्धैयत्तमुवादेयं एवं चिंतेइ संजदो ॥ २० ॥
एकोऽहं निर्ममः सुद्धो ज्ञानदर्शनलक्षणः ।
शुद्धैकत्वमुपादेयं एवं चिंतेइ संजदो ॥ २० ॥

अन्वयार्थ - (अहं एक्को णिम्ममो सुद्धो णाणदंसणलवखणो)(सुद्धैयत्तं उवादेयं एवं संजदो चिंतेई) संयमी साधु हाच एक शुद्ध चेतनमात्र आत्मा आहे. तो सर्व ममत्व परिणामांनी रहित आहे, परसंयोगाने उत्पन्न सर्व विकारापासून रहित शुद्ध आहे व तो ज्ञानदर्शन स्वभावाने परिपूर्ण आहे. असे एकरूप आत्म्याचे स्वरूप आहे. त्या एकरूप चेतनमात्र आत्म्यास स्वीकार करणे ही शुद्ध एकत्व भावना आहे व संयमी, ज्ञानी सदैव एकरूप आत्म्याचीच भावना करतो.

भावार्थ - एकत्व भावनेचे जे प्रथम २-३ गाथेमध्ये स्वरूप सांगितले आहे ते व्यवहाराचे दिग्दर्शन आहे. त्यानिमित्ताने पात्रापात्राच्या स्वरूपाचा विचार करून सम्यग्दर्शनसंपन्न ज्ञानी आपल्या आत्म्यास कशाप्रकारे एकरूप अनुभवतो हे सांगितले व भेदविज्ञानाने प्राप्त होणारे चैतन्यमात्र भावनेचे संस्कार हीच खरी ज्ञानीची एकत्वभावना



आहे. आणि निश्चयाने हेच एकत्वभावनेचे स्वरूप आहे. हे रहस्य पं. जयचंदजी आपल्या बारा भावनेमध्ये एकत्व भावनेच्या दिग्दर्शनामध्ये स्पष्ट करून सांगतात -

परमारथतै आत्मा एकरूपही जोय ।
कर्मनिमित्त विकलप घने, तिन नाशे शिव होय ॥

अर्थ - परमार्थाने म्हणजे ध्रुव स्वभावास स्वीकार करणाऱ्या शुद्धनयाने पाहिले तर खरोखर आत्मा शुद्ध एक चेतनमात्र आहे व त्याचेच संस्कार अविरतपणे आत्म्यावर करावेत. तीच एकत्व भावना आहे. कर्मनिमित्ताने होणारे संकल्प-विकल्प विविध प्रकारचे अनेक आहेत. ते आत्म्याचे अस्थायी रूप आहे. ते आत्म्याचे यथार्थ दर्शन नव्हे. त्यांचा नाश केला तर मोक्षाची प्राप्ती होते. शुद्ध आत्म्याची सिद्धी होते.

●●●

# अन्यत्वानुप्रेक्षा

गाहा -

मादा-पिदर-सहोदर-पुत्त-कलत्तादिबंधुसंदोहो ।
जीवस्स ण संबंधो, णियकज्जबसेण वट्टंति ॥ २१ ॥

मातृपितृसहोदरपुत्रकलत्रादिबंधुसंदोहो ।
जीवस्य न संबंधो निजकार्यवशेन वर्तन्ते ॥ २१ ॥

अन्वयार्थ - (मादापिदरसहोदरपुत्तकलत्तादिबंधुसंदोहो जीवस्स ण संबंधो) माता, पिता, बंधुभगिनी, पुत्र, पत्नी वगैरे नातलगाचा परिकराचा-समूहाचा-जीवासह कोणताही संबंध नाही.(णियकज्जवसेण वट्टंति) ते सर्व आपआपल्या कार्यवश व प्रयोजनवश वागतात.

भावार्थ - जीवाचा स्वभाव-चेतना-आणि संयोगरूप देह या दोन गोष्टी अत्यंत भिन्न आहेत. चेतना-ज्ञान हा जीवाचा लक्षणभूत स्वभाव आहे. ज्ञानामध्ये ज्ञेयरूपाने अवतरणाऱ्या अन्य ज्ञेयपदार्थांचा व आत्म्याचा कोणताही संबंध तत्त्वतः नाही.पदार्थ एकाच समयी ज्ञेयरूपाने परिणमतातच, आत्मा ज्ञानरूपाने परिणमतो हा त्याचा स्वभाव आहे. त्यामुळे तेथे ज्ञेयज्ञायकसंबंधाचा फक्त व्यवहार होतो.या विश्वामध्ये असणाऱ्या सर्व पदार्थासह जे संबंध आणि संयोग दिसून येतात त्याचे मूळ कारण या जीवासह परंपरेने असणारा द्रव्यपर्यायाचा संयोग असून देह त्याच्या आश्रित आहे. त्यामुळेच माता, पिता, भाऊ-बहिण, पुत्र, पत्नी आदि नाती आहेत. तत्त्वतः तर जीवाचा आणि त्यांचा काहीही संबंध नसून त्यामध्ये अत्यंताभाव आहे.प्रत्येक पदार्थ आपल्या द्रव्य-क्षेत्र-कालभावाने अन्य पदार्थापासून अत्यंत भिन्नच आहे.देहाच्या कारणाने नातलग स्वरूपाचा मातापिता, पितापुत्र, पति-पत्नी आदि संबंध मानण्यांत येतात. हे सर्व नातलग आपल्या आपल्या प्रयोजनाने एकत्र येतात, आणि प्रयोजन साधत नाही असे दिसताच, अथवा प्रयोजन संपताच सोडून जातात. कोणताही संयोग स्थायी नाहीच. ज्याप्रमाणे सागरामध्ये अथवा मोठ्या नदीमध्ये दोन ओंडके नियतीने एकत्र येतात व एखादी लाट त्यांना विभक्त करते, पुनः त्यांचा संयोग काकतालीच न्यायाने आहे. नातलग संबंध आहे म्हणून या नात्यागोत्याचा मोहात अडकणे हे अज्ञान असून त्यामुळे या जीवाची सदैव फसगतच होत आलेली आहे.अन्यत्व हे विश्वाचे एकमेव स्थायी रूप आहे.



गाहा -

अण्णो अण्णं सोयदि, मदोत्ति मम णाहयो त्ति मण्णंतो ।
अप्पाणं ण हि सोयदि संसारमहाण्णवे बुड्ढं ॥ २२ ॥

अन्यः अन्यं शोचति, मदीयोऽति, मम नायक इति मन्यमानः ।
अप्पाणं न हि शोचति संसारमहार्णवे बुडितं ॥ २२ ॥

अन्वयार्थ - (मदोत्ति, मम णाहयो ति मण्णंतो) जो मेला तो हा माझा अमुक नात्याचा होता व तो माझा मालक होता असे मानणारा अज्ञानी (अण्णो अण्णं सोचदि) प्राणी हा दुसऱ्याबाबत मात्र शोक करतो परंतु (संसारमहाण्णवे बुड्ढं अप्पाणं हि ण सोयदि) संसाराच्या महासागरामध्ये गटांगळ्या खात असणाऱ्या आपणाबाबत मात्र ते शोक करत नाही. हे केवढे आश्चर्य !

भावार्थ - या संसारामध्ये प्रत्येक प्राणीमात्र शेवटी स्मशानाच्या वाटेनेच जात असतो. ती वाट सदैव वाहती असते. तिला खंड कसा तो नाही ! हे रोजचे या संसाराचे रूप पाहून हा अज्ञानी जो जातो त्याच्या नात्याचे, मालकाचे स्मरण करून त्याबद्दल शोक करतो. परंतु या अनंत जीवाप्रमाणे या जन्ममरणाच्या महासागरात स्वतः बुडालेला आहे. त्याबाबत मात्र तो शोक करत नाही हे केवढे आश्चर्य ! याप्रमाणे संसारी मोही प्राणी या इष्टवियोगामध्ये शोकाने व्याकुळ होत आहे. परिग्रह व संयोगाच्या चिंतेसारखे कोणतेही दुःख नाही. 'या मोही जीवाची गत आ. अमितगती रचित 'योगसार'मध्ये सांगितल्याप्रमाणे असते.....

परस्याचेतनं गात्रं दृश्यते न तु चेतनः ।
उपकारेऽपकारे क्व रज्यते क्व विरज्यते ॥(५ वा अधिकार श्लोक११)

अर्थ - दुसऱ्या जीवाचे जड शरीर व इन्द्रियेच तेवढी दिसून येतात पण त्यामध्ये व्यापून असणारा चेतन दिसून येत नाही. उपकार आणि अपकाराच्या या जंजाळामध्ये राग तरी कुणाशी करावा आणि द्वेष तरी कुणाशी करावा ? रागद्वेष करणे हे केवळ व्यर्थच आहे ! शरीरामुळे तर मित्र शत्रु आदि कल्पना आहेत. उपकार-अपकार हा तर या संसारामध्ये शरीराश्रित आहे. जीवाचा खरा शत्रु-मित्र तो जीव स्वतःच आहे. शरीराची कितीही सेवा केली तरी त्यात आत्म्याचे हित काय आहे? व शरीरामध्ये कोणतेही परिवर्तन घडले त्यात आत्म्याचे नुकसान कोणते? म्हणून उपकार-अपकाराच्या चक्रांत न अडकणे हेच शहाणपणाचे आहे.

गाहा -

अण्णं इमं सरीरादिगं पि जं होज्ज बाहिरं दव्वं ।
णाणं दंसणमादा, एवं चिंतेहि अण्णत्तं ॥ २३ ॥

अन्यमिदं शरीरादिकं अपि यद्भवेत् बाह्यं द्रव्यम् ।
ज्ञानं दर्शनमात्मा एवं चिंतयेदन्यत्वम् ॥ २३ ॥

अन्वयार्थ - (अण्णं इमं सरीरादिगं पि जं होज्ज बाहिरं दव्वं) हे संयोगरूप जे शरीरादिक आहेत आणि शेष जी काही अन्य द्रव्ये आहेत ते सर्व आत्म्यापासून भिन्न आहेत. कारण (णाणं दंसणमादा) आत्मा तर फक्त ज्ञानदर्शन स्वरूप असून हे दृश्य विश्व अचेतन जड व मूर्त आहे. (एवं चिंतेहि अण्णत्तं) याप्रमाणे हे आत्मन् ! अन्यत्वाचे चिंतवन कर !

भावार्थ - लौकिक व्यवहारामध्ये ज्याप्रमाणे स्वपर मानण्यात येते हे तर फक्त व्यावहारिक अन्यत्वाचे स्वरूप आहे. हे अन्यत्वानुप्रेक्षेचे बाह्यरूप मात्र आहे. खरं अन्यत्व तर एक ज्ञानदर्शनस्वरूपी चेतन आत्मा वेगळा असून हे सर्व देहादिक व बाह्य परिग्रह व क्रोधादिक हे भिन्न आहेत, अशा प्रकारचेच मात्र अन्यत्व आहे. हे असे अन्यत्व हे सर्व तत्त्वज्ञानाचे हार्द आहे.पंडित दीपचंदजी व दौलतरामजी अन्यत्व भावनेचे विवेचन करतात.ज़ा तनमें नित जिय वसे न आपनो होय । तो प्रतक्ष जो पर दरब, कैसे अपने होय ॥

अर्थ - ज्या देहपरंपरेमध्ये हा आत्मा राहात आला आहे तो देहच जर आपला नाही, आपणास सोडून जातो तर जे साक्षात् वेगळे पदार्थ आहेत ते आपले कसे होतील ?

जल-पय[९] ज्यो जिय-तन मेला[१०], पै भिन्न भिन्न नही भेला[११] ।
तो प्रगट जुदे धन-धामा[१२], क्यौं है इक मिलि सुत-रामा[१३] ।

पं. दौलतरामजी छहटाळा चाल ५ वी

अर्थ - दूध आणि पाणी यांच्या संयोगाप्रमाणे जीव आणि शरीराचा संयोग आहे; परंतु ते भिन्नभिन्नच आहेत; एकरूप नाहीत. तर प्रत्यक्ष भिन्न धन, घर, पुत्र, पत्नी हे सर्व जीवाचे कसे होऊ शकतील ?

अन्यत्वभावनेचे हार्द पं. जयचंदजी सांगतात -
अपने अपने सत्त्वकुं सर्ववस्तु विलसाय। ऐसे चिंतवै जीव तब परतै ममत न थाय॥

अर्थ - जगातील प्रत्येक वस्तुमात्र आपआपल्या अस्तित्वरूपाने भिन्न भिन्न शोभायमान आहेत. असे हा जीव जेव्हा प्रतीतिपूर्वक चिंतवन करील तेव्हा पराशी ममत्व होत नाही.

९. पय = दूध १०. मेला = मेळ, संकोच ११. भेला = एकरूप १२ धामा = घर १३ रामा = पत्नी.



# संसारानुप्रेक्षा

गाहा - पंचविहे संसारे, जाइ-जरा-मरण-रोग-भयपउरे ।
जिणमग्गमपेच्छंतो जीवो परिभमदि चिरकालं ॥ २४ ॥
पंचविधे संसारे जातिजरामरणरोगभयप्रचुरे ।
जिनमार्गमपश्यन् जीवः परिभ्रमति चिरकालम् ॥ २४ ॥

अन्वयार्थ - (जाइजरामरणरोगभयपउरे पंचविहे संसारे) जन्म, मरण, म्हातारपण, रोग आणि भयाने व्यापलेल्या पाच प्रकारच्या संसारामध्ये (जिणमग्गमपेच्छंतो जीवो चिरकालं परिभमदि) जिनमार्गावर श्रद्धा नसणारा जीव चिरकालपर्यंत परिभ्रमण करतो.

भावार्थ - सर्वज्ञ जिनेन्द्र भगवंतांनी १ शुद्ध आत्मस्वरूपाची श्रद्धा (सम्यग्दर्शन) २ शुद्ध आत्मस्वरूपाचे वेदन (सम्यग्ज्ञान) ३ आणि आपल्या शुद्ध आत्मस्वरूपामध्ये स्थिरता (सम्यक्चारित्र) या रत्नत्रयरूप मार्गाचे अनुसरण केलेले होते. त्याचा परिचय नसणारे जीव जन्म, वृद्धपणा, मृत्यु, रोग व भय यांनी पूरेपूर व्याप्त अशा पाच प्रकारच्या संसारामध्ये चिरकालपावेतो परिभ्रमण करतात. संसार १ द्रव्यपरिवर्तन २ क्षेत्रपरिवर्तन ३ कालपरिवर्तन ४ भवपरिवर्तन व ५ भावपरिवर्तन या प्रकाराने पंचविध आहे. या संसाराचे मूळ कारण रागद्वेषमोह हेच आहे.म्हणुळे रागद्वेषमोहाची परंपरा हाच खऱ्या अर्थाने संसार आहे. अज्ञानी जिनमार्गाच्या विपरीत वागतो. म्हणूनच त्यास या संसारात चिरकाल परिभ्रमण करावे लागते. वस्तुतः तत्त्वासंबंधी विपर्यास हेच अनंतसंसाराचे मूळ कारण आहे.

पंचपरिवर्तनमयी, दुःखरूप संसार ।
मिथ्याकर्म उदय यहे, भरमे जीव अपार ॥

पं. जयचंद्रजी

अर्थ - हा संसार दुःखमय आणि पाच परिवर्तन स्वरूपाचा आहे. याचे मूळ कारण मिथ्यात्व असून त्यामध्ये मिथ्यात्वी भ्रमण करतो.

तसेच भैय्या भगवतीदास सांगतात -

अस संसारभावना ऐंह, परद्रव्यनसो करे जु नेह ।
तूं चेतन वे जडसखंग, तातै तजहुँ परायो संग ॥

अर्थ - आणि संसारभावना म्हणजे परद्रव्यामध्ये स्नेह, रागद्वेष मोह हेच आहे. तू

तर सर्वांग चैतन्यमय आहेस. म्हणून परासह संग सोड !

द्रव्यपरिवर्तनाचे स्वरूप -

गाहा - सव्वे वि पोग्गला खलु, एदे भुत्तुज्झिया हु जीवेण ।
असय अणंतखुत्तो पोग्गलपरियट्टसंसारे ॥ २५ ॥

सर्वेऽपि पुद्गलाः खलु, एते भुक्तोज्झिताः खलु जीवेन ।
असकृदनंतकृत्वा पोग्गल-परिवृत्तसंसारे ॥ २५ ॥

अन्वयार्थ - (हु जीवेण सव्वे वि एदे पोग्गला खलु असय पोग्गलपरियट्टसंसारे अणंतखुत्तो भुत्तुज्झिया)या पंचपरिवर्तन संसारामध्ये खरोखरच या जीवाने हे सर्वच पुद्गल (कर्मपुद्गल आणि २ नोकर्मपुद्गल) वस्तुतः वारंवार अनंतवेळा भोगलेले आहेत.

भावार्थ - आता येथे क्रमशः पाच परिवर्तनरूप संसाराचे स्वरूप सांगणार आहेत. या गाथेमध्ये द्रव्यपरिवर्तनाचे स्वरूप सांगितलेले आहे. द्रव्यपरिवर्तन म्हणजे पुद्गलद्रव्याच्या संयोग बदलत राहणे. कारण जीवाशी फक्त पुद्गल द्रव्याचाच व्यवहाराने परस्परावगाहरूप बंध होतो. ज्याचा संयोग होते ते पुद्गल कर्मपुद्गल आणि नोकर्मपुद्गल याप्रमाणे दोनप्रकारचे आहे. द्रव्यपरिवर्तनाचे १ कर्म-द्रव्यपरिवर्तन व २ नोकर्मद्रव्यपरिवर्तन, असे दोन भेद आहेत.

हा जीव अनादि काळापासून प्रतिसमयाला अनंत ज्ञानावरणादिरूप व अनंत शरीररूप नोकर्मपुद्गलाचे अविरत ग्रहण करतो आहे आणि प्रतिसमय अनंत पुद्गलास सोडतो आहे. त्यापैकी हा जीव प्रतिसमय एक समयप्रबद्धप्रमाण अनंत कर्मपुद्गलांचे ग्रहण करतो व सोडतो. समयप्रबद्ध कर्मपरमाणूंची संख्या अभव्य जीवराशीपेक्षा अनंतपट आणि सिद्ध राशीच्या अनंताव्या भागप्रमाण आहे. पूर्वकाळी ग्रहण केलेले कर्मपरमाणू सत्तेमध्ये असतात, त्यातून प्रतिसमय समयप्रबद्ध परमाणू-उदयाला येवून आत्म्यापासून वियुक्त होतात. याप्रमाणे प्रतिसमयाला जेवढे कर्म पुद्गलपरमाणू व नोकर्म पुद्गल परमाणू बांधतो, त्यांना ग्रहण केल्यापासून तो नोकर्माबाबत आयुस्थिती समाप्त होईपर्यंत नोकर्मवर्गणेचे ग्रहण व सोडणे चालूच असते. परिवर्तनाच्या प्रथम समयामध्ये जेवढे पुद्गलपरमाणू ज्या स्निग्ध, रुक्ष, वर्ण, गंध, रस, स्पर्श तीव्र-मंद-मध्यम भावाने ग्रहण केले गेले असतील तेवढेच त्याच स्वरूपात ज्यासमयात पुनः ग्रहण करण्यात येतील तेव्हा कोठे त्यास एक कर्मद्रव्यपरिवर्तनाचा व एक नोकर्मद्रव्यपरिवर्तनाचा काल म्हटले आहे. मध्यन्तरी अनंतवेळा भिन्न व वेगळ्या परमाणूंचे ग्रहण होते त्याची मोजदाद नसते. जसेच्या तसे पुनः ग्रहण करण्यामध्ये जो अनंतकाळ व्यतीत होतो त्यास एक द्रव्यपरिवर्तन म्हणतात. याप्रमाणे या जीवाने



आता पावेतो अनंत पुद्गलद्रव्य परिवर्तने केली आहेत.

क्षेत्र परिवर्तनाचे स्वरूप सांगतात -

सव्वम्हि लोयखेत्ते, कमसो तं णत्थि जत्थ ण उप्पण्णो ।
ओग्गाहणेण बहुसो, परिभमिदो खेत्तसंसारे ॥ २६ ॥

सर्वस्मिन् लोकक्षेत्रे, क्रमशः तन्नास्ति यत्र नोत्पन्न : ।
अवगाहणेन बहुशः परिभ्रमितः क्षेत्रसंसारे ॥ २६ ॥

अन्वयार्थ - (सव्वम्हि लोयखेत्ते तण्णत्थि जत्थ ण कमसो उप्पण्णो)या संपूर्ण लोकाकाशाच्या क्षेत्रामध्ये असे कोणतेही स्थान नाही की जेथे हा जीव क्रमशः उत्पन्न झालेला नाही(बहुसो ओग्गाहणेण खेत्तसंसारे परिभमिदो)नाना प्रकारची अवगाहना धारण करून या जीवाने या संसारांत अनंत क्षेत्रपरिवर्तने केली आहेत.

भावार्थ - संपूर्ण लोकाकाशाच्या प्रदेशामध्ये असा कोणताही एक प्रदेश नाही की, जेथे हा जीव कितीतरी वेळा उत्पन्न झालेला नाही. लोकाकाशाचे अनंत प्रदेश आहेत. त्याच्या मध्य आठप्रदेशाला व्यापून सूक्ष्म निगोदी लब्ध्यपर्याप्तक जीव जघन्य अवगाहना धारण करून उत्पन्न होतो. त्याच्या अवगाहनेचे क्षेत्रही असंख्य प्रदेशच आहेत. याप्रकारे जेवढे प्रदेश आहेत तितक्या वेळ तर तो तेथे अवगाहना धारण करतोच. मध्यन्तरी अन्य स्थानी जेथे एक प्रदेश अवगाहना वाढली आहे ती प्राप्त करतो व त्याचीच फक्त गणती असते. याप्रमाणे महामत्स्यापर्यंतची उत्कृष्ठ अवगाहना पूर्ण करतो. या क्रमाने याप्रमाणे लोकाकाशाच्या सर्व प्रदेशांना स्पर्श करतो. तेव्हा कोठे एक क्षेत्रपरिवर्तन पूर्ण होते. जसे पाण्याच्या भांड्यामध्ये राख टाकली, मीठ वा साखर टाकली तीही त्या पाण्यात विरघळून जाते. याप्रमाणे अवगाहन शक्तीची विशेषता आहे. एका आकाशाच्या प्रदेशामध्ये अनंत पुद्गल परमाणूंचा अवगाह असतो. तेथेच नाना जीवाचे प्रदेश, धर्मद्रव्य-अधर्मद्रव्याचा एक एक प्रदेश, एक कालाणु द्रव्य व सूक्ष्मपरिणत स्कंध हे सर्व त्या आकाशाच्या एका प्रदेशामध्ये अवगाहना करतात ही सर्वद्रव्यांच्या अवगाहन शक्तीची विशेषता आहे. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याच्या अवगाहनेस प्रतिबंध करत नाही. अशीच सर्व द्रव्यांची स्वयं योग्यता आहे, त्यास अवगाहनत्व शक्ती म्हणतात.

आता कालपरिवर्तनाचे स्वरूप सांगतात -

उवसप्पिणि - अवसप्पिणि-समयावलियासु णिरवसेसासु ।
जादो मुदो य बहुसो, परिभमिदो कालसंसारे ॥ २७ ॥

उत्सर्पिण्यवसर्पिणिसमयावलिकासु निरवशेषासु ।

जातो मृतश्च बहुशः परिभ्रमितः कालसंसारे ॥ २७ ॥

अन्वयार्थ - (उवसप्पिणिअवसप्पिणि-निरवसेसासु-समयावलियासु जीवो बहुसो जादो व मुदो) उत्सर्पिणी आणि अवसर्पिणी कालाच्या संपूर्ण समयावलिमध्ये हा जीव अनेक वेळा जन्मलेला आणि मेलेला आहे(कालसंसारे परिभमिदो)याप्रमाणे हा जीव या संसारात नाना कालपरिवर्तन करतो आहे.

भावार्थ - उत्सर्पिणी तसेच अवसर्पिणी कालाच्या प्रथमसमयापासून अंताच्या समयापर्यंत हा जीव अनुक्रमाने त्या कालाच्या सर्व समयामध्ये उत्पन्न झालेला आहे आणि मरणही पावलेला आहे.

जर कोणी जीव दहा कोडाकोडी सागरप्रमाण उत्सर्पिणीच्या प्रथम समयामध्ये जन्म पावला, नंतर पश्चात् तो भाविउत्सर्पिणीच्या द्वितीय समयामध्ये जन्म पावला, तसेच तिसऱ्या समयामध्ये जन्म पावला तर याच क्रमाने उत्सर्पिणीच्या अंतिम समयापर्यंत जन्म घेईल आणि जर मध्यंतरी अन्य समयामध्ये क्रम सोडून जन्म घेईल तर त्याची तर गिनतीच नाही. या प्रकारे अवसर्पिणीच्या दहा कोडाकोडी सागराचा काल पूर्ण करून जन्म-मरण करील तर तो कालही अनंतच आहे. एवढ्या काळानंतर तो पुनः उत्सर्पिणीच्या प्रथम समयांत जन्म घेण्यापूर्वीपर्यंत जो काळ तो काळ एका कालपरिवर्तनाचा आहे. या कालपरिवर्तनामध्ये, असंख्य क्षेत्रपरिवर्तन व एका क्षेत्रपरिवर्तनामध्ये असंख्य द्रव्यप्रतिवर्तने होतात.

गाहा - णिरयाउजहण्णादिसु, जाव दु उवरिल्ल या दु गेवेज्जा ।
मिच्छत्तसंसिदेण दु बहुसो वि भवट्ठिदि भमिदो ॥ २८ ॥

नरकायुजघन्याधिके यावत्तु उपरितनास्तु ग्रैवेयकाः ।
मिथ्यात्वसंश्रितेन बहुशोऽपि भवस्थितिः भ्रमितः ॥ २८ ॥

अन्वयार्थ - (मिच्छत्तसंसिदेण जीवेण दु णिरयाउजहण्णादिसु जाव दु उवरिल्लिया दु गेवेज्झा) हा संसारी जीव मिथ्यात्वाच्या संबंधाने नरकाच्या जघन्य आयुपासून तो उपरिम ग्रैवेयकापर्यंत(भवट्ठिदि भमिदो) अनेकदा सर्व भवस्थितिमध्ये भ्रमण करून चुकलेला आहे.

भावार्थ - मिथ्यादृष्टी जीव पंचपरिवर्तनरूप संसारामध्ये अनादि काळापासून भटकत आलेला आहे. कारण अनंत संसारास कारणभूत कर्माच्या बंधाचे मूळ कारण एक मिथ्यात्व आहे. मिथ्यात्वाच्या कारणानेच कषाय, अविरति, प्रमाद व योगांची मूलतः उत्पत्ती आहे, म्हणून तो योगद्वारा कार्मण वर्गणेचे ग्रहण करतो आहे. मिथ्यात्व आस्रवबंधाचा मूळ स्रोत (उगम) आहे व मिथ्यात्वच आस्रवबंधाची परंपरा अविरत



चालू ठेवते. मिथ्यात्व कषाय हे स्थितिबंधाचे हेतु आहेत. मूलाचार गाथा ९६८ च्या टीकेत सांगितले आहे -" भावनिमित्तो भावहेतुको बंधः संश्लेषः स्थित्यनुभागरूपः । स्थित्यनुभागौ कषायतः'' इति वचनात् 'अथ को भावः ?'' इति प्रश्ने 'भावो रागद्वेषमोहयुक्तो मिथ्यात्वासंयमकषायः इत्यर्थः । 'यांचा अर्थ - भावाच्या निमित्ताने बंध होतो, तो स्थिति-अनुभाग स्वरूपाचा आहे. भाव म्हणजे मिथ्यात्व, असंयम व कषाय हे तिन्ही आहेत. अनंत संसारस्थितिमध्ये मिथ्यात्वच प्रधान हेतु आहे. एक मिथ्यात्वच एक मोह राग-द्वेषरूपाने विभाजित होते.

नरकगतीची जघन्य आयुस्थिति दहा हजार वर्षे शास्त्रामध्ये सांगितलेली आहे. त्याचे जेवढे समय आहेत तितक्या वेळा आयुची जघन्य स्थिति प्राप्त करून जन्म घ्यावा, तदनंतर एक, दोन समय या क्रमाने वृद्धि करून तेहतीस सागर आयु पूर्ण करतो. याचप्रमाणे देवगतीचे ही जघन्य आयुष्य दहा हजार वर्षे व उत्कृष्ठ फक्त ३१ सागर आहे. कारण मिथ्यादृष्टी नऊ अनुदिश, पाच अनुत्तर विमानामध्ये उत्पन्नच होत नाही. मध्यंतरी तर कमी वा अधिक आयुष्याचे भव प्राप्त झाले तरी ते मोजणींत घ्यावयाचे नाहीत. याचप्रमाणे तिर्यंच गतीतील जघन्य आयुष्य अंतर्मुहूर्त आणि उत्कृष्ट आयु तीन पल्य पूर्ण करतो. मनुष्यगतीची जघन्य आयुस्थिति अंतर्मुहूर्त व उत्कृष्ट स्थिती तीन पल्ये आहेत. यानंतर तो देवगतीतील आयु पूर्ण करेल. नऊ अनुदिश व पंचोत्तर विमानातील देव नियमाने अल्पावधीत मोक्ष प्राप्त करतातच. म्हणून भवपरिवर्तनामध्ये त्याची गिनती नाही. याप्रमाणे एवढे एक भवपरिवर्तन आहे. एका भवपरिवर्तनामध्ये असंख्य कालपरिवर्तने होतात. पहिल्या तीन परिवर्तनाबाबत मागील सूत्रात सांगितलेलेच आहे.

भावपरिवर्तनाचे स्वरूप

सव्वे पयडिट्ठिदिओ, अणुभागपदेसबंधठाणाणि ।
जीवो मिच्छत्तवसा, भमिदो पुण भावसंसारे ॥ २९ ॥

सर्वाः प्रकृतिस्थितयोऽनुभागप्रदेशबंधस्थानानि ।
जीवः मिथ्यात्ववशो, भ्रमितः पुनः भावसंसारे ॥ २९ ॥

अन्वय - (जीवो सव्वे पयडिट्ठिदिओ अणुभागप्रदेसबंधस्थानानि (पत्ता) मिच्छत्तवसा भावसंसारे भमिदो) या जीवाने संपूर्ण कर्मप्रकृतींच्या सर्वच स्थिति, अनुभागबंधस्थान तसेच सर्वच प्रदेशबंधस्थान यांना प्राप्त केले आहे. हा जीव मिथ्यात्वाच्या आधीन होऊन वारंवार भावसंसारामध्ये परिभ्रमण करतो.

भावार्थ - या जीवाने मिथ्यात्वाच्या वश होऊन आठही कर्मांचे प्रकृतिबंध,

स्थितिबंध, अनुभागबंध व प्रदेशबंधाची सर्वच स्थाने फिरून भावपरिवर्तनमय संसारामध्ये परिभ्रमण केलेले आहे.

कर्माच्या स्थितिबंधास कारण जीवाचे कषाय भाव असंख्यात लोकप्रमाण आहेत. त्यातही एक स्थितिबंधस्थानामध्ये अनुभागबंधास कारणभूत कषायाची स्थाने असंख्यात लोकप्रमाण आहेत. जे योगस्थान आहेत ते जगतश्रेणीच्या असंख्याताव्या भागप्रमाण आहेत. संज्ञी पर्याप्तक मिथ्यादृष्टी जीव आपणास योग्य सर्व जघन्य ज्ञानावरण कर्माच्या प्रकृतीची स्थिती अंतःकोडाकोडी सागरप्रमाण बांधतो. त्याचे कषायाचे स्थान असंख्यात लोकप्रमाण असतात. त्यातील सर्वात जघन्य स्थान एकरूप होतात. त्या एका स्थानामध्ये अनुभागबंधास कारण स्थान असंख्यात लोकप्रमाण आहेत. त्यापैकी एक सर्व जघन्यरूप परिणमतो. त्यामध्ये स्वयोग्य जगतृश्रेणीच्या असंख्याताव्या भागप्रमाण योगस्थान अनुक्रमाने पूर्ण करतो. याचप्रकारे असंख्यात लोकप्रमाण अनुभागस्थान अनुक्रमाने पूर्ण करतो. याच पूर्वोक्त क्रमाने कषायस्थान पूर्ण करतो. याप्रकारे दोन समय अधिक जघन्य स्थितीपासून प्रारंभ करून तीस कोडाकोडीसागरपर्यंत ज्ञानावरण कर्माची स्थिती पूर्ण होते. याचप्रकारे सर्व मूलकर्मप्रकृति तसेच उत्तर कर्मप्रकृतींचा क्रम समजून घ्यावा.

याप्रकारे कर्माचे परिणमन होत असतांना अनंत काळ व्यतीत होतो. या सर्वास एकत्र केले असतांना एक भावपरिवर्तन होते. याप्रमाणे हा जीव अशी भावपरिवर्तने अनादि संसारात भोगत आलेला आहे. या सर्वभावामध्ये सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र सोडून असा कोणताही भाव शिल्लक नाही की तो जीवाने केला नाही.

या भावपरिवर्तनाचा काळ सर्वात मोठा आहे. एका भाव परिवर्तनामध्ये असंख्य भवपरिवर्तने होतात. एका भवपरिवर्तनामध्ये असंख्य क्षेत्रपरिवर्तने होतात. व एका क्षेत्रपरिवर्तनामध्ये असंख्य द्रव्य परिवर्तने होतात.

संसारात परिभ्रमणाचे कारण -

**पुत्तकलत्तणिमित्तं अत्थं अज्जयदि पावबुद्धीए ।**
**परिहरदि दयादाणं सो जीवो भमदि संसारे ॥ ३० ॥**

पुत्रकलत्रनिमित्तमर्थमर्जयति पापबुद्ध्या ।
परिहरति दयादानं सो जीवो भ्रमति संसारे ॥ ३० ॥

अन्वयार्थ - (पावबुद्धीए पुत्तकलत्तनिमित्तं अत्थं अज्जयदि) मोही जीव पापबुद्धीने पुत्र-पत्नी आदींच्या मोहाने धनाचे अर्जन [कमाई] करतो(दयादाणं परिहरदि) दया आणि दानापासून मात्र विमुख राहतो(सो जीवो संसारे भमदि)तो जीव संसारामध्ये भ्रमण करतो.

भावार्थ - हा जीव अनादि काळापासून मोहाने ग्रस्त आहे. त्यामुळे भव धारण करतो. भवात देह प्राप्त झाल्यामुळे पिता, पुत्र, माता आदि नाती उत्पन्न झालेली दिसून येतात. देह आणि भव यामध्ये त्याची आत्मत्वबुद्धी असते. देह आणि भवाच्या ममत्वाने तो नात्यागोत्याच्या व्यामोहामध्ये फसतो. आणि पुत्र, पत्नी यांच्या व्यामोहाने ग्रस्त हा अज्ञानी प्राणी त्यांना सुखी राखण्यासाठी, त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी नानाप्रकारची पापे करूनही धनासाठी वाटेल ते कष्ट उपसतो; पापाचे ही भय राखत नाही. याप्रमाणे पैसा धनधान्यादि परिग्रहाच्या संग्रहामध्ये सारखा गुंतून पडला आहे.

या जगव्यवहारामध्ये रस घेतो, धनार्जनामध्ये अंध होऊन दीनदुःखी जीवांचा कणव ही करत नाही; मिथ्यात्व आणि कषायांनी आकुल आपल्या आत्म्याचीही त्यास करुणा वाटत नाही. न स्वदया न परदया ! दयाच नसल्यामुळे दुःखी जीवाचे दुःख दूर करण्यासाठी दानही देत नाही, संतोषामृताचे पान करून आत्म्यास, समाधानाने दानाने सुखी करत नाही. असा जीव या संसारामध्ये भ्रमण करतो.

दामविना निर्धन दुःखी तृष्णावश धनवान ।
कहूं न सुख संसारमे सब जग देख्यो छान ॥ कवि भूधर दास

अर्थ - धनादिसामग्रीविना दरिद्री निर्धन दुःखी आहेत; अति तृष्णावश धनिकांना समाधान नसल्याने तेही दुःखीच आहेत. याप्रमाणे सर्व संसारांत शोधून पाहले तरी सुखी जीव दिसत नाहीत. सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ॥ ज्ञानीला संसारातील दुःखाने दुःखी जीवांचा कणव येतो आणि दुःख दूर करण्यासाठी दान देतो हा व्यावहारिक धर्म आहे.

दान चार परकार, चार संघको दिजिए ।
धनबिजुली उनहार नरभव लाहो लिजिए ॥

अर्थ - चतुर्विध संघाला चार प्रकारचे दान देणे हा व्यवहार त्याग आहे.धनाचा योग हा विजेच्या टणत्काराप्रमाणे क्षणमात्र आहे. दानांतच लक्ष्मीचे साफल्य आहे. दान देऊन मानवजन्म सफल करणे हा गृहस्थासाठी त्यागधर्म आहे.

**मम पुत्तं मम भज्जा मम धणधण्णोत्ति तीव्वकंखाए ।**
**चइउण धम्मबुद्धिं, पश्चा परिपडदि दीहसंसारे ॥ ३१ ॥**

मम पुत्रो मम भार्या मम धनधान्यमिति तीव्रकांक्षया ।
त्यक्त्वा धर्मबुद्धिं, पश्चात् परिपतति दीर्घसंसारे ॥ ३१ ॥

अन्वयार्थ - (मम पुत्तं मम भज्जा मम धणधण्णोत्ति तीव्वकंखाए)माझा (धम्मबुद्धिं चइऊण) मुलगा, माझी भार्या, माझे धनधान्य अशा तीव्र मोहाने, इच्छेने हा अज्ञानी जीव धर्मबुद्धी सोडून देतो. (पश्चा दीहसंसारे परिपडदि) तदनंतर त्यामुळे या दीर्घ संसारसागरामध्ये गटांगळ्या खातो.

भावार्थ - या संसारात मोहाने अंध प्राणी क्षणिक नात्यागोत्यामध्ये अडकून पडतो. माझा मुलगा, माझी पत्नी, माझा पैसा-धान्य अशा तीव्र मोहाने-इच्छेने व्याकुळ होतो. मोहाचा पगडा एवढा जबरदस्त असतो की, त्याला मानवता व धर्माचीही भावना राहात नाही. त्यामुळे तो या दीर्घसंसारामध्ये सारखा भटकत आहे. परद्रव्य आणि परिग्रह व आप्तपरिवार यासंबधी आत्मत्वबुद्धी हा तर खरा संसार आहे.

पं. जयचंदजी छाबडा संसारानुप्रेक्षेचे रहस्य सांगतात की,

परद्रव्यनतै प्रीत जो सो है संसार अबोध ।
ताको फल गति चार में भ्रमण कह्यो श्रुतशोध ॥

अर्थ - परद्रव्यामध्ये प्रीतिभाव हाच अज्ञानमय संसार आहे. त्या अज्ञानाचे फल म्हणजेच चार गतीमध्ये भ्रमण आहे असे शास्त्रे सांगतात.

या मोहरूप अज्ञानमय संसारातून सुटकेचा मार्ग म्हणजे सम्यग्दर्शनज्ञानचारित्र हाच आहे. कवि मंगतराय चक्रवर्तीच्या भावनेमध्ये सांगतात -

सम्यग्दर्शन-ज्ञान-चरण-तप, ये जिय के हितकारी ।
यही सार, असार और सब, यह चक्री चित धारी ॥

अर्थ - ''सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र हे रत्नत्रय आणि यथार्थ तप हेच खरोखर जीवाला हितकारी आहेत. कारण त्यामुळे मोहान्धःकार दूर होतो. आकुलता नष्ट होऊन खरे सुख मिळते. म्हणून रत्नत्रय आणि तप हे मनुष्यभवाचे सारसर्वस्व असून बाकी सर्व असार आहे'' असा चक्रवर्तीने मनामध्ये निर्धार केला.

मिच्छोदयेण जीवो णिंदंतो जोण्हभासियं धम्मं ।
कुधम्म - कुलिंग-कुतित्थं मण्णंतो भमदि संसारे ॥ ३२ ॥

मिथ्यात्वोदयेन जीवः निन्दन् जैनभाषितं धर्मम् ।
कुधर्म-कुलिंग-कुतीर्थं मन्यमाणो भ्रमति संसारे ॥ ३२ ॥

अन्वयार्थ - (मिच्छोदयेण जोण्हभासियं धम्मं णिंदंतो जीवो)मिथ्यात्वाच्या उदयाने जिनांनी सांगितलेल्या धर्माची निंदा करणारा हा प्राणी(कुधम्म-कुलिंग-कुतित्थं मण्णंतो) खोटा धर्म, खोटा वेष (लिंग) व खोटे तीर्थ यांना मानतो तो(संसारे भमदि) तो या संसारामध्ये भ्रमण करतो.



भावार्थ - हा संसार दुःखाने भरलेला आहे.

चहुगति दुःख जीव भरे है । परिवर्तन पंच करे है ।
सबविधि संसार असारा, यामें सुख नाही लगारा ॥ पं. दौलतरामजी छहदाला पाचवी ढाल

अर्थ - चारही गतीमध्ये जीवमात्र दुःख नाईलाजाने सहन करतात, पाच परिवर्तनरूप संसारात भ्रमण करतात. हा संसार सर्वप्रकारे निःस्सार आहे. यांत सुख अणुमात्रही नाही.

अशा दुःखरूप संसाराचे मूळ कारण म्हणजे अज्ञानी तत्त्व समजून न घेता अतत्त्वाला तत्त्व मानतो, रागद्वेष व मोह तसेच परिग्रहाच्या पोषक खोट्या धर्माला यथार्थ धर्म मानतो; वस्त्रधारी, ज्ञानध्यानरहित कषायांनी रंगलेल्या खोट्या साधूंना साधू मानतो; तसेच रागरूप असमीचीन मोक्षमार्गाला (तीर्थाला) समीचीन मोक्षमार्ग मानतो. असा हा देवगुरुशास्त्र व तत्त्वविषयक विपर्यास हेच तर मिथ्यात्वाच्या उदयाचे काम आहे. त्यामुळे तो मिथ्यात्वाने पछाडलेला जीव जिनदेवांनी सांगितलेल्या समीचीन धर्माची निंदा करतो व तो संसारामध्ये भ्रमण करतो.

केवलिश्रुतसंघ-धर्मदेवावर्णवादो दर्शनमोहस्य । तत्त्वार्थसूत्र अ. ६ सूत्र १३ केवली, जिनशासन, जैन चतुर्विध संघ, जिनधर्म व जिनदेव यांचा अवर्णवाद म्हणजे निंदानालस्ती हे दर्शनमोहाच्या बंधाचे कारण आहे.

वस्तुतः कोणतीही वस्तु स्वभावाने चांगली वाईट नाही. वस्तु स्वभावाने तर आहे तशीच आहे. अज्ञानी निष्कारण खोटे विकल्प करून अनंतसंसारास कारणभूत कर्माचा बंध करतो. म्हणूनदेवगुरुशास्त्र व तत्त्वांचा यथार्थ निर्णय करावा.

हंतूण जीवरासिं, महुमंसं सेविउण सुरपाणं ।
परदव्वं परकलत्तं, गहिउण य भमदि संसारे ॥ ३३ ॥

हत्वा जीवराशिं, मधुमांसं सेवित्वा सुरापानम् ।
परद्रव्यं परकलत्रं, गृहीत्वा च भ्रमति संसारे ॥ ३३ ॥

अन्वयार्थ - (हंतूण जीवरासिं)अनेक त्रसजीवांचा व निष्प्रयोजन स्थावर जीवांचा व्यर्थ घात करून, (मधुमंसं सुरपाणं सेविउण)मध व मांसाचे दारूचे सेवन करून(य परदव्वं परकलत्तं गहिउण) तसेच परद्रव्य व परधनाचे अपहरण करून व परस्त्री सेवन करून हा व्यसनासक्त जीव (संसारे भमदि) या संसारामध्ये भ्रमण करतो.

भावार्थ - जो त्रसजीव व स्थावर जीवांची निष्कारण हिंसा करतो; मध वा मांस भक्षण करतो; मद्यपान करतो; पराच्या संपत्तीचे हरण करतो; परस्त्रीचा भोग घेतो

तो व्यसनाधीन होतो, या गोष्टी त्याच्या इतक्या अंगवळणीं पडल्या असतात की त्यास याविना चैन पडत नाही व यात आपण अधर्ममार्गाकडे वळतो आहोत याची कल्पनाही त्याला शिवत नाही. विपरीत मान्यता असणाराच अशी खोटी कामे करू शकतो. तो निश्चितपणे या भयानक संसारामध्ये परिभ्रमण करतो. सदाचारी ज्ञानी धर्मात्मा अन्याय करत नाही, तसेच अभक्ष्य पदार्थांचे सेवनही करत नाही. तो हिंसादि पापामध्ये लिप्त न होता लोकनिंद्य कषायांची प्रवृत्ती करत नाही.अभिप्रायामध्ये क्रोध-मान-माया-लोभ यांना इष्ट व आपला स्वभाव मानत नाही. उपादेय मानून कषायात आनंद घेणे हेच अनंतानुबंधी कषाय आहेत. ज्ञानी त्या अनंतानुबंधी कषायांच्या वश होत नाही. ही व्यसनाधीनता व कषायप्रवृत्ती अज्ञानीचा असा सहजभाव असतो की यात त्याला आपले नुकसान वाटतच नाही.

ही सर्वच व्यसने दुःखाचे जनक आहेत. जुवा, शिकार, चोरी, वेश्यागमन हीही व्यसने असून दुःखकारी, पापरूप व दुर्गतीस कारण आहेत. वस्तुतः पापाच्या उदयात हार व पुण्याच्या उदयात जीत मानणे हाच जुगार आहे; शरीरामध्ये आसक्ती तत्त्वतः मांससेवन आहे; मिथ्यात्वाच्या नशेत राहणे हीच नशा आहे; आत्मविस्मृति हे मद्यसेवन आहे; कुमार्गाने जाणे हे वेश्यागमनासारखे निंद्य कार्य आहे. या सर्व गोष्टी आत्मज्ञानापासून वंचित करतात.

जदणेण कुणइ पावं, विसयणिमित्तं हि अहनिसं जीवो ।
मोहंधयारसहिओ तेण दु परिपडदि संसारे ॥ ३४ ॥

यत्नेन करोति पापं विषयनिमित्तं हि अहर्निशं जीवः ।
मोहान्धकारसहितः तेन तु परिपतति संसारे ॥ ३४ ॥

अन्वयार्थ - (हि मोहंधयारसहिओ जीवो विसयणिमित्तं जदणेण अहनिसं पावं कुणइ) मोहाच्या अंधःकारांत खिचपत पडलेला हा प्राणी पाच इंद्रियांचे विषय व परिग्रहाकरितां वाटेल ते निंद्य कार्य करतो(दु तेण संसारे परिपडदि)परंतु त्याचमुळे तो संसारामध्ये परिभ्रमण करतो.

भावार्थ - मोहाने व्याप्त जीवच अज्ञानाने रात्रंदिवस विषयाधीन होतो, भोगांच्या प्राप्तीस्तव वाटेल ती पापे करतो. तो जे कांही नाना वेष धारण करतो, त्यामध्ये लीन होतो. त्या भवरूपच स्वतःला मानतो. नरक, मनुष्य व तिर्थंच गतीमध्ये तर त्याचे प्रयत्न निष्फळ होऊन जीव अत्यंत कष्टी होतो. परंतु देवगतीमध्ये सांसारिक सुखाची अधिकता दिसून आली तरी अभिप्रायामध्ये तर विषयसेवनामध्ये रुचि असल्याने दंग राहतो, अभिप्राय तर तोच असतो. देवांगनांच्या वियोगाचे दुःख आहे. अन्य देवांचे



वैभव पाहून आतल्या आत जळतच असतात. तेथेही आकुलता तर कधी विशेषरूपाने दिसून येते. विषयसुखासाठी कोणतेही पाप करण्याचे भय नसते. त्याला तर संसारात भटकण्याशिवाय अन्य पर्यायच नसतो.

लोकस्वरूप विचारिके, आत्मरूप निहार ।
परमारथ व्यवहार मुनि, मिथ्याभाव निवार । पं. जयचंद्रजी

अर्थ - या संसाराच्या व विश्वाच्या स्वरूपाचा विचार करून आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाचे दर्शन घ्यावे. परमार्थ आणि व्यवहार या दोहोस ही जाणून मिथ्यात्व भावांचा त्याग करावा.

संजोगविप्पजोगं, लाहालाहं सुहं य दुक्खं य ।
संसारे भूदाणं, होदि हु माणं तहावमाणं च ॥ ३५ ॥

संयोगविप्रयोगौ, लाभालाभौ, सुखं च दुःखं च ।
संसारे भूतानां, भवति खलु मानं तथा च अपमानम् ॥ ३५ ॥

अन्वयार्थ - (संसारे भूदाणं)या संसारामध्ये जीवमात्रांना(संजोगविप्पजोगं)संयोग व वियोग तसेच(लाहालाहं) लाभ आणि अलाभ (च सुहं च दुक्खं) सुख आणि दुःख तद्वतच (माणं च तहावमाणं हु होदि) मान आणि अपमान याचे द्वैत सदैव पिच्छा पुरवीत असते.

भावार्थ - या संसारात तिर्यंचापासून तो चक्रवर्तीपर्यंत सर्वच जीवमात्रांना सुख व इष्टमित्रांचा संयोग तसेच दुःख व इष्टवियोग याचे द्वैत व्याकुळ करीतच असते; त्याचप्रमाणे सुखाची प्राप्ती व अप्राप्ती याचीही रात्रंदिवस आकुलता असतेच; कधी इष्ट पदार्थांचा लाभ व तर कधी अलाभ यामुळे सारखी आकुलता असते; तर मानापमानाचेही शल्य या सर्वांना सारखे टोचतच असते. संसाराची ही विचित्रता प्रत्यही अनुभवास येते की, कोठे पुत्र जन्माचा आनंद तर कोठे मृत्युमुळे रडारड चालू असते; सन्मानाचे आयोजन व अपमानाची टोचणी व्यथित करत असते; संसाराचे स्वरूप हे असंच आहे. संसाराचे चित्र कवि भूधरदास रंगवितात की,

चौदहराजुउतंग नभ, लोक पुरुष संठान ।
तामें जीव अनादितै, भरमत है बिन ज्ञान ॥

अर्थ - चौदा राजूप्रमाण उंच हा लोक पुरुषाकार आहे. त्यामध्ये हा संसारी प्राणी अनादि काळापासून आत्मज्ञान व तत्त्वज्ञानाशिवाय भ्रमाने गोते खात आहे.

कम्मणिमित्तं जीवो, हिंडदि संसारघोरकंतारे ।
जीवस्स ण संसारो, णिच्छयणयेण कम्मणिम्मुक्को ॥ ३६ ॥

कर्मनिमित्तं जीवः हिण्डति संसारघोरकान्तारे ।
जीवस्य न संसारो, निश्चयनयेन कर्मनिर्मुक्तो ॥ ३६ ॥

अन्वयार्थ - (जीवो कम्मणिमित्तं संसारघोरकंतारे हिंडदि) हा जीव कर्माचे निमित्ताने कर्माच्या, सुखदुःखाच्या लक्ष्याने या संसाररूप घनघोर अरण्यामध्ये इतस्ततः भटकतो आहे. परंतु(णिश्चयणयेण जीवस्स संसारो ण) तत्त्वदृष्टीने, स्वभावदृष्टीने पाहले तर जीव तर एक उपयोग लक्षणमात्र दिसून येतो. संसारदशा दिसून येत नाही. (कम्मणिम्मुक्को) सदैव कर्मांनी रहित, एक शुद्धच आहे. कारण जीव आणि कर्मपुद्गल या दोहोमध्ये अत्यंताभाव आहे. दोहोची ही सत्ता सर्वथा पृथक असून ते परस्पर संयोगाने रहितच आहेत. त्यांची भिन्नता हे अंतिम शाश्वत सत्य आहे.

भावार्थ - अनादि काळापासून हा जीव व्यवहाराने कर्मांनी बद्ध दिसून येतो व त्यास परंपरेने नोकर्माचा संयोगही दिसून येतो. त्यास निमित्त कर्मोदयाच्या लक्ष्याने होणारे रागद्वेषादि विकारच आहेत. आत्मा स्वरूपानेच जड कर्मापासून अत्यंत भिन्न आहे. आत्मा आणि कर्म यामध्ये अत्यंताभाव आहे. कर्माचे बंधन हे आत्म्यासाठी यथार्थ बंधन नसून जीव आपल्या रागादि परिणामांनी बद्ध आहे. परंतु रागनिमित्ताने आत्मप्रदेशांत कर्मस्कंध दिसून येतात. म्हणून आत्मा कर्मांने बद्ध आहे असे व्यवहाराने म्हटले जाते.

परंतु ज्याप्रमाणे अखंड स्वच्छ प्रवाह या दृष्टीने गंगेकडे पाहिले तर तो स्वच्छ जलप्रवाहच आहे. त्यात मलिनता अनुभवाला येतच नाही. त्याचप्रमाणे आत्म्याकडे द्रव्यस्वभावदृष्टीने पाहले तर तो चेतनमात्र, ज्ञायकमात्र अनुभवास येतो. कारण जीव अनादिकाळापासून चेतनमात्र असून चेतन राहणारच आहे. द्रव्यपर्यायदृष्टीने व कर्मसंयोगदृष्टीने पाहले तर मनुष्यादि गती व रागद्वेषादि विकार ज्ञात होतात. कारण ते एक क्षणमात्र दिसून येतात व उत्तरक्षणी त्यांचा व्यय होतो. परंतु स्वभावदृष्टीने रागादि विकार अनुभवात येतच नाहीत. पं. बनारसीदास समयसार नाटकामध्ये सांगतात की -

विवहार दृष्टी सो विलोकत बंध्यो सो दिसे ।
निहचै निहारत ण बंध्यो यह कित्ति है ॥

अर्थ - व्यवहाराने पाहिले तर आत्मा कर्मबद्ध दिसून येतो. परंतु निश्चयाने पाहले तर तो बंधरहित विकाररहित दिसून येतो.

आ. कुंदकुंददेव समयसारमध्ये हेच सांगतात की -

अहमिक्को खलु सुद्धो णाणदंसणमइओ सदारूवी ।



ण वि अत्थि मज्झ किंचि वि अण्णं परमाणुमेत्तं पि ॥ ३८ ॥

अर्थ - मी सदैव स्वरूपाने एक चेतनामात्र आहे. नरनारकादि द्रव्यपर्यायांनी रहित असल्याने शुद्ध आहे; ज्ञान-दर्शन चेतनास्वरूप आहे; व स्पर्श, रस, गंध, वर्ण यांनी रहित आहे म्हणून अरूपी आहे. अन्य परमाणू एवढेही कोणतेही परद्रव्य माझे किंचिन्मात्र नाही.

आता संसारानुप्रेक्षेचा समारोप करतात -

संसारमदिक्कंतो जीवोवादेयमिदि विचिंतिज्जो ।
संसारदुहक्कंतो जीवो सो हेयमिदि विचिंतिज्जो ॥ ३७ ॥
संसारमतिक्रान्तो जीवः उपादेयमिति विचिन्तनीयम् ।
संसारदुःखाक्रांतो जीवः स हेयमिति विचिन्तनीयम् ॥ ३७ ॥

अन्वयार्थ - (संसारमदिक्कंतो जीवोवादेयमिदि विचिंतिज्जो) संसारापासून मुक्त जीव हाच उपादेय आहे असे अविरत चिंतन करावे.(संसारदुहक्कन्तो जीवो सो हेयमिदि विचिंतिज्जो) तसेच संसारदुःखाने संतप्त प्राणी हा हेय आहे असे अखंड चिंतवत करावे.

भावार्थ - शुद्ध चैतन्यस्वभावाच्या आश्रयाने होणारा श्रद्धा-ज्ञान-चारित्राचा परिणाम हाच एकमेव मोक्षमार्ग आहे. मोक्षमार्गामध्ये तर अशुभ उपयोगाचा पापाचा विचारही करावयास नको. परंतु दया, दान, पूजा, पंचकल्याण प्रतिष्ठा आदि शुभोपयोग हाही मोक्षमार्ग नाही. कारण अशुद्धोपयोग हा परद्रव्यप्रवृत्त परिणाम आहे. अशुभोपयोग आणि शुभोपयोग दोन्ही परद्रव्यप्रवृत्त परिणाम असल्यामुळे दोन्ही अशुद्धोपयोग रूपच आहेत. ते मोक्षमार्ग कसे असू शकतील ? म्हणून शुद्ध सिद्धपर्याय साध्य असून शुद्धोपयोगच साधन आहे. म्हणून दोन्ही उपादेय आहेत. परंतु शुभाशुभ उपयोग हा आस्रवबंध व संसाराचे कारण आहे. म्हणून दुःखाने पीडित, त्रस्त आत्मा व त्यास कारणभूत अशुद्धोपयोग दोन्हीही हेय आहेत असे नेहमी चिंतन करावे. त्यामुळे शुद्ध आत्मा व शुद्धोपयोगावरील आस्था व निष्ठा कायम राहील व मोक्षसुखाची साधना अखंड चालू राहील व रागादिकाबाबत परत्वाची भावना दृढ झाल्यामुळे रागादिविकारामध्ये व संसारामध्ये रस व रूचि राहणार नाही. म्हणून असे चिंतन नेहमी करावे.

●●●

# लोकानुप्रेक्षा

जीवादिपयट्ठाणं समवाओ सो णिरुच्चए लेगो ।
तिविहो हवेइ लेगो अहमज्झिमउड्ढभेयेण ॥ ३८ ॥
जीवादिपदार्थानां समवायः स निरुच्यते लोकः ।
त्रिविधो भवति लोकोअधोमघ्यमोर्ध्वभेदेन ॥ ३८ ॥

अन्वयार्थ - ((जो) जीवादिपयट्ठाणं समवाओ सो णिरुच्चए लेगो जीवादि सर्वच द्रव्यांचा-पदार्थांचा समूह म्हणजेच लेक अशी निरुक्ती आहे.(लेगो अहमज्झिमडड्ढमेयेण त्रिविहो इवेइ) तो लेक अधो, मध्य आणि उर्ध्व अशा प्रकारे तीन प्रकारचा आहे.

भावार्थ - सहा प्रकारच्या सर्वंच द्रव्यांना सामान्य अवगाह देण्यास जो हेतू त्यास आकाशद्रव्य म्हणतात. त्याचा स्वभाव सामान्य अवगाहामध्ये निमित्तता हा आहे. याचे दोन भेद आहेत. १ लोक (लोकाकाश) व २ अलोक (अलोकाकाश) जेथे सहा प्रकारचे सर्वच पदार्थ दिसून येतात त्या आकाशभागासलोक म्हणतात व जेथे फक्त आकाशच असून त्यास सोडून अन्य द्रव्ये दिसून येत नाहीत तोअलोक आहे.

सहा प्रकारच्या द्रव्यांपैकी (१ जीव २ पुद्गल ३ धर्म ४ अधर्म ५ आकाश ६ काळ) प्रत्येक द्रव्य स्वभावाने ध्रुव-नित्य आहे. त्यांचा कधीच नाश होत नाही. म्हणून लोकही नित्यच व अनादिनिधन आहे. त्याचा आकारही सदैव तसाच आहे. जसा प्रत्येक पदार्थ ध्रुव आहे तसाच तो प्रतिसमय उत्पाद-व्ययरूपही आहे. उत्पादव्यय व ध्रौव्य हा वस्तुमात्राचा स्वभाव आहे. उत्पादव्ययरूप पर्यायामुळे जगामध्ये सदैव बदल दिसून येतो. त्यासच कार्य म्हणतात. त्या पदार्थांना उत्पन्न करणारा, टिकवणारा रक्षक व नाश करणारा कोणीही ईश्वर नाही. म्हणून हा लोक अकृत्रिम आहे.

पूर्व-पश्चिम विस्ताररूपाने लोक खाली सात राजू रूंद आहे. ती रुंदि वर कमी कमी होत सात राजूचे वर त्याची रूंदी एकराजू मात्र आहे. पुनः वर वाढत-वाढत १० ॥ राजूवर ५ राजू आहे व त्यावर पुनः घटत घटत चौदा राजू उंचीवर रूंदी एक राजू मात्र आहे. दक्षिणोत्तर सर्वत्र सात राजू आहे. यापमाणे लोकाकाशाने घनफळ ३४३ राजू येते.

---

१५. जीवादयो पदार्था यत्र लोक्यन्ते सो लोकः । जीवादि सर्व पदार्थ जेथे दिसून येतात त्यास लोक म्हणतात. सर्वार्थसिद्धि ।



हा लोक अधोलोक, मध्यलोक व उर्ध्वलोक याप्रमाणे तीन प्रकारे विभक्त आहे. लोकाकाशाचा आकार कमरेवर हात ठेवून शिरावेगळा उभ्या माणसासारखा आहे. मेरू पर्वताखाली उंची सात राजु, वर सात राजु उर्ध्व लोक मध्ये मेरूएवढा एक लाख योजनप्रमाण मध्यलोक आहे.

समलंब चौकोनाचे क्षेत्रफळ - $\frac{\text{उंची}}{२}$ x समांतर बाजुंची बेरीज

या लोकाकाशाच्या मध्ये दर्शनी तीन समलंब चौकोन तयार होतात.

१ अधोलोक, २ अर्धा उर्ध्वलोक व ३ वरील अर्धा उर्ध्व लोक २-३ समान क्षेत्रफळ

त्याचे क्षेत्रफळ $\frac{१}{२}$ (उंची ७ x (७ + १) स. बाजूंची बेरीज

$+ \frac{१}{२}$ उंची ३ ॥ x राजु स. बेरीज (५+१) x $\frac{१}{२} \times \frac{७}{२} \times \frac{६}{१}$

$\underbrace{\frac{१}{२} \times \frac{७}{१} \times \frac{८}{१}}_{\text{२८ राजु}}$ ४ $+ \underbrace{\frac{१}{२} \times \frac{७}{२} \times \frac{८}{१}}_{\text{१० ॥ राजु}}$ + वरील ऊर्ध्व लोक १० ॥ राजु

एकूण क्षेत्रफळ = ४९ राजु

जाडी - सर्वत्र सात राजु = ४९ x ७ = ३४३ राजु घनफळ

पं. दौलतरामजी छहढालामध्ये (५ वी ढाल) सांगतात -

किनहुँ न करै न धरै कों, षटद्रव्यमयी न हरैं को ।
सो लोकमाँहि बिन समता, दुःख सहै जीव नित भ्रमता ॥

अर्थ - सहाद्रव्यमय ह्या लोकाचा न कोणी कर्ता आहे, न हर्ता आहे! हा जीव या लोकामध्ये समतेविना भटकत आहे व दुःख भोगत आहे.

णिरया हवंति हेट्ठा, मज्झे दीवंबुरासयोऽ संखा ।
सग्गो त्रिसट्ठिभेओ, एत्तो उड्ढं हवे मोक्खो ॥ ३९ ॥
निरया भवन्ति अधः, मध्ये द्वीपांबुराशयोऽसंख्याः ।
स्वर्गो त्रिषष्टिभेदो, एतस्मादूर्ध्वं भवेन्मोक्षः ॥ ३९ ॥

अन्वयार्थ - (णिरया हवन्ति हेट्ठा) खाली अधोलोकामध्ये नारकी राहतात.(मज्झे असंखा दीवंबुरासयो)मध्य लोकामध्ये असंख्य द्वीप समुद्र आहेत(सग्गो तिसट्ठिमओ) वर उर्ध्वलोकामध्ये स्वर्गाचे त्रेसष्ट पटल[१]आहेत. (एत्तो उड्टं मोक्खो हवे)आणि ज्या

---

टीप-१ पटल = भाग

सर्वांचे वर मोक्षभूमि-सिद्धशीला आहे.

भावार्थ - या लोकाचे तीन विभाग आहेत. १ अधोलोक, २ मध्यलोक, ३ उर्ध्वलोक. अधोलोकामध्ये नरक आहेत. सात नरकभूमी आहेत. १ रत्नप्रभा २ शर्कराप्रभा ३ वालुकाप्रभा ४ पंकप्रभा ५ धूमप्रभा ६ तमःप्रभा व ७ महातमप्रभा. या नरकलोकामध्ये नारकी राहतात. मध्य मनुष्यलोकामध्ये असंख्यात द्वीप व समुद्र आहेत. मनुष्यापेक्षा नारकी असंख्यातपट आहेत. सातव्या नरकापासून वरवर पहिल्या नरकापर्यंत नारकी जीव असंख्यातपट आहेत. नरकभूमिपासून खाली खाली खूप दुःखे आहेत. नरकक्षेत्रस्थ नारकीला छेदनादिक अनंत उपमातीत दुःखे देतात. तेथे क्रोध व अहंकारामुळे नारकी निरंतर परस्पर दुःख देतात. जर मित्रता होईल तर दुःख संपूही शकेल. परंतु तीव्र कषायाने एकमेकास वेदना तेवढ्या देतात. परंतु कषाय कधीही शान्त होत नाहीत. माया्-लोभाची तीव्रता असूनही इष्ट सामग्री प्राप्त होत नाही. म्हणून त्यांचे कार्य व्यक्त होत नाही. अंतरंगात अत्यंत दुःखी असतात.

इगतीस-सत्त-चत्तारि-दोण्णि-एक्केक्क-छक्क-चदुकप्पे ।
तित्तिय-एक्केक्केदिय णामा उड्डआदि-तेसट्टी ॥ ४० ॥
एकस्त्रिंशत्-सप्तचत्त्वारि द्वावेकेकं षट्कं चतुःकल्पे ।
त्रित्रिकमेकैकेन्द्रक नामानि ऋत्वादि त्रिषष्टिः ॥ ४० ॥

अर्थ - सौधर्म-ईशान स्वर्गामध्ये विमानांची एकतीस पटले आहेत. सानत्कुमार माहेन्द्र स्वर्गामध्ये विमानांची सात पटले आहेत; ब्रम्ह-ब्रह्मोत्तर स्वर्गामध्ये चार पटल आहेत. लांतव-कापिष्ट कल्पामध्ये दोन पटले आहेत; शुक्र-महाशुक्र कल्पामध्ये एक पटल आहे; तसेच शेवटच्या आनत-प्राणत आरण-अच्युत कल्पामध्ये सहा पटल आहेत; याप्रमाणे १६ स्वर्गामध्ये बावन पटल आहेत; सोळा स्वर्गानंतर नवग्रैवेयकामध्ये एक, एक पटल आहे. म्हणून नव ग्रैवेयकाचे नव पटल आहेत; त्यावर नऊ अनुदिश कल्पोत्तरामध्ये एक पटल आहे; नव अनुदिशांचे वर पाच पंचोत्तरांचे एक पटल आहे. याप्रमाणे एकंदर त्रेसष्ट पटल आहेत.

विशेषार्थ - स्वर्गामध्ये सर्व पुरुष कामदेवासमान असतात. इन्द्राणी सारख्या देवांगना असतात. त्यांचे शरीर सुगंधी, देह दूरपावेतो प्रकाशमय, यत्र तत्र रत्न, माणिक पन्ना आदि रत्ने, कामधेनु-कल्पवृक्ष आदि अपूर्व निधीचा समूह दिसून येतो. तेथे अनेक प्रकारच्या सुंदर वाद्यांचा घोष सुरू असतो. नृत्य, गाणं, तालमृदंगादि वाद्ये, नानाप्रकारचे कुतुहल व सदैव उत्सवाची रेलचेल असते. स्वर्गस्थ देवांचे शरीर, सौंदर्य, रंगरूप, आयुपर्यंत एकसारखे राहते. ते वृद्ध होत नाहीत; डोळ्याची पाते लवत



नाहीत; शरीराची पडछाया पडत नाही. त्यांना भूकतहान या वेदना नगण्य असतात. हजारो वर्षामध्ये केव्हातरी भूक व तहान लागते. ते मनाने तृप्त व सुखी असतात. परंतु एवढे असूनही इंद्रिय-विषयांच्या तृष्णेने व्याकुल असतात. त्यामुळे ते वास्तविक दुःखीच आहेत.

णिच्छिदरघादु सत्त य, तरुदस वियलिंदिएसु छच्चेव ।
सुरणिरयतिरिय चउसे, चोद्दस मणुये सदसहस्सा ॥ ४१ ॥
नित्येतरधातुषु सप्त च तरौ दश विकलेन्द्रियेषु षट चैव ।
सुरनिरय-तिर्यक्षु चतस्त्रः चतुर्दश मनुजे शतसहस्त्राः ॥ ४१ ॥

अर्थ - नित्यनिगोद, इतरनिगोद, पृथ्वीकाय, अप्काय, अग्निकाय, आणि वायुकाय या प्रत्येकांच्या सात सात लाख योनी आहेत. प्रत्येक वनस्पतीच्या दहा लाख योनी आहेत. विकलेन्द्रियांच्या सहा लाख योनी आहेत. देव, नारकी व तसेच पंचेद्रिय तिर्थंच यांच्या चार-चार लाख योनी आहेत. मनुष्यांच्या चौदा लाख योनी आहेत याप्रमाणे सर्व मिळून एकंदर चौऱ्यांशी लाख योनी आहेत.

भावार्थ - हा लोक पृथ्वी, जल, अग्नी, वायु आणि वनस्पती या पाच प्रकारच्या एकेन्द्रिय जीवांनी खचाखच भरलेला आहे. परंतु त्रस जीव मात्र फक्त त्रस नाडीतच असतात; बाहेर कधीच नसतात. जीव सूक्ष्म-स्थूल दोन प्रकारची असतात. जे जीव सूक्ष्म नामकर्माच्या उदयामुळे सूक्ष्म असतात व त्यामुळे तेही कोणास अडवीत नाहीत व ते कुणाकरवी अडविले जात नाहीत. स्थूल जीव बादर नामकर्माच्या उदयाने स्थूल असतात; ते अन्यांनाही प्रतिबंध करतात व त्यांना अन्य स्थूल प्रतिबंध करतात. एकेन्द्रिय जीव सूक्ष्म-स्थूल दोन्ही प्रकारचे असतात. वनस्पतिकायिक साधारण आणि प्रत्येक या भेदाने दोन प्रकारचे आहेत. अनंतानंत निगोदी, साधारण वनस्पतिकायिक जीव यांचा आहार, श्वासोश्वास साधारण असतो. याप्रमाणे एका जीवाचे शरीर व श्वासादिक साधारण असते. ज्या वनस्पतीकायिकाच्या आश्रयाने अनंत निगोदी जीव असतात त्यास साधारण वनस्पती म्हणतात. प्रत्येक वनस्पतिकायिकाचे दोन भेद आहेत. १ सप्रतिष्ठित प्रत्येक व २ अप्रतिष्ठित प्रत्येक. ज्यांच्या आधाराने अनंत निगोद शरीर असत नाहीत, ज्या देहाचा स्वामी एकच असतो त्यास अप्रतिष्ठित प्रत्येक म्हणतात.

बहुभाग जीवांचे अद्यापही अनादिकाळापासून निगोदामध्ये स्थायी स्थान आहे. त्यांना नित्यनियोद व जे निगोतातून बाहेर पडून पुनः निगोत शरीर धारण करतात त्यांना इतर निगोद म्हणतात. ते निगोदी जीव एका श्वासामध्ये १८ वेळा जन्ममरण करतात.

असुहेण णिरयतिरियं, सुहउवजोगेण दिविजनसोक्खं ।
सुद्धेण लहइ सिद्धिं, एवं लोग विचिंतिज्ञो ॥ ४२ ॥
अशुभेन निरयतिर्यंचौ शुभोपयोगेन दिविजनरसौख्यम् ।
शुद्धेन लभते सिद्धिमेवं लोको विचिन्तनीयः ॥ ४२ ॥

अन्वयार्थ - (असुहेण णिरयतिरियं) अशुभोपयोगाने जीव नरकगती व तिर्थंच गती प्राप्त करतात; (सुहेण दिविजणरसोक्खं) शुभोपयोगाने स्वर्गवासी देव व मनुष्यगतीतील सौख्य प्राप्त होते.(सुद्धेण लहइ सिद्धिं) आणि शुद्धोपयोगाने मुक्ति-सिद्धदशेची-प्राप्ती होते.(एवं लोगं विचिंतिज्ञो)याप्रमाणे लोकानुप्रेक्षेचे चिंतवन करावे.

भावार्थ - नरकगती तिर्यंचगतीला अशुभ आणि मनुष्य देवगतीला शुभ मानलेले आहे. हा जीव अशुभभावाने अशुभ गती व शुभ भावाने शुभ गती प्राप्त करतो.

जीवभाव तीन प्रकारचे आहेत. १ अशुभ २ शुभ (यासच विशुद्ध म्हणतात व ३ शुद्ध. मिथ्यात्व तीव्र कषाय, विषयाची तीव्र अभिलाषा हे सर्व अशुभ परिणाम आहेत. हिंसादि पाच पापामध्ये प्रवृत्ती, सात व्यसनामध्ये लिप्तता तीव्र कषाय हे सर्व अशुभ परिणाम आहेत. या अशुभ परिणामांनी फलस्वरूप नरकगती आणि तिर्यंचगती प्राप्त होते.

याप्रमाणे अशुभोपयोग आणि शुभोपयोग आस्रव-बंध आणि संसाराचे कारण आहेत. म्हणून आत्मकल्याणाच्या अपेक्षेने व मोक्षाच्या प्रयोजनाने अशुभ-शुभ उपयोग हे दोन्ही परप्रवृत्त अशुद्ध उपयोग आहेत; म्हणून दोन्ही हेय आहेत. एक शुद्धोपयोग मात्र उपादेय आहे. शुद्धोपयोगच साक्षात् संवर-निर्जरा-मोक्षाचे कारण आहे. शुद्धोपयोगाशिवाय शुद्ध आत्मस्वरूपाची प्राप्ती संभवनीयच नाही व निर्वाणही संभव नाही. म्हणून आ. कुंदकुंद भावपाहुड मध्ये सांगतात -

सुद्धं सुद्ध-सहावं अप्पा अण्णम्मि तं च णायव्वं ।
इदि जिणवरेहिं भणियं जं सेयं तं समायरह ॥ भावपाहुड गाथा७७

अर्थ - शुद्धोपयोग आणि शुद्धस्वभाव म्हणजे आत्म्याची आत्म्यामध्ये लीनता व स्थिरता आहे; असे समजावे. असे जिनवरांनी सांगितलेले आहे. जे श्रेयस्कर असेल त्याचे यथार्थ आचरण करा. तोच शुद्धभाव आहे. त्यामध्येच हे आत्मन् लीन हो कसा!

या लोकानुप्रेक्षेचे हार्द पं. जयचंदजी छाबडा प्रगट करतात -

लोकस्वरूप विचारिकै, आतमरूप निहार ।
परमारथ व्यवहार मुनि मिथ्याभाव निवार ॥

अर्थ - या लोकाच्या स्वरूपाचे चिंतवन करावे, एवढेच लोकानुप्रेक्षेचे फलित नाही.



ते चिंतवन करून या लोकापासून भिन्न आणि सर्व मंगल व सर्वश्रेष्ठ आत्मस्वरूपाचा अनुभव घ्यावा, हेच शेवटी लोकानुप्रेक्षेचे फलित आहे. परमार्थ व व्यवहार दोहोसही जाणून त्याचे पदवीला योग्यप्रकारे ग्रहण करावे व मिथ्या भावांचा त्याग करावा. लोकविषयक कर्तृत्वभाव सोडून या विश्वातील ज्ञातृतत्त्वामध्ये लीन होऊन आत्मानुभव घ्यावा.

●●●

# अशुचित्वानुप्रेक्षा

अट्ठिहिं पडिबद्धं, मंसविलित्तं तएण वोच्छण्णं ।
किमसंकुलेहिं भरिय, मच्चोक्खं देहं सयाकालं ॥ ४३ ॥

अस्थिभिः प्रतिबद्धो मांसविलिप्तः त्वचाऽवच्छनः ।
कृमिसंकुलैर्भरितोऽप्रशस्तो देहः सदाकालम् ॥ ४३ ॥

अन्वयार्थ - (देहं सदाकालं अट्ठिहिं पडिबद्धं, मंसविलित्तं, तएण वोच्छण्णं किमिसंकुलेः भरियं ) देह हा नेहमीच हाडांनी वेष्ठिलेला, मांसाने वेढलेला आणि त्वचेने झाकलेला व कृमिकीटकांनी भरलेला असल्याकारणाने(अप्रशस्तः) तो अत्यंत अपवित्र व मलिन आहे.

भावार्थ - हे शरीर अत्यंत अपवित्र आहे.मातेचे रक्त व पित्याचे वीर्य यांच्या संयोगाने देह उत्पन्न होतो; विष्ठापात्राप्रमाणे ते अशुचि पात्र आहे; तो वरवर पातळ त्वचेने झाकलेला आहे; याच्या नवद्वारातून अपवित्र मल वाहत असतो. सप्तधातूंनी- रुधिर-रक्त, मांस, हाडे, चामडी, वीर्य, मज्जा, नसा या सात धातूंनी- विणलेले मोठं जाळं आहे. मलमूत्रदि घाणेरड्या वस्तु व जंतूंनी भरलेले हे शरीर दुर्गंधी आहे. हे शरीराचे भवन हाडांनी निर्मित आहे; नसांनी जोडलेले आहे; कृमिजंतूंनी भरलेले आहे; मांसाने वेष्ठित आहे; अतएव सदैव अशुचि आहे. समुद्र, नदी वा तीर्थजलाने त्यास न्हाऊं घातले तरीही ते स्वच्छ होत नाही. उलटपक्षी सुगंधी व स्वच्छ वस्तूही याच्या संसर्गाने अस्वच्छ होतात. कोळसा उगाळावा तसा तो काळाच होतो तद्वत् या देहास कितीही धुवून स्वच्छ करा तरीही त्याचे अशुचिपण लपू शकत नाही.

दुग्गंधं बीभच्छं, कलिमलभरिदं, अचेयणं मुत्तं ।
सडणप्पडणसहावं, देहं इदि चिंतए णिच्चं ॥ ४४ ॥

दुर्गन्धि बीभत्सं कलिमलभूतमचेतनं मूर्तम् ।
सडणपतनस्वभावं देहं इति चिंतयेन्नित्यम् ॥ ४४ ॥

अन्वयार्थ - (देहं दुग्गंधं, बीभच्छं, कलिमलभरिदं, अचेयणं, मुत्तं, सडणप्पडनसहावं) हा देह दुर्गंधी, घाणेरडा असून स्वभावतः गळणारा व पतनयोग्य आहे; परंतु हा अज्ञानी संसारी प्राणी भ्रमाने या शरीरास आत्मा मानत आहे; शरीराचे जन्ममरण म्हणजे जीवाचेच जन्ममरण मानतो; शरीरात रोग झाला कृशता आली तर आत्म्यास रोगी व कृश मानतो. शरीराच्या अवस्था आपल्याच अवस्था आहेत असे मानतो; परंतु शरीर तर अचेतन, जड व मूर्तस्वभावी आहे म्हणून आत्म्यापासून अत्यंत भिन्न आहे. शरीरात आत्म्याचे कोणते गुणधर्म आहेत ? आत्मा तर नित्य, शुद्ध चेतनामात्र त्रिकाल अविनश्वर आहे. शरीराच्या अवस्थां अशुचिपणाचे व भिन्नतेचे ज्ञान नसल्यामुळे तो शरीरास आत्माच मानतो. वास्तविक तर शरीर फक्त शेजारी आहे; आहे तर भिन्नच ! पं. दौलतरामजी छहढाला पाचव्या ढालीमध्ये अशुचिभावनेचे स्वरूप सांगतात-

पल[15], रुधिर, राध[16], मल[17] थैली; कीकस[18] वसादि[19] तै मैली ।
नवद्वार बहै धिनकारी[20], असं देह करे किम यारी[21] ॥

अर्थ - हे शरीर म्हणजे मांस, रक्त, पूं, विष्ठेने भरलेली थैली आहे; हाडे व चरबीने मलीन आहे; नवद्वारांनी सदैव वाहत असल्यामुळे घृणास्पद आहे; या अशा देहावर प्रीति कां व कशी करावी ?

गर्भापासून तो तहत् मरणापर्यंत या देहाची जी रूपे पाहण्यात येतात त्यापैकी कोण्या एकामुळे सुद्धा विवेकी शरीरामध्ये ममत्व करणार नाही. परंतु असे अपवित्र व घाणेरड्या वस्तूचे माहेर असतांना हा देह ममत्वबुद्धी करण्यासारखा तरी खरंच आहे कां ?

केशर, चंदन, पुष्प, सुगंधित, वस्तु देख सारी ।
देह परसते होय अपावन, निशिदिन मळ जारी ॥ कवि मंगतराय

अर्थ - केशर, चंदन, फुले, सुगंधी वस्तू सर्वच देहास स्पर्श करताच अपवित्र झालेल्या रात्रंदिवस दिसून येतात. म्हणून शरीर म्हणजे मलाची झारी आहे.

रस-रुहिर-मंस-मेदट्ठी-मज्जासंकुलं मुत्त-पूय-किमिबहुलं ।
दुग्गंधमशुचि चम्ममयमणिच्चमचेयणं पडणं ॥ ४५ ॥

रसरुधिरमांसमेदास्थिमज्जासंकुलं मूत्रपूयकृमिबहुलम् ।
दुर्गंधमशुचि चर्ममयमनित्यमचेतनं पतनं ॥ ४५ ॥

अन्वयार्थ - (सरीरं) रसरुहिरमंससमेदट्ठिमज्जासंकुलं मुत्तपूयकिमिबहुलं दुग्गंधमशुचि चम्ममयमणिच्चं अचेयणं पतनं)हे शरीर म्हणजे रस-रक्त-मांस-मेद-हाडे आणि मज्जा आदि सप्त धातूंनी भरलेली पिशवी आहे; मूत्र, पूं व जंतूनी भरलेले आहे; दुर्गन्धयुक्त

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

१५. पल = मास, १६. राध = पूं, १७. मल = विष्ठा, १८. कीकस = हाडे, १९. वसा = चरबी वगैरे.
२०. धिनकारी = घृणास्पद, २१. यारी = प्रीति.
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

आणि अत्यन्त अपवित्र आहे; चर्मरूप आहे, अनित्य आणि अचेतन व निश्चितपणे पतन पावणारे आहे.

भावार्थ - शरीर म्हणजे पाच अचेतन महाभूतापासून बनलेले आहे; चेतनारहित जड आहे, मल-मूत्र रूप शेतातील तन, घाण आहे; रोगांचे घर आहे, हाडांनी वेढलेला पिंजरा आहे, नसांच्या जालांनी विणलेले वस्त्र आहे आणि फाटण्याच्या बेतात आलेल्या जुन्या चादरीप्रमाणे आहे.

या देहाचे असे वर्णन जैन शास्त्रात पुराणग्रंथांत, काव्यात, आत्मानुशासन, हिंदी कवीच्या काव्यात कोठेही आपणास आढळून येईल. त्यांत न पटणारं असे कांहीच नाही. त्याची किती उद्धरणे द्यावीत ? देतो म्हटले तर एक विशाल ग्रंथच होईल.

असा हा अस्थिरतारूप देह ! परंतु अज्ञानी प्राणी तरीही या देहावर स्नेहच करतात. जरी शरीर चेतन आत्म्यापासून पृथक व स्पष्टपणे भिन्नस्वभावी आहे तथापि प्राणीमात्र देहावरील अनुरागाने विकारीच आहेत. हे जाणूनही की, एक दिवस असा प्रत्येक जीवास आला, येत आहे व येणारच आहे की, जीवाने या देहास सोडले नाही तरीही ही काया मात्र जीवास सोडल्याशिवाय राहणारच नाही. देहाबाबत एकमेव शाश्वत तथ्य हेच आहे की " देह हा निश्चितपणे पतनशील, बीभत्स, अपवित्र, नाशवंत व कष्टदायकच आहे " हाच सर्व जीवांना प्रत्यक्ष अनुभव आहे. कोणीही या तथ्याला अद्यापही च्छेद देऊ शकलेला नाही. परंतु देहाची गुलामगिरी याशिवाय संसारामध्ये दुसरे तर कांही दिसतच नाही. म्हणून विवेकीजनांनी अशा देहाची आसक्ती सोडावी. कारण शाश्वत मोक्षसुखामध्ये देहाची आसक्ती हा एक फारच मोठा अडसर आहे. कारण शरीराचे ममत्व न सोडतां आजपावेतो कोणीही शाश्वत सुख मिळवू शकला नाही.

देहादो वदिरित्तो कम्मविरहिओ अणंतसुहणिलओ ।
चोक्खो हवेइ अप्पा, इदि णिच्चं भावणा कुज्ञा ॥ ४६ ॥

देहाद् व्यतिरिक्तः कर्मविरहितोऽनन्तसुखनिलयः ।
प्रशस्तो भवेदात्मा इति नित्यं भावना कुर्यात् ॥ ४६ ॥

अन्वयार्थ - " (देहादो वदिरित्तो कम्मविरहिओ अणंतसुहणिलओ अप्पा)देहापासून तत्त्वतः अत्यंत भिन्न, स्वभावतः कर्मांनी ही अबद्धस्पृष्ट व अविनाशी सुखाचे निधान असा हा शुद्ध आत्माच(चोक्खो हवेइ)प्रशस्त व उपादेय आहे " (इदि णिच्चं भावणा कुज्ञा) याप्रमाणे सदोदित भावना करावी.

भावार्थ - आत्मा हा इंद्रियातीत, अमूर्त, नित्य जन्मरणरहित एक चेतनामात्र आहे.



आतापावेतो अनेक शरीर धारण करूनही तो आजपावेतो कधीही शरीररूप झालेला नाही. तो तर चिदानंद घनस्वरूप चैतन्याचा पिंडमात्र आहे. तो अचेतन पाच द्रव्यापासून, अन्य जीवापासून तर अत्यंत भिन्न पृथक आहेच परंतु आपल्या रागादि कर्मजनित भावापासून स्वभावदृष्टीने भिन्नच आहे. असा हा शुद्ध आत्मा एकमात्र ध्येय आहे. हे आत्मन् ! त्याचेच चिंतन कर !

या भेदविज्ञानाची एक विशिष्ट पद्धति आहे. कविवर बनारसीदास समयसार नाटकामध्ये सांगतात -

प्रथम सुदृष्टिसो शरीररूप किजै भिन्न । तामै और सूच्छम शरीर भिन्न मानिए ।
अष्टकर्म भावकी उपाधिसोउ कीजे भिन्न, ताहू मे सुबुद्धिका विलास भिन्न जाणिए ॥

अर्थ - प्रथमतः तर शुद्ध द्रव्यदृष्टीने हे दृश्य औदारिक शरीरास आत्म्यापासून भिन्न करावे; नंतर त्या शरीरामधील सूक्ष्म शरीरास देखील आत्म्यापासून भिन्न करावे; नंतर अष्टकर्मजनित औदयिक भावांना भिन्न करून शुद्ध आत्म्यास भिन्न अनुभवावे; त्यांमध्ये एक सुबुद्धीला (भेदविज्ञान करणाऱ्या) आत्मरूप जाणून ग्रहण करावे. त्या सुबुद्धीच्या महालामध्ये हा चेतन जीवराजा अनंत अमेय आनंद घेत तल्लीन व्हावा हीच एकमात्र मोक्षमार्गाची साधना असून तेच जन्माचे सार्थक आहे ! कारण -

रामरसिक अर रामरस कहन सुनन को दोय ।
जब समाधि परगट भइ तब दुविधा नही कोय ॥

(पं. बनारसीदास समयसार नाटक)

अर्थ - चैतन्याचा रसिक आणि चैतन्यरस सांगण्यासाठी व ऐकण्यासाठी दोन आहेत. जेव्हा समाधि लागते ना तेव्हा त्यात कोणतीही दुविधा द्वैत राहातच नाही. हेच अशुचित्वानुप्रेक्षाचे रहस्य पं. जयचंदजी प्रगट करतात -

निर्मल अपनी आत्मा, देह अपावन गेह ।
जानि भव्य निज भावको यासो तजो सनेह ॥

अर्थ - आपला शुद्ध आत्मा हा स्वभावतः निर्मल, पूर्णस्वभावी असून हा देहमात्र अपवित्र वस्तूचे निधान आहे ! हे भव्य ! आपल्या शुद्ध भावास जाणून शरीरावरील स्नेहाचा त्याग कर कसा !

●●●

# आस्रवानुप्रेक्षा

गाहा -

मिच्छत्तं अविरमणं, कसाय-जोगा य आसवा होंति ।
पणपणतियचउभेया, सम्मं परिकित्तिदा समए ॥ ४७॥
मिथ्यात्वमविरमणं, कषाययोगाश्च आसवा भवन्ति ।
पंचपंचचतुस्त्रिकभेदाः, सम्यक् परिकीर्तिता समये ॥ ४७॥

अन्वयार्थ - (मिच्छत्तं अविरमणं, कसायजोगा य आसवा होंति) मिथ्यात्व, अविरती, कषाय आणि योग हे चार आस्रवभाव-आश्रवास कारणभूत-भावास्त्रव आहेत. आणि ते (समए पणपणतियचउभेया सम्यक् परिकित्तिदा) शास्त्रामध्ये क्रमाने पाच, पाच, चार आणि तीन भेदरूप सम्यक् सांगितलेले आहेत.

भावार्थ - आ. कुंदकुंददेवांनी सात भावनांचे वर्णन ४६ गाथापर्यंत केलेले आहे. असे दिसून येते की त्या सातही भावना संसारासंबंधी आहेत. या संसारामध्ये संसारी जीव, विषयभोग आणि परिग्रह प्रगटपणे अनित्य अतएव अशरण दिसून येत असतांनाही त्यांना भ्रमाने नित्य व शरणभूत मानतो. त्या संसारामध्ये तो सुखदुःखे एकटाच भोगतो. त्यांत अन्य कोणीही आप्तेष्टमित्र परिवार सहभागी होत नाही. हे संसाराचे अगदी उघड नागडं स्वरूप असून हा जीव आपल्याच रागद्वेषमोहांनी या संसारात परिभ्रमण करतो आहे. परिभ्रमण करता करता त्याने संपूर्ण लोकामध्ये ममत्वाचे नाते जोडून पांच प्रकारचे परिवर्तने अनंत वेळा केलेली आहेत. देहाच्या संयोगामध्ये ममत्व करून त्याने अविरतपणे मिळेल त्या प्रत्येक शरीरामध्ये आत्मत्वबुद्धी केली आहे. अशाप्रकारे या सात भावना स्पष्टपणे संसारातील प्रवृत्ती आणि स्वरूप याच्यासंबंधी आहेत. अशा या संसारामध्ये या जीवाला अनादिकाळापासून कर्मबंध आहे. हे बद्ध कर्म बंधापूर्वी कार्मणवर्गणारूपाने अबद्ध होते. ते जीवाकडे कां व कसे आलेत व जीवाशी कसे बद्ध झालेत, याचा विचार हा विवेकसंपन्न धर्मात्म्याला करणे क्रमप्राप्त आहे. बंध हा आस्रवपूर्वकच असतो. १ जीवाला आपल्या योग्यतेने अनादिबद्ध कर्मांच्या उदयाने जे प्रतिक्षण रागद्वेषमोह उत्पन्न होतात, २ यांचे निमित्त मात्र असतांना कार्मण वर्गणा स्वयं कर्मरूप बनते. त्यातील प्रथम भाव हा जीवाचा परिणाम आहे व दुसरा पुद्गलपरिणाम आहे. मात्र दोहोमध्ये कर्ताकर्मभावाविना व्यवहाराने फक्त



निमित्तमात्र संबंध आहे. हे दोन्ही पूर्वी नव्हते, नवीन झालेत म्हणून ते सोयरे बनण्यापूर्वीचे पाहुणे आहेत. म्हणून त्यांना शास्त्रीय परिभाषेमध्ये आस्रव अशी संज्ञा आहे. रागद्वेषमोह हेच खऱ्या अर्थाने आस्रवभाव आहेत व त्यांना भावास्रव म्हटले आहे. तसेच कार्माण वर्गणेमध्ये कर्मरूप परिणाम झाला हाच द्रव्यास्रव आहे.

आस्रवरूपाने आलेल्या कर्मांचा बंध होतो. जीवाचा उपयोगस्वभाव हा अनादि असून तो या नूतन रागद्वेषाशी तादात्म्यरूप होत आहे. तोच भावबंध आहे. पाहुणे आतां सोयरे बनलेत. तोच अध्यवसानरूप भावबंध आहे आणि नवे कर्म जीवप्रदेशात पूर्वकर्मासह स्निग्धरुक्षत्वाने बद्ध झाले तो द्रव्यबंध आहे. या दोहोतही परस्पर निमित्तमात्रपणा आहे.

अनादि मिथ्यात्वासह अनादि काळापासून कषायांची सोबत आहे. म्हणून त्या कारणाने अविरती आणि योगाची परंपरा अखंड सुरू आहे योगानुसार आस्रव, प्रकृति, प्रदेशबंध असून स्थिति व अनुभाग हा कषायानुसार असतो. त्यावेळचा योग हा कर्मपरिणमनाचे निमित्त असून त्याक्षणी असणारा कषायभाव स्थिति व अनुभाग बंधास निमित्त आहे. याप्रमाणे योगनिमित्तक द्रव्यास्त्रव-भावास्त्रव हे दोन्ही, प्रकृति आणि प्रदेशबंध, कषायनिमित्तक स्थिति व अनुभागबंध, भावबंध आणि द्रव्यबंध हे युगल या सर्व गोष्टी प्रतिसमय एकाच समयांत होत आहेत.

म्हणून आस्रवानुप्रेक्षेमध्ये बंधस्वरूपाचे ही चिंतन समाविष्टच आहे. अतः बंधानुप्रेक्षा अलग निर्दिष्ट नाही. आस्रवाची कारणे जी ४७ व्या गाथेत सांगितली आहेत ती सर्व बंधाचीही आहेतच. नंतर आचार्यदेव संवरानुप्रेक्षा व निर्जरानुप्रेक्षा सांगणार आहेत. व संवर-निर्जरेस कारणभूत धर्माच्या स्वरूपाचे विवेचन केल्यानंतर धर्मानुप्रेक्षेमध्ये व बोधिदुर्लभानुप्रेक्षेमध्ये धर्माचे वर्णन केलेले आहे.

या ग्रंथामध्ये आचार्यांनी जो बारा भावनांचा अनुक्रम ठेवलेला आहे तो आणि तत्त्वार्थसूत्रादि अन्य ग्रंथामध्ये दिसून येणारा अनुक्रम भिन्नप्रकारचा आहे. तो का ? याबाबत चिंतन करत असतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे समयसार ग्रंथामध्ये आ. कुंदकुंददेवांनी नवतत्त्वाचा ठेवलेला अनुक्रम. ज्या प्रयोजनाने तेथे तत्त्वांचा अनुक्रम दिसून येतो तेच प्रयोजन येथे बारा अनुप्रेक्षेच्या अनुक्रमामध्ये प्रच्छन्नपणे सूचित होत आहे. त्याचा निर्देश या भावार्थात प्रथमतः केलेलाच आहे.

अनादिकाळापासून ही चार आस्रवाची कारणे प्रतिसमय सम्यग्दर्शनाच्या उत्पत्तिपावेतो निश्चितच असतात. वस्तुतः आस्रव हा तेराव्या गुणस्थानाच्या अंतसमयापर्यंत असून तोपावेतो आस्रव आणि योग यांची व्याप्ती आहे. परंतु आस्रव व बंध हे दोन्ही दहाव्या गुणस्थानाच्या शेवटच्या समयापर्यंत असून त्यासह अनुक्रमे योग व कषायांची व्याप्ती

आहे. परंतु ११ व्यापासून पुढे १३ गुणस्थानापर्यंत असणारा आस्रव बंधसहित नाही तर ती संसारात धर्मसाधनेच्या फलाच्या क्रमाची ती विशेषता आहे.

अनादिकाळापासून दर्शनमोहाच्या उदयाने जीव-अजीवादि तत्त्वासंबंधी विभ्रमाने पछाडलेले आहेत. व त्यांना आत्मा-अनात्मा; हेय-उपादेय, देव-अदेव इत्यादिकामध्ये भेद प्रतीत व्हावा असा विवेक नसतो, त्यांना विषय-कषायापासून निवृत्ति अंशतःही नसते. मिथ्यात्व हे आस्रवबंधाचे मूळ कारण. कषायांचे ही मूळ तर मिथ्यात्वच आहे. मिथ्यात्व सुटल्यानंतर काही काळ मिथ्यात्वाविना कषाय असतात; परंतु ते अनंत संसाराला कारणभूत बंधास कारण नाहीत. कषायासोबत अविरति आहेच. सम्यग्दर्शनपूर्वक श्रावकव्रते स्वीकारल्यापासून अविरती सुटून विरती येते. योग तर संसारात अनादि काळापासून व तेराव्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत आहेच.

मिथ्यात्वाचे भेद पाच, अविरतिचे म्हणजे पापांचे भेद पाच, कषाय चार आणि योगाचे भेद तीन आहेत. या सर्वांचे वर्णन जिनागमामध्ये यत्र तत्र सर्वत्र सविस्तर केलेले आहे. चार कषायांचे प्रत्येकी १ अनंतानुबंधी २ अप्रत्याख्यानावरण ३ प्रत्याख्यानावरण ४ संज्वलन याप्रमाणे एकूण १६ व नऊ नोकषाय मिळून पंचेवीस भेद होतात. तीन योगापैकी १ मनोयोगाचे ४, वचनयोगाचे ४ व काययोगाचे ७ असे एकूण १५ योग आहे. याप्रमाणे मिथ्यात्व ५ + कषाय २५ + योग १५ व अविरती १२ असे एकूण आस्रवाचे ५७ भेद आहेत.

एयंत विणयविवरियसंसयमण्णाणमिदि हवे पंच ।
अविरमणं हिंसादो पचविहं हवेइ णियमेण ॥ ४८ ॥

एकान्तविनयविपरीतसंशयमज्ञानमिति भवेत्पंच ।
अविरमणं हिंसातः पंचविधं भवेन्नियमेन ॥ ४८ ॥

अन्वयार्थ - (एयंतविणयविवरीयसंसयं अण्णाणमिति पंच हवे)त्यापैकी पहिले मिथ्यात्व हे १ एकान्त २ विनय ३ विपरीत ४ संशय व ५ अज्ञान याप्रमाणे पाच प्रकारचे आहे. तसेच(हिंसादो अविरमणं णियमेण पंचविहो हवेइ)१ हिंसा २ असत्य ३ चोरी ४ कुशील व ५ परिग्रह या पाच पापापासून निवृत्त न होणे, त्यांचा त्याग न करणे याप्रमाणे अविरती पाच प्रकारची आहे.

भावार्थ - हा संसारी प्राणी अनादितः मिथ्यात्वाने व अविरतीने ग्रस्त आहे. प्राप्त भव आणि शरीर यास तो आत्मा समजतो, व चेतनामात्र आत्मस्वभावाची प्रतीती करत नाही. तत्त्व-अतत्त्व, हेय-उपादेय यासंबंधी विवेक नाही. हे सर्व साधारण मिथ्यात्वाचे स्वरूप आहे. हा भ्रम या जीवास परोपदेशाविना सदैवच असतो. म्हणून



यास अगृहीत मिथ्यादर्शन म्हणतात. हे असंज्ञीपंचेंद्रियापर्यंत सर्वांनाच आणि सर्व पंचेंद्रिय मिथ्यादृष्टींना नियमाने असते. मिथ्यात्व अगृहीत आणि गृहीत या प्रमाणे दोन प्रकारचे आहे. त्यापैकी अगृहीत मिथ्यात्वाचे हे स्वरूप आहे.

गृहीत मिथ्यात्व - खोटे देव व उपदेशक यांच्या उपदेशाने जी तत्त्वांची अप्रतिपत्ती व अतत्त्वाची मान्यता असते त्यास गृहीत मिथ्यात्व म्हणतात. या गाथेच्या प्रथम चरणात सांगितलेले ५ भेद हे गृहीत मिथ्यात्वाचे आहेत. हे गृहीत मिथ्यात्व फक्त संज्ञी पंचेद्रियांनाच होते. असंज्ञी पंचेद्रियापर्यंत कोणासही असत नाही.

या पाच भेदाचे स्वरूप - एकान्त - जीवादि पदार्थ स्वरूपाने गुण-पर्याय-स्वरूप व ध्रुव-उत्पादव्ययरूप अतएव अनेक धर्मात्मक आहेत. म्हणून ते युगपत् नित्यानित्यात्मक, एकानेक रूप असतांनाही त्यास हे आकलन न झाल्याने परोपदेशामुळे एकतर नित्य व एकरूपच मानतो; अथवा अनित्य व अनेकरूपच मानतो. यास एकान्त मिथ्यात्व म्हणतात.

२ विनयमिथ्यात्व - तत्त्व-अतत्त्व, देव-कुदेव, गुरु-कुगुरु व शास्त्र-कुशास्त्र यामध्ये हेय-उपादेयाचा निर्णय केल्याविना दोहोसही समान उपादेय मानणे हे विनय मिथ्यात्व आहे. वीतराग देवाप्रमाणे सराग देवांचाही विनय करणे २ परिग्रही व कषायी गुरुंना खरे समजून त्यांचा खऱ्या गुरुप्रमाणे सन्मान करणे.

३ विपरीत - तत्त्वाचे स्वरूप ठीक विपरीत जाणून त्यास समीचीन मानणे हे विपरीत मिथ्यात्व होय. १ शरीरास आत्मा मानणे व (२) अजीवास जीव समजणे.

४ संशय - तत्त्व व अतत्त्व याबाबत दोन बाजूला स्पर्श करणारी दोलायमान भूमिका हे संशय मिथ्यात्व होय. जसे, १ आत्मा म्हणजे शरीर आहे की नाही ? २ पुण्य मोक्षमार्ग आहे की बंधमार्ग ?अज्ञानमिथ्यात्व - हेयोपादेयाची परीक्षा केल्याविना कुलाचारास अथवा लोकाचारास धर्म मानणे हे अज्ञान मिथ्यात्व होय. जसे - यज्ञयागादिकामधील हिंसेला धर्म मानणे, चंद्र-सूर्यग्रहणामध्ये दान देणे हा धर्म मानणे.

या पाचही मिथ्यात्वासोबत अगृहीत मिथ्यात्व नियमाने असते.

अविरती - पापे पाच प्रकारची सांगितली आहेत. १ हिंसा २ असत्य ३ चोरी ४ कुशील व ५ परिग्रह. या प्रवृत्तीमध्ये संसार व संसारकारणांचे पोषण तेवढे होते; त्यापासून निवृत्ती अथवा रत्नत्रयरूप मोक्षमार्गामध्ये प्रवृत्ती होत नाही. त्रसस्थावर जीवांच्या हिंसेचा आणि इन्द्रियाच्या विषयामधील आसक्तीचा त्याग न करणे हीच अविरती-अविरमण आहे. पापे पाच आहेत. म्हणून आचार्यांनी येथे अविरती पाच

प्रकारची सांगितलेली आहे. अन्यत्र शास्त्रामध्ये दुसऱ्या प्रकारे, वेगळ्या दृष्टीने अविरती बारा प्रकारची सांगितलेली आहे. १ पांच स्थावर व त्रस जीवांच्या हिंसेचा त्याग न करणे (६) व पांच इंद्रिये व मनाच्या विषयाबाबत लेलुपता, ६ याप्रमाणे बारा प्रकारची अविरती आहे.

२ अथवा (४) अनंतानुबंधी जनित अविरती + ४ अप्रत्याख्यानावरण-जनित अविरती + ४ प्रत्याख्यानावरण जनित अविरती. याप्रमाणे कोठे अविरती बारा प्रकारची सांगितलेली आहे.

कोहो माणो माया लोहो वि य चउविहं कसायं खु ।
मणवयण-कायेण पुणो जोगो तिवियप्पमिदि जाणे ॥ ४९ ॥
क्रोधो मानो माया लोभोऽपि च चतुर्विध कषायः खलु ।
मनवचनकायेन पुनः जोगो त्रिविकल्प इति जाणीहि ॥ ४९ ॥

अन्वयार्थ - (कोहो माणो माया य लोहो वि खलु चउविहं कसायं)क्रोध, मान, माया आणि लेभ याप्रमाणे कषाय चार प्रकारचे आहेत(पुणो मणवयणकायेण जोगो तिवियप्पं इदि जाणे ) आणि पुनश्च मन, वचन व काय या निमित्ताने योग तीन प्रकारचा आहे असे जाणावे.

भावार्थ - संसारातील दुःखाचे आकुलतेचे कारण एकमात्र राग - द्वेष - मोह हेच आहेत. पैकी मोह म्हणजे मिथ्यात्व. त्याचे स्वरूप मागील गाथेच्या विवेचनामध्ये स्पष्ट केलेलेच आहे. कषाय ४ वा १६ प्रकारचे व नोकषाय ९. असे पंचेवीस कषायापैकी - १ क्रोध २ मान ३ अरति ४ शोक ५ भय ६ जुगुप्सा यांचा द्वेषामध्ये अंतर्भाव होतो तर १ माया २ लोभ ३ हास्य ४ रति व ३ वेद यांचा रागामध्ये अंतर्भाव होतो.

मन-वचन-कायेच्या निमित्ताने आत्मप्रदेशांचा परिस्पंद होतो त्यास योग म्हणतात. अनादि काळापासून मिथ्यात्व-कषायांमुळे मन-वचन कायेच्या निमित्ताने. आत्मप्रदेशामध्ये परिस्पंदन, कंपन होत आहे. जेव्हा योग असतो तेव्हा आत्मप्रदेशात असणारी बिस्रसोपचयरूप कार्माणवर्गणा स्वयं कर्मरूप परिणमते. म्हणून योगास आस्रव बंधाचे कारण म्हटले आहे. हे कषाय कधी बुद्धिपूर्वक तर कधी अबुद्धिपूर्वक दिसून येतात. हा जीव प्रयोजनाने व निष्प्रयोजनही कषाय करून चैतन्यस्वभावाचा घात करतो आहे. तो या कषायामुळे अतिशय व्याकुळ व दुःखी आहे. म्हणून आस्रव भाव हेच दुःखाचे कारण आहेत.

आता योगाचे दोन भेद सांगून अशुभ मनोयोग सांगतात -

असुहेदरभेदेण दु एक्केक्कं वण्णिदं हवे दुविहं ।



आहारादिसण्णा, असुहमणं इदि विजाणेहि ॥ ५० ॥
अशुभेतरभेदेन तु एकैकं वर्णितं भवति द्विविधम् ।
आहारादिसंज्ञा, अशुभमन इति विजानाहि ॥ ५० ॥

अन्वयार्थ - (असुहेदरभैदण दु एक्केक्कं दुविहं वण्णिदं हवे)अशुभ आणि इतर म्हणजे शुभ भेदाने या तीन योगापैकी प्रत्येक योग अशुभ आणि शुभ याप्रमाणे दोन प्रकारे सांगितलेला आहे.(आहारादिसण्णा असुहमणं इदि विजाणेहि) त्यापैकी आहारादि चार प्रकारच्या संज्ञा हा अशुभ मनोयोग आहे.

भावार्थ - ज्याच्या आश्रयाने योग दिसून येतो त्या आश्रयभेदामुळे तसेच विषय भेदामुळे प्रत्येक योग शुभ आणि अशुभ अशा दोन प्रकारचा आहे.दया-दान-पूजा वगैरे शुभनिमित्ताने होणारा योग शुभ योग आहे.तर पाच पापे, विषयामध्ये प्रवृत्ती या अशुभ निमित्ताने होणारा योग अशुभ योग आहे.पुण्यकर्माचे कारण तो शुभ योग आणि पाप कर्माचा हेतु तो अशुभ योग असे नाही. कारण योग कोणताही असो पुण्यपापकर्म दोन्ही येतातच. त्यापैकी चार प्रकारच्या संज्ञा हा अशुभ मनोयोग जाणावा. अशुभ मनोयोगाचे स्वरूप सांगतात -

किण्हादि तिण्णि लेस्सा, करणजसोक्खेसु गिद्धिपरिणामो ।
ईसाविसादभावो, असुहमणं त्ति य जिणा बेंति ॥ ५१ ॥
कृष्णादितिस्रो लेश्याः करणजसौख्येषु गृद्धिपरिणामो ।
ईर्षाविषादभावो, अशुभमन इति च जिनाः ब्रुवन्ति ॥ ५१ ॥

अन्वयार्थ - (किण्हादि तिण्णि लेस्सा)कृष्णादि तीन अशुभ लेश्या(करणजसोक्खेसु गिद्धिपरिणामो) तसेच इन्द्रियजनित सुखामध्ये आसक्ति तीव्र अभिलाषा आणि (ईसाविसादभावो असुहमणं त्ति य जिणाः बेंति)ईर्षा, विषादभाव हे सर्व अशुभ मनोयोग आहेत असे जिनदेव सांगतात -

भावार्थ - सहा लेश्यापैकी कृष्ण नील कापोत या तीन अशुभ लेश्या आहेत. कषायांनी रंगलेल्या मनवचनकाय योगप्रवृत्तीला लेश्या म्हणतात.कृष्ण लेश्यावाला जीव तीव्र कषायी, पापी उत्पाती असतो. लढणे, सूड घेणे हा स्थायी भाव. नील लेश्येचे लक्षण ही साधारणतः कृष्ण लेश्येप्रमाणेच आहे. परंतु येथे कषायांची तीव्रता कमी असते एवढेच. कापोतलेश्येमध्ये कषायांची अभिव्यक्ती जघन्य स्वरूपाची असते. विषयसुखामध्ये लेलुपता, ईर्षा व विषाद हे सर्व परिणाम अशुभ मनोयोगाचे आहेत.

गाथा -

रागो दोसो मोहो हास्सादि णोकसायपरिणामो ।

थूलो वा सुहुमो वा, असुहमणो त्ति य जिणा ब्रेंति ॥ ५२ ॥

रागो द्वेषो मोहो हास्यादयो नोकषायपरिणामः ।

स्थूलो वा सूक्ष्मो वा अशुभमन इति च जिना ब्रुवन्ति ॥ ५२ ॥

अन्वयार्थ - (थूलो वा सुहमो वा रागो दोसो मोहो हास्सादि य णोकसायपरिणामो असुहमणो) स्थूल अथवा सूक्ष्म राग, द्वेष, मोह, हास्य वगैरे नोकषायांचे परिणाम हे सर्वच अशुभ मनोयोग आहेत(त्ति जिणा ब्रेंति) असे जिनदेव सांगतात.

भावार्थ - इंद्रियविषयांची लोलुपता, ईर्षा-असूयादि भाव हे सर्व पापास्त्रवाचे हेतु आहेत. सर्व मोह, कषाय आणि नोकषायरूप परिणाम शुद्ध आत्मानुभूतीपासून भिन्न आणि मोहजनित विकारी भाव आहेत. हे सर्व अशुभ मनोयोग आहेत.

शुभ आणि अशुभ योगाचे कारणाने कर्मामध्येही व्यवहाराने पुण्यकर्म पापकर्म असा भेद करण्यात येतो.वस्तुतः आस्त्रवभाव सर्वच आत्म्याच्या शुद्ध स्वभावातील घाण आहे, अपवित्र आहे. तरीही अज्ञानी पुण्यपापाच्या व्यामोहाने अविवेकी आहे. कवि भूधरदास सांगतात -

मोहनिंद के जोर जगवासी घुमे सदा ।

कर्मचौर चहुँ ओर, सरवस लुटै सुधि नही ।

अर्थ - अज्ञानी प्राणी मोहनिद्रेमध्ये इतके गुंग आहेत की ते संसारात भटकतात, सर्व प्रकारे सर्व बाजूंनी कर्मचोर सर्वस्व लुटतात त्याची त्याला शुद्ध नाही.

अशुभ वचनयोग व काययोगाचे स्वरूप सांगतात-

गाथा -

भत्तित्थिरायचोरकहाओ वयणं वियाण असुहं त्ति ।

बंधणच्छेदणमारणकिरिया सा असुहकायमिदि ॥ ५३ ॥

भक्तस्त्रीराजचौरकथायाः वचनं विद्याण असुहं त्ति ।

बंधनछेदनमारणक्रिया सा अशुभकायेति ॥ ५३ ॥

अन्वयार्थ - (भत्तित्थिरायचोरकहाओ वयणं असुहं त्ति वियाण)भक्त कथा म्हणजेच भोजनकथा, स्त्रीकथा-शृंगारकथा-राजकथा आणि चोरकथा सांगणे हा अशुभ वचन योग आहे. आणि(बंधणच्छेदणमारणकिरिया सा असुहकायमिदि)बंधन, छेदन, मारण आदि क्रिया या अशुभ काययोग आहेत.

भावार्थ - विषयकषायात रस घेणारे अज्ञानी रात्रंदिवस रागद्वेषमोहाची कथा ऐकतात व सांगतात. या कथेमध्ये १ भोजनकथा २ स्त्रीकथा ३ राजकथा आणि चौरकथा यांचा अंतर्भाव आहे. या चारही कथा वीतराग कथेपासून वेगळ्या व रागवर्धक आहेत. धर्मकथा अथवा वीतराग कथा क्वचित् कोठेतरी ऐकावयास मिळते. या चारही कथांना विकथा म्हणतात. कामोत्तेजक कथा हे चालू काळाचे व्यवच्छेदक लक्षण मानावे लागेल. सर्व साहित्य स्त्रीकथा-शृंगारकथेने भरलेले आहे. टी. व्ही, वर्तमानपत्रातील जाहिरातीमध्ये कामोत्तेजक व शृंगाराचीच चित्रे व कथा याचा सर्वत्र भडिमार आहे. बालमनावर ही श्रृंगारकथा आणि हाणामारी व पापकथांचेच संस्कार होऊ लागलेले आहेत. यातूनही धर्मात्मा द्योतन्ते क्वचित् क्वचित् । (दुःख आहे की ते क्वचित् क्वचित् आढळतात.) भोजनकथा-राजकथा-चोरकथा ह्या तर सर्वांनाच परिचित आहेत. हा अशुभ वचन योग आहे. आणि बंधन, अवयवच्छेद, मारणे ह्या सर्व अशुभ काययोगाच्या प्रवृत्ती आहेत.

शुभ मनोयोगाचे स्वरूप -

मोत्तूण असुहभावं, पुव्वुत्तं णिरवसेसदो दव्वं ।

वदसमिदिसीलसंजमपरिणामं सुहमणं जाणे ॥ ५४ ॥

मुक्त्वा अशुभभावं पूर्वोक्तं निरवशेषतो द्रव्यम् ।

व्रतसमितिशीलसंजमपरिणामं शुभमनो जाणीहि ॥ ५४ ॥

अन्वयार्थ - (पुव्वुत्तं असुहभावं दव्वं णिरवसेसदो मोत्तूण)या प्रकरणात या पूर्वीच्या गाथेत सांगितलेले अशुभभाव व द्रव्य यांना संपूर्णपणे सोडून (वदसमिदिसीलसंजमपरिणामं सुहमणं जाणे)व्रत, समिति, शील, संयमरूप परिणाम यांना शुभ मनोयोग जाणा.

भावार्थ - जोपावेतो विषयभोगांची आसक्ती आणि पापवासना आहे तोवर शुभयोग संभवत नाही. त्यांपासून पूर्णपणे निवृत्ति झाली असतांना जे काही व्रत, समिति, संयम, दान, पूजादि भाव होतात तो शुभ मनोयोग आहे. शुभ अशुभ योगाचा त्याग म्हणजेच शुद्धोपयोग-परिणाम असून तो संसाराच्या नाशास, संवर-निर्जरा-मोक्षास कारण आहे.

संसारछेदकारणं वयणं सुहवयणमिदि जिणुद्दिट्ठं ।

जिणदेवादिसु पूजा, सुहकायं चि य हवे चेट्ठा ॥ ५५ ॥

संसारच्छेदकारणं वचनं सुहवचनमिति जिनोद्दिष्टम् ।

जिनदेवादिसु पूजा, शुभकायेति च भवेच्चेष्टा ॥ ५५ ॥

अन्वयार्थ - (संसारछेदकारणं वयणं सुहवयणं)संसाराचा छेद[नाश] करण्यास कारणभूत वचन हा शुभ वचन योग आहे(इदि जिणुद्दिट्ठं) असे जिनदेवांनी सांगितलेले आहे. (जिणदेवादिसु पूजा सुहकायं चि य चेट्ठा हवे)जिनेन्द्रभगवंताची पूजा वगैरे ही शुभ काययोगाची क्रिया आहे.

भावार्थ - येथे आ. कुंदकुंद देवांनी संसाराच्या नाशाला कारणभूत वचनप्रवृत्तीला शुभवचन म्हटलेले आहे. जिनदेवाची पूजा वगैरे शुभ काययोगाची प्रवृत्ती आहे. वस्तुतः जीवाचा रत्नत्रयपरिणाम मुख्य कारण असून हितकारी वचन हे बाह्य निमित्तमात्र आहे. मागील श्लोकातील भाव येथेही लागू आहेच.

कर्माचा आस्रव म्हणजे भवसागरामध्ये परिभ्रमणच असून त्याचे कारणही आहे.

गाथा

जम्मसमुद्दे बहुदोसवीचिए दुक्खजलचराकिण्णे ।
जीवस्स परिब्भमणं कम्मासवकारणं होदि ॥ ५६ ॥

जन्मसमुद्रे बहुदोषवीचिके दुःखजलचराकीर्णे ।
जीवस्य परिभ्रमणं कर्मास्रवकारणं भवति ॥ ५६ ॥

अन्वयार्थ - (बहुदोसवीचिए दुःखजलचराकीर्णे जम्मसमुद्दे)ह्या भवसागरामध्ये विविध क्षुधा, तृषा, चिंता, राग, द्वेष आदि दोषांच्या लाटा उठतात व तो दुःखरूपी जलचरांनी खचाखच भरलेला आहे. अशा भवसमुद्रामध्ये(जीवस्स परिब्भमणं कम्मासवकारणं होदि) जीवाचे परिभ्रमण हे कर्मांच्या आस्रवाच्या निमित्ताने आहे.

भावार्थ - या गाथेमध्ये प्रथम ओळीमध्ये संसारसमुद्राचे वर्णन केले आहे व त्या संसार-समुद्रात बुडण्याचे कारण (निमित्त) कर्मांचा आश्रव हे आहे. कारण पूर्वबद्ध कर्मांच्या उदयाच्या निमित्ताने त्यांतही मोहोदयाने रागद्वेषमोह व कषाय परिणाम होतात आणि मिथ्यात्वकषायाने जीव स्वयं विकाररूप परिणमतो तेव्हां जीवप्रदेशास्थित कार्माणवर्गणा स्वयं कर्मरूप होतेसमयसारातील आस्रवाधिकारामध्ये सांगितलेले आहे की, नवीन कर्मास्रवणास हेतू जीवामध्ये परस्परअवगाहरूपाने बद्ध असणारे मिथ्यात्वकर्म, कषायकर्म, आदि द्रव्यप्रत्यय आहेत. याचाच अर्थ असा की, ज्यास मिथ्यात्वकर्म, कषायकर्म आहेत तोच नवीन मिथ्यात्वकर्म व कषायादि कर्म बांधतो. परंतु या नवीन बंधास कारण पूर्वबद्ध द्रव्यप्रत्यय आपले कार्य तेव्हाच करू शकतात की जर त्या कारणाचे कारण असेल तर. पूर्वबद्धद्रव्यप्रत्यय हे कारण आणि त्याचेही कारण जीवाचे रागद्वेषमोह परिणाम आहेत, तेच भावास्रव आहेत. जर द्रव्यप्रत्ययास भावप्रत्ययाचे निमित्त असेल तरच ते द्रव्यप्रत्यय नवीन बंधाचे कार्यास हेतू होतील. अन्यथा नाही.

जर रागद्वेषाविना केवळ पूर्वबद्ध द्रव्यप्रत्यय नूतन कर्मबंधाचे कार्य करतील तर बंधाचा व संसाराचा अभाव कधीच होणार नाही. म्हणून पूर्वबद्ध द्रव्यप्रत्ययास भावप्रत्ययाचे निमित्त नसेल तर ते द्रव्यप्रत्यय असूनही नवीन कर्मबंध होणार नाही.



म्हणून जर जीवाने रागद्वेषमोह यांच्या त्यागाचा पुरुषार्थ केला तर पूर्वबद्ध कर्म असून नवीन बंध होणार नाही व संसाराचा अभाव होऊ शकेल. म्हणून यामध्ये जीवाच्या पुरुषार्थाला अवसर आहे. परंतु पूर्वबद्धकर्माचे निमित्त असतांना त्या कारणाचे कारण, निमित्ताचे ही निमित्त रागद्वेषमोहरूप आत्मपरिणाम आहेत. कारणाचे कारण असेल तरच ते कारण आपले कार्य करू शकेल. म्हणून रागद्वेषमोह हेच खऱ्या अर्थाने आस्रव तत्त्व आहे. आणि कर्मांचा आस्रव व बंध हे संसाराचे कारण आहे. सांगितलेच आहे की,

अपने शुद्धस्वभावसे कभी न कीनी प्रीत ।
लगे रहे परद्रव्य से यह मूढन की रीत ॥

या मोही जीवाने आपल्या शुद्ध स्वभावाची प्रतीति प्रीति कधीही केली नाही, परद्रव्यामध्ये रमत राहला. ही आहे मूढ प्राण्याची रीत ! म्हणूनच तो आणखीच भवसमुद्रामध्ये गोते खातो आहे.

संक्षेपात संसार आणि मोक्ष यांच्या कारणाचे विवेचन करतात -

कम्मासवेण जीवो, बुड्डदि संसारसायरे घोरे ।
जं णाणवसं किरिया, मोक्खणिमित्तं परंपरया ॥ ५७ ॥

कर्मास्रवेन जीवः बुडति संसारसागरे घोरे ।
या ज्ञानवशा क्रिया मोक्षनिमित्तं परंपरया ॥ ५७ ॥

अन्वयार्थ - (जीवो कम्मासवेण घोरे संसारसायरे बुडुदि)हा जीव भावकर्मामुळे कर्माच्या आस्रवाने या संसारसागरामध्ये गटांगळा खात आहे(जं णाणवसं किरिया) जी आत्मज्ञानपूर्वक शुभ योग प्रवृत्ती आहे ती(परंपरया मोक्खणिमित्तं) परंपरेने मोक्षास निमित्त आहे.

भावार्थ - अंतरंगात आत्मप्रतीति असतांना जो शुभयोग असतो तो शुभास्रवास निमित्त आहे. त्यामुळे मोक्षमार्गास अनुकूलता लाभते, हा जीव मोक्षसाधना करून अंती मोक्ष प्राप्त करतो. म्हणून त्यास परंपरेने मोक्षास कारण म्हटले आहे. ज्ञानवश क्रियेला येथे मोक्षास परंपरेने कारण म्हटले आहे ही गोष्ट खास लक्षांत घ्यायला हवी. सम्यग्दर्शनाविना शुभ परिणाम - मंद कषाय हे परंपरेनेही मोक्षहेतू नाहीत. हा त्याचा आशय आहे. परंतु तरीही आस्रवभाव संसाराचेच साक्षात् कारण आहे हे सांगतात

आसवहेदू जीवो, जम्मसमुद्दे णिमज्जदे खिप्पं ।
आसवकिरिया तम्हा, मोक्खणिमित्तं ण चिंतेज्जो ॥ ५८ ॥

आस्रवहेतोः जीवः जन्मसमुद्रे निमज्जते क्षिप्रम् ।
आस्रवक्रिया तस्मान्मोक्षनिमित्तं न चिंतनीया ॥ ५८ ॥

अन्वयार्थ - (आसवहेदू जीवो जम्मसमुद्दे खिप्पं णिमज्जदे)आस्रवाच्या कारणाने हा जीव भवसागरामध्ये तात्काळ बुडतो. म्हणून(तम्हा आसवकिरिया मोक्खणिमित्तं ण चिंतेज्जो) आस्रवरूप प्रवृत्ती ही मोक्षास निमित्त नाही. असे चिंतवन करावे.

भावार्थ -उपयोग शुभ असो की अशुभ तो शेवटी अशुद्धच असून परद्रव्यप्रवृत्त परिणामच आहे आणि तो बंधासच कारण आहे.जो बंधास कारण आहे. तो संवर-निर्जरा-मोक्षाचे कारण कसा असू शकेल ? म्हणून हे नक्कीच आहे की, आस्रव भावामुळे संसारास कारणभूत आस्रवबंधच होतो. मोक्ष कदापि नाही. जे कांही शुभोपयोगास परंपरेने मोक्षहेतू म्हटले आहे त्याचे कारण आत्मज्ञान व शुभोपयोग हे दोन्ही एकाच वेळी असू शकतात व रागाच्या भूमिकेमध्ये असतातही. म्हणूनच शुभोपयोगास उपचाराने व्यवहाराने परंपरेने मोक्षहेतू म्हटले आहे. तत्त्वतः तर मोक्षास साक्षात् कारण निश्चय रत्नत्रयच आहे. शुभोपयोग हाही बंधासच कारण आहे. शुभोपयोग हाही मोहकर्माच्या उदयनिमित्ताने होतो, तो चेतनाविकाररूप आहे व नूतन बंधाचे कारण ही आहे. म्हणून तो निश्चितच मोक्षहेतू नाही असे चिंतवन करावे.

**पारंपज्जायेण दु आसवकिरियाए णत्थि णिव्वाणं ।**
**संसारगमणकारणमिदि णिंदं आसवं जाण ॥ ५९ ॥**

पारंपर्येण त्वास्रवक्रियया नास्ति निर्वाणम् ।
संसारगमनकारणमिदि निंद्यं आस्रवं जानीहि ॥ ५९ ॥

अन्वयार्थ - (दु पारंपज्जायेण आसवकिरियाए णिव्वाणं णत्थि)परंतु वास्तविक तर परंपरेने देखील आस्रवास कारणभूत शुभ आणि अशुभ मन-वचन-कायेच्या क्रियांच्या कारणाने निर्वाण होत नाही. कारण(संसारगमणकारणं इदि) त्या मन-वचन-कायेच्या क्रिया या संसारामध्ये भटकण्यास कारण आहेत म्हणून(आस्रवं णिंदं जाण) आस्रवास, निंद्य अतएव हेय जाण.

भावार्थ - मागे गाथा नं. ५७ मध्ये ज्ञानपूर्वक क्रियेला परंपरेने मोक्षास कारण सांगितले आहे. परंतु त्यात(णाणवसा किरिया) हे पद महत्त्वाचे आहे. त्यामुळे आत्मज्ञानपूर्वक शुभोपयोगरूप परिणमन असेल तरच त्यास व्यवहाराने परंपरा हेतू म्हटले आहे, हा त्याचा अर्थ आहे. तेथे ज्ञानपरिणती आणि शुभोपयोग ह्या दोहोंचेही युगपत् सहावस्थान ४-५-६ गुणस्थानामध्ये संभवनीय आहे. त्यामुळेच तेथे त्यास



परंपराहेतू म्हटले आहे. याचा अर्थ असा नाही की तो शुभपरिणाम रत्नत्रयाच्या साधनेचे एक अंग आहे अथवा रत्नत्रयाच्या साखळीमध्ये तादात्म्यरूप आहे. अशाप्रकारे शुभोपयोग हा साक्षात् मोक्षहेतू नाही हा निर्णय करावा. तसेच शुभोपयोग रत्नत्रयाच्या धारेतही नाही. आहे तर तो आस्रवभावच. त्यामुळे तो संसारासच कारण आहे.जे संसाराचे कारण आहे ते मोक्षाचे कारण कसे असू शकेल ? यामध्ये कोणताही किन्तु असूंच शकत नाही. दुसरे शुभोपयोग नियमरूप कारण नाही म्हणून हा बाह्य व्याप्तीवर आधारित नियमरूप व्यवहाराने निमित्त नैमित्तिक भावही नाही. मोक्षाची नियमरूप व्याप्ती तर ज्ञानपरिणतीसह आहे. म्हणून आस्रवभावाशी (अर्थात् शुभोपयोगरूपच) याची कोणत्याही प्रकारे नियमरूप व्याप्ती नाही. म्हणून निश्चयाने शुभोपयोगरूप आस्रवभाव हा तत्त्वतः मोक्षास कारण नाही.परंपराहेतू म्हणणे हा उपचारमध्येही उपचार आहे. खऱ्या अर्थाने निश्चयाने शुभोपयोग हा बंधासच कारण आहे. मोक्षास नाही. हा निर्णय शास्त्रसंमत आहे. म्हणून रागद्वेषमोह हे सर्वच आस्रवभाव संसारास कारण असून मोक्षहेतू नाहीत असे चिंतवन करावे.असे या गाथेत आचार्य श्री कुंदकुंददेव सांगतात -

आस्रवानुप्रेक्षेचा समारोप

**पुव्वुत्तासवभेया णिच्छयणयएण णत्थि जीवस्स ।**
**उहयासवणिम्मुक्कं अप्पाणं चिंतए णिच्चं ॥ ६० ॥**

पूर्वोक्तास्रवभेदा निश्चयनयेन न सन्ति जीवस्य ।
उभयास्रवनिर्मुक्तं आत्मानं चिंतयेन्नित्यम् ॥ ६० ॥

अन्वयार्थ - (णिच्छयणयएण पुव्वुत्तासवभेया जीवस्स णत्थि)निश्चयनयाने जीवाच्या स्वरूपाचा विचार केला तर या आस्रवानुप्रेक्षेमध्ये पूर्वी जे कांही आस्रवाचे भेद सांगितले आहेत ते सर्वच जीवाला नाहीत(अप्पाणं उहयासवणिम्मुक्कं)आत्मा हा तर तत्त्वदृष्टीने दोन्ही प्रकाराच्या आस्रवाने रहित आहे - आस्रव द्रव्यास्रव भावास्रव या भेदाने दोन प्रकारचा सांगितलेला आहे. आत्मा या दोन्ही आस्रवापासून भिन्नच आहे. याप्रमाणे (णिच्चं चिंतये) सदैव नित्य चिंतन करावे.

भावार्थ - निश्चयनय हा वस्तूच्या त्रिकाल ध्रुव लक्षणरूप स्वभावास स्वीकारतो. जीवाचा त्रिकालध्रुव लक्षणरूप स्वभाव जीवत्व-चेतना-ज्ञायक भाव मात्र आहे. म्हणजे निश्चयाने जीव चेतनामात्र, ज्ञायक स्वरूपी आत्मा आहे. याद्दष्टीने पर्यायार्थिकनयद्वारा व व्यवहारानयद्वारा जाणण्यांत येणारे सर्वच भाव गौण असतात. त्यामुळे ते अनुभूतीबाहेर आहेत म्हणून, अनुभूतीपासून भिन्न आहेत; म्हणून अनुभवात ज्ञातच होत नाहीत.

अतः या भावनेमध्ये जेवढे काही जीवाचे भावास्त्रव रूप भाव सांगितलेले आहेत ते सर्व अनुभूतीपासून भिन्न असल्यामुळे अनुभूतीमध्ये ज्ञात होत नाहीत. त्यादृष्टीमध्ये आत्मा रागद्वेषमोह रूपाने व कोणत्याही भावास्त्रव परिणामरूपाने ज्ञात होतच नाही, म्हणून आचार्यदेव सांगतात की निश्चयाने तर जीवास कोणतेही आस्त्रवभाव नाहीत. निश्चयाने जाणण्याचा या पुरुषार्थामुळे तो आत्म्यास रागापासून भिन्न ज्ञायकमात्र अनुभवतो. म्हणून रागद्वेषमोह हे सम्यग्दृष्टीला नसतात असे समयसाराच्या आस्त्रवाधिकारामध्ये प्रारंभीच सांगितले आहे.

आणि म्हणूनच आत्मा दोन्ही प्रकारच्या आस्त्रवापासून भिन्नच आहे. द्रव्यदृष्टीने तो भावास्त्रवापासून भिन्न अनुभवास येतो. आणि तत्त्वतः तर द्रव्य आस्त्रवापासून कर्मपुद्गलापासून आत्मा अत्यंत भिन्न आहेच, कारण चेतन आत्मा आणि जड कर्मपुद्गल यामध्ये अत्यंताभाव आहे; म्हणून तो द्रव्यास्त्रवापासून स्वभावतःच भिन्न आहे. अशा प्रकारे आत्मा भावास्त्रव आणि द्रव्यास्त्रवापासून भिन्नच आहे. असे चिंतवन करावे. हीच आस्त्रवभावना आहे. श्रीसमयसारमध्ये आचार्य अमृतचंद्र सांगतात की -

भावास्त्रवाभावमयं प्रपन्नो द्रव्यास्त्रवेभ्यःस्वत एव भिन्नः ।
ज्ञानी सदा ज्ञानमयैकभावो, निरास्त्रवो ज्ञायक एक एव ॥

समयसार कलश ११५

अर्थ - उपरोक्त द्रव्यदृष्टीने ज्ञानी भावास्त्रवाच्या अभावास प्राप्त करतो; आणि द्रव्यास्त्रवापासून तर स्वयं स्वरूपाने भिन्नच आहे. तो सदैव एक ज्ञानमय भावस्वरूप असल्याने नित्य निरास्त्रव एक ज्ञायकमात्रच आहे.

आस्त्रवभावनेचे हार्द पं. जयचंदजी छाबडा प्रगट करतात

आतम केवल ज्ञानमय, निश्चयदृष्टी निहार ।
सब विभाव परिणाममय, आस्त्रवभाव विडार ॥

अर्थ - निश्चयदृष्टीने पहावे तर आत्मा फक्त ज्ञानमय आहे. आणि सुरवातीला ४७-४८ गाथेत सांगितलेले सर्वच भाव रागद्वेषमोहरूप असून चेतनाविकाररूप विभाव परिणाम आहेत व ते दोषास्पद आहेत.

•••



# संवरानुप्रेक्षा

चलमलिनमगाढं य वज्जिय समत्तदिढकवाडेण ।
मिच्छत्तासवदारणिरोहो होदि त्ति जिणेहिं णिद्दिट्ठं ॥ ६१ ॥

चलमलिनमगाढं च वज्रिय सम्यक्त्वदृढकपाटेन ।
मिथ्यात्वास्त्रवद्वारनिरोधो भवतीति जिनैर्निर्दिष्टम ॥ ६१ ॥

अन्वयार्थ - (चलमलिनमगाढं य वज्जिय)चल, मलीन आणि अगाढ या तीन दोषांनी रहित (समत्तदिढकबाडेण) अशा सम्यक्त्वरूप मजबूत द्वाराने(मिच्छत्तासवदारणिरोहो होदि त्ति) मिथ्यात्व आस्त्रवाचे द्वार बंद होते असे(जिणेहिं णिद्दिट्ठं) जिनेन्द्र प्रभूंनी सांगितलेले आहे.

भावार्थ - संवर हे आस्त्रवाच्या विरोधी तत्त्व आहे असे ६ व्या अध्यायाचे प्रारंभी सांगितले आहे. म्हणूनच तत्त्वार्थसूत्रामध्ये कायवाङ्मनःकर्म योगः व स आस्त्रवः या दोन सूत्रकारांनी आस्त्रवाचे लक्षण सांगितले आहे की, " काय (शरीर), वचन व मन याचे कर्मास, क्रियेस योग म्हणतात आणि त्याद्वारा होणारा आत्मप्रदेशांचा परिस्पंद म्हणजेच योग असून तोच आस्त्रव आहे." तसेच नवव्या अध्यायामध्ये संवर व निर्जरातत्त्वाचे विवेचन करतांना पहिल्याच सूत्रामध्ये संवराचे स्वरूप सांगितले आहे की, "आस्त्रवनिरोधः संवरः । " आस्त्रवाचा निरोध हाच संवर आहे.

यावरून ह्या उपसिद्धांत सहजच फलित होतो की, जी आस्त्रवाची कारणे आहेत त्यांना रोकणे, प्रतिबंध करणे हेच संवर तत्त्व आहे. गाथा ४७ मध्ये आस्तवाची कारणे मिथ्यात्व, अविरती, कषाय आणि योग यांनाच आस्तव म्हटले आहे. तेथे नियमरूप कारणामध्ये कार्यांचा उपचार केलेला आहे. म्हणजे ही चार आस्त्रवाची कारणे आहेत. अर्थात ठीक याच्या विपरीत संवराची कारणे व स्वरूप आहे. म्हणजेच सम्यक्त्व, विरती, कषायाचा अभाव व योगाचा अभाव ही संवराची कारणे असल्यामुळे त्यासच संवर म्हटले आहे. कारण त्याच उपायांनी आस्त्रवभावांचा निरोध होतो.

याचाच खुलासा या अनुप्रेक्षांच्या चार गाथामध्ये केलेला आहे. सर्वप्रथम मिथ्यात्वाला आस्त्रवाचे मूळ कारण म्हटलेले आहे. त्याचा निरोध अन्य कोणत्याही बाह्यसाधनाने होणार नसून एकमात्र सम्यक्त्व या जीवपरिणामानेच त्याचा निरोध होऊ शकतो. ते सम्यक्त्व हे चल, मल आणि अगाढ या तीन दोषांनी रहित असावे. असे जिनदेवांचे

निरूपण तर्कसंगतच आहे.

मिथ्यादृष्टीला ही चारही आस्रवाची कारणे असतात. दुसऱ्या गुणत्थानापासून पुढे मिथ्यात्वाचा अभाव असतो. म्हणून दुसऱ्या गुणस्थानापासून तीन कारणे आहेत. २-३-४ या गुणस्थानामध्ये अविरती कषाय व योग ही तीन कारणे आहेत. पुढे अविरतीचा अभाव होतो. म्हणून ५ व्यापासून दहाव्या गुणस्थानापर्यंत कषाय आणि योग ही दोनच आस्रवांची कारणे आहेत. नंतर ११ गुणस्थानापासून कषायांचा अभाव होतो. म्हणून ११-१२-१३ या चार गुणस्थानामध्ये फक्त योग एवढे एकच आस्रवाचे कारण आहे.

समयसाराच्या आस्रवांधिकाराच्या प्रारंभीक दोन गाथामध्ये याचा विशेष खुलासा केलेला आहे. तो विशेष जाणण्याच्या इच्छुकांनी वाचावा.

आता अविरतीचा निरोध करण्याचे साधन सांगतात -

गाहा -

पंचमहव्वयमणसा अविरमणणिरोहणं हवे णियमा ।
कोहादिआसवाणं दाराणि कसायरहियपलग्गेहिं ॥ ६२ ॥

पंचमहाव्रतमनसा अविरमणनिरोधनं भवति नियमेन ।
क्रोधाद्यास्तवानां द्वाराणि कषायरहितानि प्रलग्नानि ॥ ६२ ॥

अन्वयार्थ - (पंचमहव्वयमणसा अविरमणणिरोहणं णियमा हवे) पांच महाव्रतांच्या पालनाच्या भावनेने मन ओतप्रोत होते. त्याने अविरतीचा निरोध नियमाने होतो. (कोहादिकसायाणं दाराणि) तसेच क्रोधादिकषाय ही आस्रवाची द्वारे आहेत. त्याच निरोध कषायरहित वीतरागतारूप द्वारांनी होतो.

भावार्थ - या गाथेमध्ये अविरती आणि कषाय या दोन आस्रवाच्या कारणाचा निरोध कशाने होतो हे सांगितलेले आहे. विषयलालसा आणि पाच पापामध्ये प्रवृत्ती ही अविरती असून त्याचा निरोध पांच महाव्रतांच्या पालनाने होतो. महाव्रतामध्ये पाच पापांचा बुद्धिपूर्वक त्याग तर आहेच परंतु विषयलालसेचाही अभाव आहे. साधूंच्या २८ मूलगुणामध्ये पाच महाव्रते प्रधान आहेत.

वास्तविक तर बारा कषायांचा उदयामध्ये रागद्वेषादि विकल्प होतात. त्यांच्या उदयाच्या अभावी समता प्रगट होते. तेच साधूंचे स्वरूप आहे. अट्ठावीस मूलगुण म्हणजे या सामायिक चारित्राचेच भेद आहेत.ज्याप्रमाणे सोने ज्यास हवे आहे त्याला सोन्याची सर्वच रुपे प्रयोजनीय असतात. त्याप्रमाणे सामायिक चारित्राच्या स्वीकार करणाऱ्या साधूंना समतेचे भेद असे अट्ठावीस मुलगुणांची साधनाही प्रयोजनीय आहे.



अट्ठावीस मुलगुणामध्ये स्थापित करणे हे छेदोपस्थापना नामक साधूंचे चारित्र आहे. कषायरूप आस्रवाचा व्यापार अट्ठावीस मुलगुणांच्या पालनेने रोकल्या जातो. कारण कषायप्रवृत्ती रोकणे हाच २८ मूलगुणांचा आत्मा आहे.

आता योगनिरोधाचे विवेचन करतात -

सुहजोगेसु पवित्ति, संवरणं कुणदि असुहजोगस्स ।
सुहयोगस्स णिरोहो, सुद्धुवजोगेण संभवदि ॥ ६३ ॥

शुभयोगेषु प्रवृत्तिः, संवरणं करोति अशुभयोगस्य ।
शुभयोगस्य णिरोधः, शुद्धोपयोगेन संभवति ॥ ६३ ॥

अन्वयार्थ - (सुहजोगेसु पवित्ती, संवरणं कुणदि असुहजोगस्स) शुभोपयोगामध्ये प्रवृत्ती अशुभयोगाचा निरोध करतो आणि (सुहजोगस्स णिरोहो सुद्धुवजोगेण संभवदि) शुभोपयोगाचा निरोध शुदोपयोगाने संभवतो.

भावार्थ - आस्रवास चौथा हेतू योग सांगितलेला आहे. योगाचे दोन भेद आहेत. १ शुभयोग व २ अशुभयोग. शुभयोगामध्ये प्रवृत्तीमुळे अशुभयोगाचा निरोध होतो. परंतु शुभोपयोगाने आस्रवाचा पूर्णपणे निरोध होत नाही. मग आस्रवाचा निरोध करण्यास हेतू कोणता ? शुद्धोपयोगच शुभोपयोगाचा निरोध करण्यास हेतू आहे. हा शुद्धोपयोग शुभ-अशुभ दोहोपासून भिन्न स्वरूपाचा आहे. हा शुद्धोपयोग म्हणजे शुद्ध चैतन्य स्वरूपात एकाग्रपणे लीनता असून तो स्वसन्मुख परिणाम आहे. त्याचमुळे तो बंधास कारण नाही. परसन्मुख योग हा मात्र आस्रवबंधास कारण आहे. म्हणून संसाराचा नाशाकरीतां आस्रवाचा अभाव करणे आवश्यक असून आस्रवाच्या अभावास एकमेव हेतू शुद्धोपयोग हाच आहे.

हेच आ. कुंदकुंददेव प्रवचनसारा गाथा १८१ मध्ये सांगतात -

सुहपरिणामो पुण्णं असुहो पावं ति भणिदमण्णेसु ।
परिणामो णण्णगदो दुक्खक्खयकारणं समये ॥ १८१ ॥

अर्थ - अन्य पदार्थाश्रित शुभपरिणाम हा पुण्यभाव असून परसन्मुख अशुभभाव हा पापभाव आहे. अरनिरपेक्ष स्वसन्मुख परिणाम हा नियतकाळी संसारदुःखाच्या नाशास कारण आहे. पं. दौलतरामजी छहढाला पाचव्या ढालेत संवरभावना सांगतात -

जिन पुण्यपाप नही किना, आतमअनुभव चित दीना ।
तिनही विधि आवत रोके, संवर लहि सुख अवलोके ।

अर्थ - ज्यानी पुण्यपाप केले नाहीत, आत्मानुभवामध्ये चित्त एकाग्र केले आहे त्यानीच नवीन कर्माचा निरोध केला आहे, तो संवर साधून सुख प्राप्त करतो.

ध्यानच संवरहेतू आहे हे सांगतात -

सुद्धुवजोगेण पुणो, धम्मं सुक्कं य होदि जीवस्स ।
तम्हा संवरहेदू, झाणं त्ति तम्हा संवरहेदू विचिंतये णिच्चं ॥ ६४ ॥
शुद्धोपयोगेन पुनः, धर्म्यं शुक्लं च होदि जीवस्य ।
तस्मात्संवरहेतुर्ध्यानं इति विचिन्तयेन्नित्यम् ॥ ६४ ॥

अन्वयार्थ - (पुणो सुद्धुवजोगेण जीवस्स धम्मं सुक्कं य होदि) पुनः शुद्धोपयोगाने या जीवाला धर्मध्यान आणि शुक्लध्यान होते (झाणो त्ति तम्हा संवरहेदू विचिंतये णिच्चं) म्हणून ध्यान हाच संवरहेतू आहे असे नेहमी चिंतन करावे.

भावार्थ - शुद्धोपयोग म्हणजे त्रिकालध्रुव चेतनास्वभावाच्या आश्रयाने होणारी जीवाची रागद्वेषरहित शुद्ध परिणती. शुद्ध आत्मस्वरूपामध्ये क्षायोपशमिक ज्ञान स्थिर होणे यासच धर्मध्यान म्हणतात. शुक्लध्यानाचाही विषय त्रिकालध्रुव आत्मस्वभावच आहे. धर्म व शुक्ल यामध्ये अंतर स्वामी अपेक्षेने आहे. विषयाच्या अपेक्षेने नाही.

हेच आ. अमृतचंद्र समयसार कलश १२७ मध्ये सांगतात -

यदि कथमपि धारावाहिना बोधनेन, ध्रुवमुपलभमानःशुद्धमात्मानमास्ते ।
तदयमुदयदात्मारामात्मानमात्मा, परपरिणतिरोधाच्छुद्धमेवाभ्युपैति ॥ १२७ ॥

अर्थ - जर वाटेल त्या प्रयत्नाने धारावाही अखंड ज्ञानपरिणतिद्वारा हा जीच परानुकूल परिणतीचा त्याग करून आपल्या शुद्धच आत्म्यास अविरत प्राप्त करतो तर तो जीव जेथे आत्माराम प्रगट होतो आहे अशा आपल्याच शुद्ध आत्म्याला प्राप्त करतो; कारण तेथे रागादि परभावरूप आस्रव परिणामांचा निरोध असतो.

म्हणून शुद्धोपयोग हाच शुद्धात्मलाभाचा, संवर, निर्जरा व मोक्षाचा एकमेव हेतू आहे व तोच अतीन्द्रिय आत्मानंद भोगण्यास एकमेव कारण आहे. अतः शुद्धोपयोग हाच खरा धर्म आहे ! साक्षात् धर्मच आहे !

शुद्धातम अनुभव जहाँ, शुभाचार तहाँ नाहि ।
करम करममार्गविषै, शिवमारग शिवमाँहि ॥

पं. बनारसीदास समयसार नाटक

अर्थ - जेथे शुद्ध आत्म्याची अनुभूति आहे तेथे शुभाचार नाही. कारण कर्म तर कर्ममार्गामध्ये संसारमार्गातच आहे, मोक्षमार्ग साक्षात् शिवरूप व मोक्षमार्गातच आहे.

संवरानुप्रेक्षेचा समारोप -

जीवस्स ण संवरणं, परमट्ठणयेण सुद्धभावेण ।



संवरभावविमुक्कं, अप्पाणं चिंतए णिच्चं ॥ ६५ ॥
जीवस्य न संवरणं, परमार्थनयेन शुद्धभावेन ।
संवरभावविमुक्तं आत्मानं चिंतयोन्नित्यम् ॥ ६५ ॥

अन्वयार्थ - (परमट्ठणयेण सुद्धभावेण जीवस्स संवरणं ण) परमार्थनय म्हणजेच शुद्धनयाने. त्या दृष्टीने जीवाला संवरभावाचे विकल्प नाहीत. म्हणून (संवरभावविमुक्कं अप्पाणं चिंतये णिच्चं) म्हणून सर्व सवराच्या विकल्पाने रहित आपल्या आत्म्याचे ध्यान नित्य करावे.

भावार्थ - ध्यानाचा विषयभूत शुद्ध आत्मा हा व्यावहारिक नवतत्त्वरूप नसून पर्यायामध्ये व्यापक एक शुद्ध ज्ञायकमात्र तत्त्व आहे. म्हणजे शुद्ध आत्मा हा नवपदार्थाच्या विकल्पाच्या-भेदवासनेच्याही अतीत आहे. तर संवराचे जे भेद त्याचेही विकल्प शुद्ध आत्म्याच्या अनुभवामध्ये कसे असूं शकतील ? म्हणून शुद्ध स्वभावदृष्टीने आत्मा संवराच्या विकल्पाच्या अतीत, निर्विकल्प, एक चेतनामात्र स्थायीभावरूप आहे. त्या सदैव शुद्ध आत्म्याचे चिंतवन करावे.

हेच आ. अमृतचंद्र देव समयसार आत्मख्याती टीकेत सांगतात -

अतः शुद्धनयायत्तं प्रत्यग्ज्योतिश्चकास्ति तत् ।
नवतत्त्वगतत्वेऽपि यदेकत्वं न मुंचति । (समयसार कलश ७)

अर्थ - म्हणून याप्रमाणे शुद्धनयाच्या विषयभूत आत्मा, नवतत्त्वरूप व्यावहारिक पर्यायतत्त्वामध्ये व्यापून असला तरी तो पर्यायाप्रमाणे अनेक भेदरूप नाही. स्वरूपाने एक ज्ञायक मात्र रूपाने एकरूपच आहे. न तो पदार्थविकल्पद्वारा ग्राह्य आहे, न कारक विकल्पद्वाराही ग्राह्य आहे. अशी एकच भिन्न आत्मतत्त्वाची ज्योत ही एकमात्र शुद्धनयाच्या आधीन आहे.(व्यवहारनयाच्या अविषय असून फक्त स्वभाव दृष्टीनेच तो अनुभवगम्य आहे).ती परपदार्थ आणि परभावापासून भिन्न एक चैतन्यज्योतिस्वरूपाने प्रकाशित होते - अनुभवास येते. तो तर पुण्य-पाप द्वैताच्याही दूर एक अद्वैत मात्र आहे.

या संवरानुप्रेक्षेचे रहस्य पं. जयचंदजी छाबडा स्वरचित बाराभावनेमध्ये सांगतात की,

निजस्वरूप में लीनता, निश्चय संवर जानि ।
समिति, गुप्ति, संजम, धरम, धरै पाप की हानि ।

अर्थ - वास्तविक तत्त्वतः पाहिले तर संवर म्हणजे आत्मस्वरूपामध्ये लीनता आहे. समिति गुप्ति, संयम, दशधर्म हे निश्चयाच्या अपेक्षेने शुभ भाव असल्याने ते पापाचा

निरोध करतात. म्हणजे व्यावहारिक संवर भावापासूनही आत्मानुभूती भिन्न असून तीच खरा संवर आहे. कारण आत्मानुभवामध्ये एक मात्र ज्ञायकरूपानेच आत्मा अनुभवात येतो. तेव्हा व्यावहारिक नवतत्त्वाचे किंवा संवरभेदाचे विकल्प नसतात. वस्तुतः तर या सर्व संवरभावामध्ये एकच शुद्ध आत्मानुभव सर्वत्र व्यापून आहे.

●●●



# निर्जरानुप्रेक्षा

बंधपदेसगलणं णिज्जरणं इदि जिणेहिं पण्णत्तं ।
जेण हवे संवरणं तेण दु णिज्जरण मिदि जाणे ॥ ६६ ॥

बंधप्रदेशगलनं निर्जरणं इति जिनैः प्रज्ञप्तम् ।
येन भवति संवरणं तेन तु निर्जरणमिति जाणीहि ॥ ६६ ॥

अन्वयार्थ - (बंधपदेसगलणं णिज्जरणं)बांधलेल्या कर्मपरमाणूंचे गळणे, उदयास येऊन निघून जाणे ही निर्जरा आहे(इदि जिणेहिं पण्णत्तं)असे जिनदेवांनी सांगितलेले आहे.(जेण संवरणं हवे दु तेण णिज्जरणं इदि जाणे)ज्या भावांनी नवीन कर्मांचा संवर होतो त्याच भावाने निर्जरा होते असे जाणा.

भावार्थ - आस्रवद्वारा आलेले कर्म जीवप्रदेशामध्ये पूर्वबद्ध कर्मांशी स्कंधरूप होऊन परस्परावगाहरूपाने प्रविष्ट होते व स्थितिपर्यंत सत्तेमध्ये राहून अंत्य स्थितिक्षणी उदयास येवून निघून जाते, अकर्मरूप होते. यास निर्जरा म्हणतात.

ही निर्जरा दोन प्रकारे दिसून येते. त्यास कारण स्वामीभेद आहे. एक जीव आपल्या शुद्ध आत्मानुभवाने संपन्न असतांना त्यास अनंत संसारास कारणभूत नूतन कर्मांचा आस्रव होत नाही; व पुर्वबद्ध कर्म उदयास येऊन अकर्मरूप होते. ही निर्जरा संवरपूर्वक निर्जरा असून तीच मोक्षमार्गामध्ये प्रयोजनभूत आहे. एरवी संवराविना निर्जरा तर संसारामध्ये प्रतिसमय होतच आहे. त्याचे मोक्षमार्गामध्ये प्रयोजनच नाही. हे पुढील गाथेत सांगणारच आहेत.

यावरून हेही लक्षात घेणे जरुर आहे कीज्या जीवभावांनी नूतन कर्माचे संवरण झाले त्याचभावाने त्याच क्षणी उदयप्राप्त पूर्वबद्ध कर्म निर्जरित होऊन निघून जातात. म्हणजे भावास्रव आणि भावनिर्जरा एकच परिणाम आहे. परंतु त्या एका परिणामाला नूतन कर्मांचा निरोध झाला या अपेक्षेने भावसंवर असे म्हणतात; आणि त्याच परिणामाला पुर्वबद्ध कर्म निर्जरित होऊन नवीन न बांधता निघून गेले म्हणून भावनिर्जरा म्हणतात.

स्वभावापासून विलक्षण रागादि परभावांना आत्मरूप मानणे हा संयोगीभाव असून तो आस्रव बंधास कारण आहे. परंतु आत्मानुभूतिरूप असंयोगीभाव हाच संवरनिर्जरेस कारण आहे. शुद्धोपयोग हा असंयोगी भाव आहे, कारण त्याचे ध्येय शुद्ध आहे,

आलंबन ही शुद्ध स्वसंवेदन ज्ञान आहे, आणि फलही शुद्ध अनंत चतुष्ट्याची प्राप्ती आहे. तोच शुद्धोपयोग भावसंवर व भावनिर्जरा आहे. याची प्राप्ती चतुर्थ गुणस्थानापासूनच होते. त्याशिवाय सम्यग्दृष्टीला ४१ प्रकृतींचा संवरनिर्जरा कशी सिद्ध होईल ? आ. योगीन्दु देव योगसारमध्येसांगतात की,

सागारु अणगारु कु वि जो अप्पा णिवसेइ ।
सो लहु पावइ, सिद्धिसुहु जिणवर एम भणेइ ॥ ६५ ॥

अर्थ - सागार अथवा अनगार कोणीही असो जो आपल्या शुद्ध आत्मस्वरूपात निवास करतो तो अल्पकाळातच सिद्धिसुख प्राप्त करतो असे जिनवर सांगतात -

निर्जरेचे दोन भेद सांगतात -

सा पुण दुविहा णेया, सकालपक्का तवेण कयमाणा ।
चदुगदियाणं पढमा वयजुत्ताणं हवे बिदिया ॥ ६७ ॥
सा पुनः द्विविधा ज्ञेया, स्वकालपक्वा तपसा क्रियमाणा ।
चतुर्गतिकानां प्रथमा, व्रतयुक्तानां भवति द्वितीया ॥ ६७ ॥

अन्वयार्थ - (सा पुण दुविहा णेया) ती निर्जरा पुनः दोन प्रकारची जाणावी. (सकालपक्का तवेण कयमाणा) (१) स्वकालीं पक्व आणि दुसरी (२) तपद्वारा होणारी. (चतुगदियाणं पढमा) त्यापैकी चार गतीमधील सर्वच जीवांना पहिली असते तर (वयजुत्ताणं हवे बिदिया) व्रततपयुक्त जीवांना दुसरी निर्जरा असते.

भावार्थ - मागील गाथेत भावार्थामध्ये निर्जरा दोन प्रकारची असते याचा संकेत केलेलाच आहे.(१) स्वकालपक्व यासच सविपाक निर्जरा असेही म्हणतात. (२) तपाने होणारी निर्जरा. यासच अविपाक निर्जरा हे नाव आहे.

सविपाक निर्जरा - बांधलेले कर्म स्थितीच्या अंत्यक्षणीं उदयाला येवून निघून जाते म्हणजे अकर्मरूप होते. त्यास निर्जराच म्हणतात. ही निर्जरा चारही गतीतील सर्वच जीवांना प्रतिसमय होते. परंतु त्याकाळी त्याबरोबरच तशाच नवीन कर्मांचे आस्रवण सुरूच असते. म्हणजे ही निर्जरा संवराशिवाय आहे.ही निर्जरा म्हणजे हत्तीस्नानाप्रमाणे आहे. हत्ती जलाशयात स्नान करतो व तेव्हाच आपल्या सोंडेने आपले अंगावर चिखल उडवून घेतो.ही निर्जरा संसारविषयक आहे. मोक्षमार्गामध्ये त्याचे काहीच प्रयोजन नाही.

दुसरी निर्जरा व्रततपद्वारा होते. त्यामुळे नवीन कर्मांचा निरोध होतो आणि पूर्वबद्ध कर्म निघून जाते. त्यामुळे शेवटी सर्वच कर्म निर्जरीत होऊन मोक्षाची प्राप्ती होते. ही अविपाक निर्जरा सम्यग्दृष्टीपासून प्रारंभ होते. हेच पं. दौलतरामजी



निर्जरानुप्रेक्षेचे वर्णनामध्ये सांगतात -

निजकाल पाय विधि झरना, तासौं निज काज सरना ।
तप करि जो कर्म खिपावे, सोइ शिवसुख दरसावे ॥
(पं. दौलतरामजी)

अर्थ - आपली स्थिति संपतेवेळी कर्म निघून जाणे जी सविपाक निर्जरा असून त्याने आपले मोक्षमार्गाचे प्रयोजन सिद्ध होत नाही. तपद्वारा जे कर्म निघून जाते तीच मोक्षसुखास कारणभूत आहे.

पं. जयचंदजी छाबडा निर्जरानुप्रेक्षेचेहार्द प्रगट करतात -

संवरमय है आत्मा, पूर्ण कर्म झड जाय ।
निजस्वरूप को पायकर, लोकशिखर बस जाय ॥

अर्थ - वास्तविक आत्मा तर शुद्ध एक ज्ञायकमात्र असल्यामुळे साक्षात् संवररूप आहे, संवर होतो तेव्हा नवीन कर्म येतच नाही; पूर्वबद्ध कर्म उदयास देऊन नवीन आस्रव न होता निघून जाते. क्रमाक्रमाने सर्वच कर्मांचा क्षय होतो. क्षयाने पूर्ण आत्मस्वरूप प्रगट होते. संवरामुळे क्रमाक्रमाने सर्वच कर्मांचा क्षय होतो, पूर्ण आत्मस्वरूपाची प्राप्ती होते व तो लोकाग्रभागीं जाऊन विराजमान होतो.

●●●

# धर्मानुप्रेक्षा

गाथा -

एयारसदसभेयं, धम्मं सम्मत्तपुव्वयं भणियं ।
सागारणगाराणं उत्तमसुहसंपजुत्तेहिं ॥ ६८ ॥
एकादशदशभेदो धर्मो सम्यक्त्वपूर्वकं भणितः ।
सागारानगारयोः उत्तमसुख-संम्प्रयुक्तैः ॥ ६८ ॥

अन्वयार्थ - (सागारणगाराणं धम्मं एयारस दसभेयं सम्मत्तपुव्वयं) सागार-श्रावक गृहस्थ आणि अनगार-साधू यांचा धर्म अनुक्रमे अकरा आणि दहा प्रकारचा व सम्यक्त्वपूर्वकच असतो(उत्तमसुहसंपजुत्तेहिं भणिदं) असे उत्तमसुखानी संपन्न अशा जिनदेवांनी सांगितलेले आहे.

भावार्थ - पात्रभेदाच्या आश्रयाने धर्म दोन प्रकारचा सांगितलेला आहे. १ गृहस्थधर्म म्हणजेच श्रावक धर्म २ अनगारधर्म म्हणजे मुनीधर्म. परंतु वस्तुतः तर धर्म एकच सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्रस्वरूप रत्नत्रयमयच आहे. त्यांतही सम्यग्दर्शन-सम्यक्त्व हे धर्माचे मूळ आहे. कारण अभिप्राय बदलल्याशिवाय संसारमार्ग सोडून मोक्षमार्गाचा स्वीकार होऊं शकत नाही. खऱ्या अर्थाने तर मान्यता बदलणे, अभिप्राय बदलणे येथूनच धर्माचा प्रारंभ होतो. त्यामुळे जे ज्ञान प्राप्त झाले आहे त्यासही स्वपरभेदविज्ञानाची पार्श्वभूमी लाभल्यामुळे तेही सम्यग् होते. आणि चारित्रामध्येही समीचीनता येते. उलटपक्षी सम्यग्दर्शनाविना अभिप्रायही रागादि व देह यामध्ये आत्मत्वबुद्धी असल्यामुळे, व ज्ञानही भेदविज्ञानाची प्राप्ती न झाल्यामुळे, समीचीन होत नाही व चारित्रही समाचीन होत नाही. म्हणून आ. स्वामि समंतभद्र रत्नकरंडमध्ये सांगतात -

दर्शनं ज्ञानचारित्रात्साधिमानमुपाश्नुते ।
दर्शनं कर्णधारं तन्मोक्षमार्गे प्रचक्षते ॥ रत्नकरंड श्लोक नं ३१ ॥

अर्थ - सम्यग्दर्शन ज्ञानचारित्रापेक्षाही श्रेष्ठ आहे कारण सम्यग्दर्शन हे ज्ञान व चारित्राच्या समीचीनपणाचे कारण असल्यामुळे त्यास मोक्षमार्गामध्ये कर्णधार म्हटलेले आहे.

गृहस्थधर्म आणि साधू यांच्या रत्नत्रय धर्मामध्ये कांहीही फरक नाही. दोहोच्याही



सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानामध्ये कोणता फरक असतो ? फरक तर कांहीच नसतो. जी काही विशेषता आढळून येते ती फक्त चारित्राच्या अपेक्षेने. सम्यग्दर्शनाच्या भूमिकेत नियमाने अनंतानुबंधीचा उदय नसतो; म्हणुन स्वरूपाचरण वा सम्यक्त्वाचरण चारित्र निमयाने प्रगट होते. तरीही तेथे अविरती वा असंयम सांगितलेला आहे. याचे कारण करणानुयोगामध्ये अनंतानुबंधी चार कषाय आणि अप्रत्याख्यानावरण चार कषाय. या आठ कषायाच्या परिणामांना अविरती म्हटलेले आहे. तथापि अनंतानुबंधी कषायामुळे होणारी अविरती व अनंतानुबंधी नसतांना फक्त अप्रत्याख्यानावरण कषायांच्या सद्भावात होणारी अविरती समान नाही. अनंतानुबंधी कषाय नाहीत, म्हणून अनंत संसाराला कारणभूत कर्मांचा आस्रव-बंधही नाही. चारित्राची वृद्धीच आहे. मिथ्यादर्शनाचा अभाव आहे म्हणून ते मिथ्याचारित्र निश्चितच नाही. अनंतानुबंधी कषाय चारित्रमोहाच्या उदयामुळेच होतात; व ते कषाय नसतांना चारित्राचा अंश प्रगट व्हावयास पाहिजे. ज्याअर्थी सम्यग्दृष्टीला हे चार कषाय नसतात त्याअर्थी त्यास, तेथे असंयम आहे तरीही, चारित्राचा अंश प्रगट होणे हे निश्चितच आहे. येथूनच चारित्राचा विकास प्रारंभ होतो. जसे जसे कषाय घटतात तशी चारित्राची वृद्धी होते. सम्यक्त्वी व्रती झाल्यानंतर त्यास अप्रत्याख्यानावरण कषायही नसतो. त्यामुळे व्रती श्रावक हा असंयत म्हटल्या जात नाही. त्यास देशविरत म्हणतात. त्यावेळी आठ कषायामुळे होणारी अविरती नसते परंतु प्रत्याख्यानावरण कषायाचा उदय आहे. म्हणून सकलचारित्र नाही. एतावता त्यास विरताविरतही म्हणतात.

परंतु साधूच्या भूमिकेमध्ये बारा कषाय नसतातच. त्यामुळे तेथे अविरती नसतेच. कारण संज्वलन चार कषाय सकलचारित्रास प्रतिबंधक नाहीत म्हणून तेथे अविरती नाहीच. संज्वलनाच्या उदयामध्ये अविरती होत नाही. म्हणून तेथे अविरती वा विरताविरत मिश्र भावही नाही.

चारित्राची व्याख्या सर्वार्थसिद्धीमध्ये प्रथम सूत्राच्या टीकेमध्ये येणेप्रमाणे केली आहे. " संसार कारणनिवृत्तिं प्रत्यागूर्णस्य ज्ञानवतः कर्मादाननिमित्ताक्रियोपरमः सम्यक् चारित्रम् । " संसाराच्या कारणापासून निवृत्त होण्यामध्ये संलग्न अशा ज्ञानीला कर्मग्रहण करण्यास निमित्तभूत अशा क्रियापासून निवृत्ती हेच सम्यक्चारित्र आहे. ज्या अर्थी सम्यग्दृष्टीला कर्मग्रहणास कारणाच्या क्रियेचा, मिथ्यात्वक्रियेचा अभाव आहे त्याअर्थी ज्या अंशाने आस्रव-बंध नाही त्या अंशाने चारित्र मानणे हे तर्कसंगत आहे. याप्रमाणे रत्नत्रय असल्यामुळे त्यास संवर-निर्जरा व मोक्षमार्ग निश्चितच आहे.

म्हणून गृहस्थधर्म व मुनीधर्म यामध्ये सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान या कारणाने अंतर

नाही. अंतर आहे ते चारित्राच्या तरतमतेमुळे.

हा चारित्राचा विकासाचा क्रम - ११ व १२ व्या गुणस्थानापावेतो असतो. बाराव्या गुणस्थानात क्षायिक चारित्र पर्याय प्रगट होते.

अशा धर्माचे मूळ सम्यग्दर्शन म्हणजे किमान लब्ध्यत्मक आत्मानुभूती हेच आहे. ती कधी उपयोग स्वरूपाचीही असू शकेल.

श्रावकाचा धर्म अकरा प्रकारच्या प्रतिमारूप सांगितला आहे. श्रावकाच्या अकरा प्रतिमा म्हणजेच अकरा भेदरूप गृहस्थधर्म. प्रतिमेचे स्वरूप एका हिंदी पद्यात दिसून येते.

संयमअंश जग्यो नही, भोग अरुचि परिणाम ।
उदय प्रतिज्ञाको भयो, प्रतिमा ताको नाम ॥

अर्थ - अद्याप साधूच्या पूर्ण संयमाची प्राप्ती झालेली नाही, म्हणून पूर्ण विरतीही नाही; तथापि भोगामध्ये अरुचिरूप परिणाम आहे. स्थावर हिंसा सर्वथा वर्ज्य नसली तरीही त्रसहिंसेचा त्याग आहे, याप्रमाणे विरतीचा - बुद्धीपूर्वक प्रतिज्ञेचा - ज्या भूमिकेमध्ये स्वीकार करण्यता येतो त्यासप्रतिमा असे नाव आहे.

उग्गाहा

दंसणवयसामाइयपोसहसचित्तरायभत्ते य ।
ब्रह्मारंभपरिग्गह-अणुमणणमनुद्दिट्ठं देसाविरदेदे ॥ ६९ ॥

दर्शनव्रतसामायिकप्रोषधसच्चित्तरात्रिभक्तश्च ।
ब्रह्मारंभपरिग्रह-अनुमननमनुदिष्टं देशविरतस्यैते ॥ ६९ ॥

अर्थ - देशविरत श्रावकाचे १ दर्शनप्रतिमा २ व्रतप्रतिमा ३ सामायिक ४ प्रोषध ५ सच्चित्तत्याग ६ रात्रिभोजनत्याग ७ ब्रह्मचर्यप्रतिमा ८ आरंभत्याग ९ परिग्रहत्याग १० अनुमतित्याग व ११ उदिष्टत्याग अशा अकरा प्रतिमा सांगितलेल्या आहेत. त्यास श्रावकाचा अकरा प्रकारचा धर्म म्हटलेले आहे.

अकराप्रतिमांचे स्वरूप. दर्शनप्रतिमा -

श्रावकाच्या अकराप्रतिमेत पहिली प्रतिमा दर्शन प्रतिमाच आहे. जेथे संसारभोगापासून विरक्तिपूर्वक म्हणजे प्रतिज्ञेपूर्वक त्याग सहित सम्यक्त्व असते व मुलगुणांचे निरतिचार पालन व अतिचारपूर्वक सप्तव्यसनांचा त्याग जेथे असतो त्यास दर्शनप्रतिमा म्हणतात.

२ व्रतप्रतिमा - ५ अणुव्रते ३ गुणव्रते व ४ शिक्षाव्रते धारण करणे ही दुसरी व्रतप्रतिमा आहे.

३ सामायिकप्रतिमा - नियमपूर्वक दिवसातून सकाळी, माध्यान्ही व सायंकाळी



तीन वेळ विधिपूर्वक व निरतिचारपणे सामायिक करणे ही तिसरी प्रतिमा आहे.

४ प्रोषधप्रतिमा - सप्तमी व त्रयोदशीला तसेच नवमी व पौर्णिमा अमावस्येला पोषधपूर्वक अष्टमी चतुर्दशी या पर्वदिनी उपवास करणे व प्रोषधोपवास व्रताचे अतीचार टाळून करणे ही प्रोषध प्रतिमा आहे.

५ सचित्तत्याग - या प्रतिमेमध्ये कच्चे पाणी व सचित्त वस्तूचा त्याग करण्यात येतो.

६ रात्रिभोजनत्याग - सूर्योदयानंतर २ घटिका आणि सूर्यास्तापूर्वी २ घटिका सोडून फक्त दिवसाच अन्न-पाणी आहार घेणे व रात्रौ सर्वथा त्याग करणे ही रात्रिभोजनत्याग प्रतिमा आहे.

७ ब्रह्मचर्यप्रतिमा - नियमपूर्वक परस्त्री तसेच स्वस्त्रीचा सेवनाचा ही सर्वथा मनवचनकायपूर्वक त्याग करणे ही ब्रह्मचर्यप्रतिमा होय.

८ आरंभत्याग - मनवचनकायपूर्वक गृहस्थ जीवनासंबंधित सर्व प्रकारच्या आरंभाचा त्याग करणे ही आरंभत्याग प्रतिमा होय.

९ परिग्रहत्याग - सर्व परिग्रह सोडून अलिप्त भावनेने राहणे ही परिग्रह त्याग प्रतिमा होय.

१० अनुमतित्याग - बंधु, पुत्र यांना आतापावेतो गृहस्थदशेमध्ये सल्लामसलत देत होता. त्या अनुमतीचाही त्याग करणे ही दहावी अनुमतित्याग प्रतिमा होय.

११ उद्दिष्टत्यागप्रतिमा - आपणासाठी बनविलेल्या अन्नजलाचा जेथे त्याग असतो ती उद्दिष्टत्याग प्रतिमा आहे. हा श्रावक दोन प्रकारचा असतो. १ क्षुल्लक व २ ऐलक. ही सर्व श्रावकांचीच स्थाने आहेत.

या गाथेत मुनींच्या दहा धर्माची नावे सांगतात -

उत्तमक्षममद्दव्वाज्जवसच्चसउच्चं च संजमं चैव ।
तवचायअकिंचण्ह ब्रह्म इदि दसविहं होदि ॥ ७० ॥

उत्तमक्षमामार्दवार्ज्जवसत्यशौचं च संयमश्चैव ।
तपत्यागाकिंचन्यब्रह्म इति दशविधो होदि ॥ ७० ॥

अन्वयार्थ - मुनींचा धर्म दहाप्रकारचा सांगितला आहे(उत्तमक्षमद्दवाज्जवसच्चसउच्चं) १ उत्तमक्षमा २ उत्तममार्दव ३ उत्तम आर्जव ४ उत्तम सत्य ५ उत्तम शौच(संजमं चैव) आणि तसेच ६ उत्तम संयम(तवचायअकिंचण्हबम्हा) ७ उत्तम तप ८ उत्तम त्याग ९ उत्तम आकिंचन्य आणि १० उत्तम ब्रह्मचर्य असा(इदि दसविहो होदि) दहा प्रकारचा आहे.

भावार्थ - यात मुनींच्या दहा धर्मांचा नामनिर्देश तेवढा केलेला आहे. यापूर्वीच्या गाथेत श्रावकांच्या अकरा प्रतिमारूप धर्माचा निर्देश केलेला आहे. या दशविध धर्मांचे स्वरूप पुढील दहा गाथेत आचार्य कुंदकुंद स्वयं सांगणार आहेतच.

उत्तमक्षमाधर्माचे स्वरूप सांगतात -

कोहुप्पत्तिणिमित्तं, बहिरंगं जदि हवदि संजोगो ।
ण कुणदि किंचि वि कोहं; तस्स खमा होदि धम्मो त्ति ॥ ७१ ॥
क्रोधोत्पत्तिनिमित्तं बहिरंगं यदि भवति संयोगः ।
न करोति किंचिदपि क्रोधं तस्य क्षमा भवति धर्म इति ॥ ७१ ॥

अन्वयार्थ - (कोहुप्पत्तिणिमित्तं जदि बहिरंगं संजोगो हवदि) क्रोधाच्या उत्पत्तीला बाह्य संयोगरूप बहिरंग कारण उपस्थित झाले असतांनाही (किंचि वि कोहं ण कुणदि) जर यत्किंचितही क्रोध करत नाही तर (तस्स खमा धम्मो होदि) त्याची क्षमा हा धर्म होतो.

भावार्थ - या अनुप्रेक्षेमध्ये धर्माच्या स्वरूपाचे विवेचन केलेले आहे. या गाथेपासून पुढे दहा गाथांपर्यंत उत्तम दशधर्मांचे विवेचन करणार आहेत. परंतु त्यापूर्वी धर्म कशास म्हणतात ? धर्माचे सामान्य लक्षण कोणते ? याचा विचार करणे जरूर आहे. आ. स्वामी कार्तिकेय द्वादशानुप्रेक्षेमध्ये धर्माचे स्वरूप सांगतात -

वत्थुसहावो धम्मो, खमादिभावेहिं दसविहो धम्मो ।
रयणत्तयं च धम्मो जीवाणं रक्खणं हवे धम्मो ।

अर्थ - वस्तूच्या स्वभावास धर्म म्हणतात. येथे आत्मवस्तूचा विचार आहे. आत्म्याचा स्वभाव म्हणजे चेतना अर्थात् ज्ञान व दर्शन. आत्म्याने फक्त ज्ञान-दर्शनरूप होणे, रागद्वेष मोहरूप न होणे हे धर्माचे स्वरूप आहे. याचाच आशय हा की, धर्म उत्तम क्षमा आदि रूपाने दहा प्रकारे आहे. " आत्मधर्म हा दशलक्षण धर्म आहे " याचाच आशय हा की, उत्तम क्षमा आदि दहा प्रकारचे परिणाम हा वस्तुधर्म आत्मधर्म आहे; म्हणून धर्म दहा प्रकारचा आहे. हे उत्तम क्षमादि दहा भाव हेच आत्म्याचे स्वभावपरिणाम आहेत हा इत्यर्थ. तद्वत् रत्नत्रय हा धर्म आहे. रत्नत्रय म्हणजे सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राची त्रिकालध्रुव चैतन्यभावाच्या आश्रयाने एकाग्रता. म्हणजे मी एक चेतनालक्षण आहे अशी मान्यतारूप स्थायीभाव; वर्तमान क्षायोपशमिक ज्ञान पर्यायद्वारा त्याच रूपाने वेदन करणे, अनुभवणे आणि त्यामध्ये स्थिर होऊन आपल्या स्वभावामध्ये लीनता हा रत्नत्रय भाव आहे आणि या सर्व धर्म परिणतीचे बाह्यतः दिसून येणारे रूप म्हणजे जीवांची रक्षा हा धर्म आहे.



प्रस्तुत ग्रंथाचे रचनाकार आ. कुंदकुंद स्वयं प्रवचनसारमध्ये धर्माचे स्वरूप सांगतात -

चारित्तं खलु धम्मो, धम्मो जो सो समो त्ति णिद्दिट्ठो ।
मोह-कोहविहीणो परिणामो अप्पणो हु समो ॥

प्रवचनसार गाथा ६

अर्थ - चारित्र म्हणजे स्वरूपामध्ये चरण, लीनता-ज्ञायकस्वभावरूप परिणती; आणि हा धर्म म्हणजे जीवाचा समताभावच आहे. सम-समता याचा अर्थ रागद्वेषमोहाने विरहित आत्म्याचा परिणाम असा आहे. मोहाचा अभाव आहे याचाच अर्थ सम्यग्दर्शन आहे व चेतन करणे हा ज्ञानरूप भाव आहे. म्हणजे सम्यग्दर्शन ज्ञान चारित्राची एकाग्रता अर्थात् रत्नत्रय हा धर्म आहे असाच त्याचा आशय आहे. हे धर्माचे लक्षण उत्तम क्षमा आदि दहा धर्मांमध्ये व्यापक आहे. म्हणूनच त्यांना धर्म म्हणतात. याचा असा स्पष्ट आशय आहे की, या दहा धर्माच्या विरोधी जे दहा परिणाम आहेत ते अधर्म आहेत. अर्थात् १ क्रोध, २ मान, ३ माया, ४ लोभ, ५ असत्य, ६ असंयम (जीवस्वभावाचे मर्यादेबाहेर प्रवृत्ती करणे) ७ विकाररुपाने चैतन्याची परिणती म्हणजे तपाचा अभाव, ८ अत्यागरूप भाव, ९ परद्रव्यासंबंधी ममत्व परिणाम, १० अब्रह्म हे दहा विपरीत परिणाम अधर्मरूप आहेत. म्हणजेच उत्तम क्षमा याचा अर्थ क्रोधाचा अभाव हाच झाला. सर्वसाधारण संसारी प्राणी क्रोधादि विकाररूप अधर्मामध्ये रंगलेले असतात. याचा भाव हाच की, क्षमा हा जीवाच्या ध्रुवज्ञायक स्वभावाचा आविष्कार आहे. क्रोध हा जीवाचा स्वभाव होऊ शकत नाही. कारण क्रोधासोबत सदैव व्याकुलता लागलेलीच आहे. व्याकुलता याचा अर्थच प्राप्त परिस्थितीमध्ये असमाधान आणि त्यामुळे अनुकूल परिवर्तनाची लालसा. म्हणजेच क्रोधास आपले स्वरूप मानणे व जाणणे, त्यांत मजा घेणे ही सर्वसाधारण संसारी प्राण्याची प्रवृत्ती असते व त्यामध्ये शांती नसून असमाधान असते. परंतु जीवमात्राबाबत क्षमाभाव वा मैत्रीभाव हा क्षमाधर्म जीव स्वभावाने चेतनमयच आहे, म्हणून समान आहेत; हे तथ्य अभिप्रायाने स्वीकारले तरच असू शकतो. म्हणून क्षमेमध्ये आत्मस्वभावाचा सन्मान हा स्थायी भाव असल्यामुळे तेथे आकुलता व असमाधानाला अवकाशच नाही. म्हणून उत्तम क्षमा हे आत्म्याच्या स्वभावधर्माचे लक्षण आहे. हे दहाही धर्म अलग अलग धर्म असून त्यापैकी कोणताही एक उपासनामध्ये घेतला तर भागते अशी स्थिती नाही. हे दहा त्या आत्मस्वभावरूप धर्माची दहा लक्षणे आहेत. हे दहाही असणे हाच धर्माचा पूर्ण व यथार्थ आविष्कार आहे.

हे धर्माचे परिपूर्ण स्वरूप आहे आणि गृहस्थ हे परिपूर्ण स्वरूप प्राप्त करण्यास

अक्षम असतात. साधूपदामध्ये याची सर्वांश उपासना संभवनीय आहे. म्हणून हा धर्म मुख्यतः मुनींचा धर्म सांगितलेला आहे. परंतु याचा आशय हा धर्म गृहस्थासाठी नाही, असा नाही. तर त्यांनीही त्या दशधर्माची शक्य तेवढी उपासना करावी. पाचव्या ढालीमध्ये धर्मभावना सांगून समारोप करतांना " सो धर्म मुनिनकर धरिये " असे पं. दौलतरामजी सांगतात. रत्नत्रयाची सर्वांग साधना, निश्चय धर्माची प्रधानता व अहिंसाधर्माचे उत्कृष्ट रूप हे सर्व साधूचे ठायीं दिसून येतात. निश्चय रत्नत्रयाची समग्रता तेथे संभवनीय आहे. म्हणून शेवटी धर्माच्या कोणत्याही विकल्पामध्ये आत्मज्ञानपूर्वक आत्मसाधना हा व्यापक आहे. कोणतेही व्यवहारधर्माचे अंग असो की संवर-निर्जरेस कारणभूत धर्म असो या सर्वांचे अंतिम लक्ष्य एवढे एकच आहे.

म्हणून लौकिक व्यवहारामध्ये क्रोधाची बाह्य कारणे उपस्थित असतांनाही क्रोध वा द्वेष उत्पन्न न होऊ देणे हा उत्तम क्षमा धर्म आहे. राजकारणामध्ये व लौकिक प्रवृत्तीमध्ये कपटाचाराने क्षमेचाही बाह्यतः आविर्भाव दिसून येवू शकतो. पण ती खरी क्षमा नसते कारण अभिप्रायामध्ये कपट दडलेले आहे. म्हणून ती क्षमा म्हणजे कपटाने धारण केलेला क्षमेचा मुखवटा आहे. ती उत्तम तर नाहीच पण जघन्यही असूं शकत नाही. कारण तेथे तर मायाचार आहे फसवणूक आहे. तो तर अधर्माने धर्माचा वेष फसविण्यास्तव घेतला आहे. खरी क्षमा तर जेथे

अरिमित्र महलमसान कंचनकाच निंदन-थुतिकरण ।
अर्घ्यावतारण-असिप्रहारण मे सदा समता धरन ॥ छहढाला ६,६

(शत्रु असो की मित्र, महाल असो की स्मशान, सोने असो की काचेचा तुकडा असो, कोणी निंदा करो की स्तुती, कोणी सन्मान करो की तलवारीने प्रहार करो सर्वत्र साधू समता वृत्ती धारण करतात.)

अशी समता प्रगट होते तेथे क्षमेचा निवास असतो.

उत्तम मार्दवधर्माचे स्वरूप -

कुलरूवजादिबुद्धिसु तवसुद - शीलेसु गारवं किंचि ।
जो ण वि कुव्वदि समणो, मद्दवधम्मं हवे तस्स ॥ ७२ ॥

कुलरूपजातिबुद्धिषु तपःश्रुतशीलेषु गारवं किं चि ।
थः नैव कुर्वति भ्रमणो, मार्दवधर्मो भवति तस्य ॥ ७२ ॥

अन्वयार्थ - (जो समणो कुलरूवजादिबुद्धिसु तवसुदशीलेसु)जो मुनी कुल, रूप, जाति, बुद्धि, तप, श्रुत शील पूजा याबाबत(गारवं ण वि कुणदि) गारव म्हणजे गर्व करीत नाही, त्यामुळे मोठेपणा मानत नाही (तस्स मद्दवधम्मं हवे) त्या मुनीला



मार्दवधर्म असतो.

भावार्थ - जैनधर्माचे एकच हार्द आहे की, मिथ्यात्व हाच अधर्म असून सम्यक्त्व हाच धर्म आहे. एक मिथ्यात्व हे सर्व कषायांचे व विकारांचे मूल आहे. मिथ्यात्वामुळे परवस्तूमध्ये आत्मत्वबुद्धि व रागद्वेष होतात, त्यामुळे बाह्य शरीर-परिग्रह आणि बुद्धि, तप, श्रेष्ठ पद, शास्त्रज्ञान, शील या निमित्ताने जीव आपणास मोठा मानतो. पुद्गलाचा ढेर, लौकिक मोठेपणा हाही पदासीनतेमुळे पुद्गलाश्रित विकारच आहे. त्यामुळे आपणास मोठेपणा मानणे हे अज्ञान आहे. मान हा ज्ञायकभावाच्या श्रेष्ठतेची जाणीव नसतांना पुद्गलाच्या कारणाने उत्पन्न होणारा विकार आहे. म्हणून तो अधर्म असून तो संसार व दुःखास कारण आहे व यामुळे मोठेपणा न मानता आत्म्याला एक शुद्ध ज्ञायकभावरूप मानणे हा धर्म आहे, तेव्हा पुद्गलामध्ये प्रीतिअप्रीति होत नाही. म्हणजे मानकषायाची प्रवृत्ती नसते. तोच मार्दवधर्म आहे. या लौकिक गोष्ठींचा गर्व न करणे हा मार्दव धर्म आहे. तो अंतरंगांत निश्चयधर्म असतांनाच संभवनीय आहे.

या दहाही धर्मांना उत्तम विशेषण जोडलेले आहे. त्याचे प्रयोजन, लौकिक प्रयोजनाने विनम्रता दाखविणे आदि प्रवृत्ती हा अभिप्रायामध्ये मार्दवभाव नसून तो तर फक्त देखावा आहे. म्हणून लौकिक प्रयोजन या दशधर्मसाधनेमध्ये असू नये यासाठी उत्तम हे विशेषण आहे.

उत्तम आर्जवधर्माचे स्वरूप -

मोत्तूण कुडिलभावं, णिम्मलहिदएण चरदि जो समणो ।
अज्जवधम्मं तइओ, तस्स दु संभवदि णियमेण ॥ ७३ ॥

मुक्त्वा कुटिलभावं निर्मलहृदयेन चरति यः श्रमणः ।
आर्जवधर्मस्तृतीयः तस्य तु संभवति नियमेण ॥ ७३ ॥

अन्वयार्थ - (जो समणो कुडिलभावं मोत्तूण णिम्मलहिदएण चरदि)जो मुनी कुटिलता सोडून निर्मल [शुद्ध] हृदयाने आचरण करतो कुटिलभाव, कपटाचार करत नाही. (तस्स दु तइओ अज्जवधम्मं णियमेण संभवदि)त्यालाच तिसरा आर्जवधर्म नियमाने आहे.

भावार्थ - आर्जव धर्म म्हणजे मनवचनकायेची ऋजु, सरळ प्रवृत्ती. ती कुटिलतेच्या अभावात असू शकते. कुटिलता म्हणजे कपटाचार-मनवचनकायेची वक्रता-म्हणजे मनात असेल ते न बोलणे, व मन वचन द्वारा जे अभिप्रेत असेल तर ते कायेने न करणे. कपट, माया, छल हा अधर्म असून मनवचनकायेची ऋजुता हा आर्जवधर्म आहे. कपटाचार, मायेने दुसऱ्यास ठगविणे ही आपल्या आत्म्याचीच फसवणूक आहे.

ही अनंतानुबंधी माया आहे. वस्तुस्वरूप जाणून तदनुसार प्रवृत्ती ही ऋजुता असून तो आत्म्याचा स्वभावधर्म आहे. तीच हृदयाची निर्मलता आहे. हेच आर्जवधर्माचे अंतरंग स्वरूप असून चरम लक्ष्यही तेच आहे.

व्यवहारातही कपटाचे फळ व ऋजुतेचे फळ यामध्ये अंतर स्पष्ट दिसून येतेकपट हे चोराचे नगर आहे. चोराच्या नगरीत जावूं नये कपट करूं नये.परिणामांची ऋजुता असेल तर त्यास अंतरंग आणि बहिरंग संपत्ति प्राप्त होते. कविवर द्यानतराय सांगतात -

कपट न कीजे कोय, चोरन के पुर ना वसे ।
सरल सुभावी होय, ताके घर बहु संपदा ॥

उत्तम सत्य धर्माचे स्वरूप -

परसंतावयकारणवयणं मोत्तूण सपरहिदवयणं ।
जो वददि भिक्खु तुरीयो, तस्स दु धम्मो हव्वे सच्चं ॥ ७४ ॥
परसंतापककारणवचनं मुक्त्वा स्वपरहितवचनं ।
यो वदति भिक्षुस्तुरीयस्तस्य तु धर्मः भवति सत्यम् ॥ ७४ ॥

अन्वयार्थ - (परसंतावयकारणवयणं मोत्तूण)दुसऱ्यांना संताप उत्पन्न करण्यास कारणभूत वचनाचा त्याग करून(जो भिक्खू सपरहिदवयणं वदति)जो साधू स्वपरास हितकारक वचन बोलतो(तस्स दु तुरीयो सच्चं धम्मो हवे)त्यालाच चौथा उत्तम सत्य धर्म आहे.

भावार्थ - जेणेकरून दुसऱ्यास संताप व दुःख होईल असे वचन बोलणे हा अधर्म आहे. कारण आत्मस्वभावाच्या विस्मृतीमध्येच म्हणजे अंतर्यामी निश्चयधर्म नसतांनाच असत्य वचन बोलणे संभवते. जर बोलावयाचेच असेल तर जे आपणास स्वतःला आणि दुसऱ्याला हितकारक असेल तेवढेच बोलावे. जिनवचन हे स्वपरहितकारक वचन आहे. म्हणून जिनवचनाला धरून बोलणे हेच स्वपरहितसाधक आहे. म्हणून स्वामि कार्तिकेयांनी उत्तम सत्यधर्माचे स्वरूप सांगतांना" जिणवयणमेव भासदि "जो जिनवचन तेवढेच बोलतो त्यास उत्तम सत्य धर्म म्हटलेले आहे. जिनवचनास अनुसरून असणारे वचनही जिनवचनच आहे.

सत्य म्हणजे वस्तू ज्या गुणपर्यायरूपाने सत् आहे त्या रूपाने मानणे व कथन करणे हा सत्य धर्म आहे. आत्मा चेतनारूपाने त्रिकाल सत् असतांना तसेच स्वीकारणे व रागादिरूपाने तो क्षणमात्र परिणमतो म्हणून रागरूपाने त्रिकाल सत नाही असे मानणे हा उत्तम सत्यधर्माचा अंगीकार आहे व तसे वचन हे सत्यवचन आहे.



आत्म्यामध्ये क्षणिक रागादि पर्याय पाहून त्यास विकारस्वभावी मानणे, राग जीवाचे लक्षण मानणे हा असत्यधर्माचा आविष्कार आहे.

कठीण वचन मत बोल परनिंदा अरु झूठ तज ।
साच जवाहर खोल सतवादी जग में सुखी ॥

ही गृहस्थाच्या सत्यधर्माची मर्यादा आहे.

उत्तम शौचधर्माचे स्वरूप -

कंखाभावणिवित्तिं, किच्चा वेरग्गभावणाजुत्तो ।
जो वट्टदि परममुणी, तस्स दु धम्मो हवे सोच्चं ॥ ७५ ॥
कांक्षाभावनिवृत्तिं कृत्वा वैराग्यभावनायुक्तः ।
यो वर्तते परममुनिस्तस्य तु धर्मो भवति शौचम् ॥ ७५ ॥

अन्वयार्थ - (जो परममुणी कंखाभावणिवित्तिं किच्चा वेरग्गभावणाजुन्तो वट्टदि) जो उत्तम साधू कांक्षारूपभाव म्हणजे इच्छाभावापासून निवृत्त होऊन वैराग्यभावनासहित प्रवृत्ती करतो(तस्स दु सोच्चं धम्मो हवे) त्यालाच शौच धर्म असतो.

भावार्थ - शौच म्हणजे शुद्धतारूप परिणाम. जोपावेतो पर आणि परभाव यांची आकांक्षा आणि इच्छा आहे तो पावेतो आत्मा शुद्ध असत नाही.परपरिग्रहाच्या आकांक्षेमुळे जीवमात्र अपवित्र आहे, त्यामुळे हिंसा, असत्यादि सर्वच पापे करतो, कोणतेही पाप करण्यास कचरत नाही व त्यामुळे अनंत संसारात दुःख भोगत भटकतो. तो अधर्म आहे. तो सोडल्याशिवाय शौच धर्म कसा असेल ?

इच्छा करणे म्हणजे अप्राप्त वस्तूची कांक्षा. त्याची पूर्ती आपल्या इच्छा केल्याने थोडीच होणार आहे ? त्याची प्राप्ती तर नियतीला अनुसरून पुण्योदयाने होईल. म्हणून इच्छा करणे हेच खोटे आहे. त्याचे फळ एकमात्र अखंड आकुलता हेच आहे" लोभ पापका बाप बरवाना । " " आशापाश महादुःखदाणी " असे कविवर द्यानतराय म्हणतात. अतएव लेभ हा अधर्म असून लेभाचा अभाव म्हणजे उत्तम शौच धर्म आहे व तोच सहज स्वाभाविक धर्म आहे. निरीच्छता हाच अनंत शाश्वत सुखाचा एकमेव उपाय आहे. आणि निरीच्छता हेच सम्यग्दृष्टीचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

सम्यग्दृष्टेर्भवति नियतं ज्ञानवैराग्यशक्तिः ।

सम्यग्दृष्टीला निश्चितपणे आत्मज्ञान आणि वैराग्य या दोन शक्ती असतात. त्यामुळेच तो कर्मोदयवश परिग्रहाने घेरलेला दिसून येतो तरीही तो कर्मांनी लिप्त होत नाही. अभिप्राय निर्मल असल्यामुळे तो सदैव कर्मांचा संवर आणि निर्जराच करतो. बंध करीत नाही. हेच तर सम्यग्दर्शनाचे माहात्म्य आहे.

उत्तम संयम धर्माचे स्वरूप -

वदसमिदिपालणाए, दंडच्चायेण इंदियजयेण ।
परिणममाणस्स पुणो, संजमधम्मो हवे णियमा ॥ ७६ ॥

व्रतसमितिपालनेन, दंडत्यागेनेन्द्रियजयेन ।
परिणममानस्य पुनः संयमधर्मो भवेन्नियमात् ॥ ७६ ॥

अन्वयार्थ - (वदसमिदिपालणाए दंडच्चायेण इंदियजयेण परिणममाणस्स)जो उत्तम साधू व्रते, समिति आदींचे पालन करतो, मनवचन काय याच्या प्रवृत्तीचा निरोध करतो व पांचही इंद्रियावर विजय प्राप्त करतो याप्रमाणे प्रवृत्ती करणाऱ्या साधूला (णियमा संजमधम्मो हवे)नियमाने संयम धर्म असतो.

भावार्थ - हा अज्ञानी प्राणी चारही कषाय आणि पाच पापद्वारा वाट्टेल तसा अविवेकाने प्रवृत्ती करतो. त्याच्या जीवनाला श्रद्धेचे नियमन नाही व ज्ञान इतस्ततः भटकते आहे व आचरणाला मर्यादाही नाही व सूत्र ही नाही. हाच असंयम आहे. कारण त्याच्या श्रद्धा, ज्ञान, चारित्र या मूलभूत प्रवृत्ती आत्म्याच्या शुद्धस्वभावामध्ये तन्मय न होतां, संलग्न होत नाहीत. तो बेफाम रागद्वेषमोहानुसार उन्मत्त पुरुषाप्रमाणे वागतो. असा हा असंयम अधर्म असून एकमात्र शुद्ध आत्मस्वभावाच्या आश्रयाने श्रद्धा-ज्ञान-चारित्राची प्रवृत्ती नियमित व नियंत्रित करणे हा संयम असून तोच धर्म आहे. स्वभावात स्थिरता हा संयम धर्म आहे.

उत्तम तपाचे स्वरूप -

विसयकसायविणिग्गहभावं काऊण झाणसज्झाए ।
जो भावइ अप्पाणं तस्स तवं होदि णियमेण ॥ ७७ ॥

विषयकषायविनिग्रहभावं कृत्वा ध्यानस्वाध्यायेन ।
जो भावयत्यात्मानं तस्य तपः भवति नियमेन ॥ ७७ ॥

अन्वयार्थ - (जो विसयकसायविणिग्गहभावं काऊण झाणसज्झाए अप्पाणं भावइ) जो तपस्वी विषय आणि कषायांचा विनिग्रह [निरोध] करून ध्यान आणि स्वाध्यायद्वारा आपल्या आत्म्याच्या शुद्धस्वरूपाचे चिंतवन करतो,(तस्स णिमयेण तवं होदि)त्याला नियमाने तप असते.

भावार्थ - उत्तम तपाला नियमाने संयमाची जोड असतेच. आणि संयम हा तपात परिणत होणे हेच संयमाचे फल आहे. एरवी त्या संयमाला कांहीच अर्थ नाही. तप याचे लक्षण इच्छेच्या निरोध हे केलेले आहे.इच्छानिरोधस्तपः । याद्वारा संयमाची अनिवार्यता प्रगट झालेली आहे. तसेच स्वरूपे तपनं तपः । स्वरूपामध्ये उग्र पुरुषार्थाने तल्लीन राहणे हे तपाचे लक्षण विधीरूपाने केले आहे व पहिले लक्षण निषेधरूपाने केलेले आहे. पण दोहोंचाही अर्थ एकच आहे.संयमामध्ये निरोध व निग्रहाची प्रधानता आहे तर तपामध्ये ध्यानाची, स्वरूपप्रवृत्तीची प्रधानता आहे. दोन्हीही युगपत् प्रगट होतात.

उत्तम त्यागाचे स्वरूप -

णिव्वेयतियं भावइ, मोहं चइउण सव्वदव्वेसु ।
जो तस्स हवे चागो, इदि भणिदं जिणवरिंदेहिं ॥ ७८ ॥

निर्वेदत्रिकं भावयति, मोहं त्यक्त्वा सर्वद्रव्येषु ।
जो तस्स हवे त्यागो इदि भणिदं जिणवरिंदेहिं ॥ ७८ ॥

अन्वयार्थ - (जो सव्वदव्वेसु मोहं चइउण णिव्वेदतियं भावइ)जो श्रमण सर्व वस्तुमात्रामध्ये आत्मत्वबुद्धीचा त्याग करून जो निर्वेदाची उदासीनतेची भावना करतो (तस्स चागो हवे) त्यास उत्तम त्याग असतो (इदि जिणवरिंदेहिं भणिदं) असे जिनवरांनी सांगितलेले आहे.

भावार्थ - वास्तविक त्याग म्हणजे परद्रव्यामध्ये रागद्वेषमोहाला सोडणे हा आहे. परवस्तुला सोडणे हा तर उपचाराने त्याग आहे. कारण जर परवस्तूचे ग्रहणच केलेले नाही तर त्याचा त्याग आपण कसा करणार? परवस्तूचे ग्रहण आणि सोडणे आपले स्वाधीन नाही. आपण मोहाने फक्त विकल्प करू शकतो. म्हणून एकत्वबुद्धीचा त्याग हाच खरा त्याग आहे. जे आपले आहे ते तर आपलेच गुणपर्याय आहेत. आपण आपल्या शुद्ध ध्रुव द्रव्य व स्वभावाला विसरलो आहोत, त्याचे भान व ज्ञान झाले हेच ग्रहण आहे आणि ज्या विकारी भावांना आपले समजून बसलो होतो त्यास हेय जाणले हाच त्याग आहे. आपण आपल्या परिणामासच ग्रहण करू शकतो, सोडू शकतो.

म्हणून निश्चयाने रागद्वेषमोह सोडणे हाच त्याग आहे." निहचै रागद्वेष निरवारे।" असे कवि द्यानतराय दशधर्मपूजेत सांगतातच. परंतु गृहस्थाने आपल्या मालकीच्या वस्तू सत्पात्रांना धर्मसाधना सुलभ व्हावी म्हणून निरपेक्ष भावनेने द्याव्यात, यातच संपत्ती सफल आहे व गृहस्थधर्माचे सर्वस्व आहे. परंतु ही श्रद्धा मात्र असावी की, रागद्वेषनिवृत्ती हा निश्चयाने त्याग असून दान हा व्यवहाराने त्यागधर्म आहे.

उत्तम आकिंचन्य धर्माचे स्वरूप -

होऊण य णिस्संगो, णियभावं णिग्गहित्तु सुहदुहदं ।
णिद्दंदेण दु वट्टदि, अणयारो तस्स आकिंचण्हं ॥ ७९ ॥

भूत्वा च निःसंगः, निजभावं निगृह्य सुखदुःखदं ।

निर्द्वंदेन तु वर्तते अनगारो तस्य आकिंचन्यम् ॥ ७९ ॥

अन्वयार्थ - (जो अणगारो निस्संगो होऊण य सुहदुहदं णियभावं णिग्गहित्तु) अनगारी मुनी सर्व प्रकारच्या अंतरंग व बहिरंग परिग्रहाने रहित होऊन आणि सुखदुःखास कारणभूत आपल्या मोहोदयजनित रागद्वेषांचा निग्रह करून (णिद्दंदेण दु वट्टदे) निर्द्वंद्व होऊन सदैव आत्मस्वरूपांत लीन राहतो (तस्स अकिंचण्हं) त्यालाच उत्तम आकिंचन्य धर्म असतो.

भावार्थ - जो परद्रव्यास आत्मरूपाने स्वीकारतो तो परिग्रही, किंचनभावधारी म्हटल्या जातो आणि जो समस्त परवस्तुला तर आत्मबुद्धीने आपले मानतच नाही परंतु कर्मजनित रागद्वेषादि परभावांनाही आपले मानत नाही तो खऱ्या अर्थाने अकिंचन आहे. अशाप्रकारे जो सर्वप्रकारचा चवदा अंतरंग परिग्रह व १० प्रकारचा बहिरंग परिग्रह यांचा त्याग करतो तसेच आपल्या एक, ध्रुव, स्वभावामध्ये निर्विकल्प स्थित राहतो तोच खरा अपरिग्रही व निर्ग्रंथ साधू होय. त्याला आकिंचन्य धर्म असतो.

वस्तुतः तर कोणतेही परद्रव्य आत्म्यापासून अत्यंत भिन्न आहे. तर ते आपले कसे होईल ? त्यांना आपले मानणे, म्हणजेच इच्छा. हाच खऱ्या अर्थाने परिग्रह आहे. तो ज्यास नाही तो ज्ञानी आहे. म्हणूनच निर्ममत्व हेच आकिंचन्य धर्माचे स्वरूप आहे. परंतु या निर्ममत्वाची भावना आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाच्या ग्रहणाशी अविनाभावी आहे. म्हणून शुद्ध आत्माचा साधक हा निर्ममच असतो.

उत्तम ब्रह्मचर्यधर्माचे स्वरूप -

सव्वंगं पेच्छंतो, इत्थीणं तासु मुयदि रदिभावं ।
सो बह्मचेरभावं सुक्कदि खलु दुद्धरं धरदि ॥ ८० ॥

सर्वांगं पश्यन् स्त्रीणां तासु मुंचति रतिभावं ।
सो ब्रह्मचर्यभावं सुकृतिः खलु दुर्धरं धरति ॥ ८० ॥

अन्वयार्थ - (जो इत्थीणं सव्वंगं पेच्छंतो) जो स्त्रियांचे सर्व अंग नजरेस पडले असतांनाही (तासु रदिभावं मुयदि) तेव्हा स्त्रियांमध्ये रतिभावाचा त्याग करतो (सो खलु दुद्धरं बम्हचेरभावं धरदि) तोच खरोखर दुर्धर ब्रह्मचर्याचे पालन करतो.

भावार्थ - जेव्हा एखादी स्त्री सहज सर्वांग नजरेस पडते तेव्हां सुद्धा, अशा बिकट प्रसंगी सुद्धा जो तेथे रतिभावाने व्याकुळ होत नाही ते त्या साधूचे खरे ब्रह्मचर्यव्रत आहे. जो स्त्रियाशी जाणून संपर्क साधतो व त्यांचे नृत्यगान पाहतो, तेथे रस घेतो, लीन होतो तो तर अपराध आहे. तेथे साधुपणाच राहात नाही. म्हणून राजचंद्रजी



ब्रह्मचर्याची महिमा सांगतात -

निरखिने नवयौवना, लेश न विषयनिदान ।
गणे काष्टनी पूतली, ते भगवान समान ॥

ज्यांचे नजरेला एखादी नवयौवना पडली असतांना ज्यांच्या मनांत यत्किंचितही विषयवासना उत्पन्न होत नाही व तिला जे लाकडाची बाहुली मानतात ते भगवंताप्रमाणे वंद्य आहेत.

वास्तविक तर ब्रह्मचर्य याचा अर्थ आपल्या शुद्ध आत्म्यामध्ये रममाण होणे असा आहे. शुद्धात्मस्वरूपांत रमणता असतांना तेव्हा तेथे स्त्रीराग कसा असूं शकेल ? धर्मानुप्रेक्षेचा समारोप दोन गाथेत करणार आहेत. तर प्रथमतः श्रावकधर्म सोडून जो मुनीधर्म अंगीकारतो तोच मोक्ष प्राप्त करतो हे सांगतात -

सावयधम्मं चत्ता, जदिधम्मे जो पवट्टए जीवो ।
सो चेव जादि मोक्खं धम्मं इदि चिंतए णिच्चं ॥ ८१ ॥

श्रावकधर्मं त्यक्त्वा, यतिधर्मे यः प्रवर्तते जीवः ।
स चैव याति मोक्षं, धर्ममिति चिंतयेन्नित्यम् ॥ ८१ ॥

अन्वयार्थ - (जो जीवो सावयधम्मं चत्ता जदिधम्मे पवट्टए) जो जीव श्रावकधर्म सोडून मुनीधर्म स्वीकारून मुनीचर्येमध्ये लीन होतो, प्रवृत्ती करतो (सो चेव धम्मं मोक्खं जादि) तोच धर्मास धारण करून मोक्ष प्राप्त करतो.

भावार्थ - गृहस्थधर्म आणि मुनीधर्म असे दोनप्रकारे जे धर्माचे कथन करण्यात आले आहे त्यावरूनहे धर्म दोन असून त्यापैकी कोणत्याही एकाचा अंगीकार केला असता मोक्ष मिळतो असा भ्रम कोणी करून घेवूं नये. धर्म तर एकच आहे आणि तो रत्नत्रयाच्या एकाग्रता स्वरूपाचाच आहे. योगरहित भूमिका म्हणजेच चारित्र चरम पदवीस पोचले तरच उत्तरसमयात नियमाने मोक्ष प्राप्त होतो. असे मात्र मुळीच नाही गृहस्थधर्म पालन करतां करतां मुनी न होतां मोक्ष होईल. गृहस्थही तोच आहे की ज्याची यतिधर्मामध्ये आस्था आणि निष्ठा असून " मी मुनी कधी होईल ?" असा एकच ध्यास त्यास असतो. मुनीधर्माशिवाय मोक्ष कोणत्याही प्रकारे संभवनीय नाही. गृहस्थसुलभ वस्त्रादि परिग्रह सोडल्याशिवाय मुनीपद नाही व मुनीपदाशिवाय मोक्षाची प्राप्ती होत नाही कारण गृहस्थ धर्म हा आपणामध्ये परिपूर्ण धर्म नाही. गृहस्थधर्म हा अपवादमार्ग असून श्रामण्य म्हणजेच रत्नत्रयाची एकाग्रता हाच एकमेव मोक्षमार्ग आहे. तोच उत्सर्ग मार्ग आहे असे सदैव चिंतन करावे.

धर्मानुप्रेक्षेचा समारोप करतात -

णिच्छयणयेण जीवो सागारणगारधम्मदो भिण्णो ।
मज्झत्थभावणाए, सुद्धप्पं चिंतए णिच्चं ॥ ८२ ॥
निश्चयनयेन जीवो सागारानगारधर्मतो भिन्नः ।
मध्यस्थभावनया शुद्धात्मानं चिंतयेन्नित्यम् ॥ ८२ ॥

अन्वयार्थ - (णिच्छयणयेण जीवो सागारणगारधम्मदो भिण्णो)निश्चयनयाने पाहले तर जीव सागार व अनगारधर्मापासून भिन्न आहे.(मज्झत्थभावणाए सुद्धप्पं णिच्चं चिंतये) याप्रमाणे मध्यस्थ भावनेने आपल्या शुद्ध आत्म्याचे नेहमी चिंतन करावे.

भावार्थ - आत्मा हा निश्चयनयाने ध्रुव, एक, चैतन्यमात्र आहे. सर्व अवस्थामध्ये जीव शुद्धनयाने असाच अनुभवास येतो. हा शुद्ध आत्मा प्रमत्त-अप्रमत्त, ज्ञेयाश्रित विकल्प, गुणभेद आणि व्यावहारिक नवपदार्थ या सर्वच विकल्पापासून भिन्नच ज्ञायकमात्र प्रतीत होतो. तसेच पर्यायभेदरूप विकल्प आणि गृहस्थलिंग व अनगारलिंग याही विकल्पापासून कथंचित् भिन्नच आहे. कारण हे सर्व भाव पर्यायरूप असून जीव तर शुद्ध शाश्वत चैतन्य स्वभावी आहे. म्हणून सागारधर्म व अनगारधर्म हे दोन्ही विकल्प आहेत. जीव निश्चयाने त्यापासूनही भिन्न आहेच. समयसारच्या सर्वविशुद्ध ज्ञानाधिकाराच्या ४०५ ते ४१० पर्यंत गाथामध्ये आत्मा हा सर्वच लिंगापासून- गृहीलिंग आणि अनगार लिंग या पासूनही भिन्न आहे हे तेथे सांगितलेले आहे. म्हणून निश्चयनयाच्या आश्रयाने मध्यस्थ भावनेने अद्वैतस्वरूप आपल्या शुद्ध आत्म्याचे सदैव चिंतन करावे. हेच धर्मानुप्रेक्षेचे फलित आहे.

●●●



# बोधि-अनुप्रेक्षा

उपज्जदि सण्णाणं जेण उवायेण तस्सुवायस्स ।
चिंता हवेइ बोही अच्चंतं दुल्लहं होदि ॥ ८३ ॥
उत्पद्यते सज्ज्ञानं येन उपायेन तस्योपायस्य ।
चिंता भवति बोधिरत्यंतं दुर्लभा भवति ॥ ८३ ॥

अन्वयार्थ - (जेण उवायेण सण्णाणं उपज्जदि)ज्या उपायाने सम्यग्ज्ञान उत्पन्न होते (तस्सुवायस्स चिंता बोही) त्या उपायाची चिंता यास बोधि म्हणतात. आणि ती बोधि (अच्चंतं दुल्लहं होदि) अत्यंत दुर्लभ आहे.

भावार्थ - सम्यग्ज्ञानाची प्राप्ती होणे हे संसारामध्ये दुर्लभ आहे. म्हणून सम्यग्ज्ञान कसे प्राप्त होईल याचीच वारंवार चिंता वाहणे हे आवश्यक आहे.

धन-कन-कंचन राजसुख सबही सुलभ कर जान ।
दुर्लभ है संसारमें, एक जथारथ ज्ञान ॥

कवि भूधरदास, बोधि दुर्लभानुप्रेक्षा.

अर्थ - धन, धान्य, सोने व राजसुख यांची प्राप्ती या संसारामध्ये सुलभ आहे असे तू जाण. परंतु या सांसारीक भावापासून भिन्न असे एक यथार्थ सम्यग्ज्ञान मात्र प्राप्त होणे अत्यंत दुर्लभ आहे.

हेयोपादेय भेदविज्ञानपूर्वक अथवा ज्ञेय-ज्ञायक भेदविज्ञानपूर्वक जे ज्ञान त्यास सम्यग्ज्ञान म्हणतात. शुद्ध आत्मस्वरूपाच्या निर्णयाविना जे ज्ञान ते क्षायोपशमिक अज्ञान आहे. सम्यग्ज्ञान ज्ञायक आत्म्यास ज्ञेयापासून, रागद्वेषापासून भिन्न करून जाणते आणि अज्ञान या सर्वास एकरूप मानून जाणते. म्हणून अज्ञान म्हणजे ठगविलेले ज्ञान. निगोद दशा, स्थावर दशा, त्रस दशा, संज्ञीपणा त्यांतही मनुष्यभव, सुकुल, जैनधर्म या गोष्टी एकापेक्षा एक प्राप्त होणे कठीण आहे. सद्धर्म व वैराग्याची प्राप्ती ही तर अत्यंत दुर्लभ आहे. यांच्या स्वरूपाचे ज्ञान आणि त्यासाठी त्याच्या उपायाची चिंता करणे हे मुमुक्षु जीवाचे आवश्यक असे प्रथम कर्तव्य आहे. म्हणून सदैव सम्यग्ज्ञानाच्या उपायाचे व स्वरूपाचे चिंतन वारंवार करावयास हवे. या चिंतनालाच बोधि असे म्हणतात. सर्व साधारण जीव संसार आणि रागादिकांची पूर्ती

कशी होईल या चिंतेत चूर असतात. त्यांना मोक्ष, मोक्षमार्ग धर्म, सम्यग्ज्ञान व सम्यग्ज्ञानाच्या उपायांची चिंता करण्यासाठी सवडच नाही. म्हणून या बोधीची प्राप्ती दुर्लभ आहे व तिचा उपायही दुर्लभ आहे.

सम्यग्ज्ञानाचे, सत् ज्ञानाचे स्वरूप सांगतात

कम्मुदयजपज्ञाओ हेयं खाओयसमियणाणं खु ।
सगदव्वमुवादेयं णिच्छित्ति होदि सण्णाणं ॥ ८४ ॥

कर्मोदयजपर्यायो हेयः क्षायोपशमिकं ज्ञानं खलु ।
खकद्रव्यमुपादेयं निश्चितिर्भवति सज्ज्ञानम् ॥ ८४ ॥

अन्वयार्थ - (कम्मुदयजपज्ञाओ, खु खाओपसमियं णाणं हेयं)सर्व कर्मोदय जनित पर्याय आणि क्षायोपशमिक ज्ञान खरोखर हेय आहे. तसेच(सगकदव्वमुवादेयं णिच्छिति सण्णाणं होदि) आपला शुद्ध आत्मा व सम्यग्ज्ञान उपादेय आहे असा निर्णय, निश्चित मान्यता व अनुभूति सज्ज्ञान आहे.

भावार्थ - १ रागद्वेषमोह, कषाय, नोकषाय, २ गति, ३ अज्ञान वगैरे भाव कर्मोदयजनित आहेत. पहिले मोहोदयजनित आहेत. गति वगैरे नामकर्मोदयजनित, अज्ञान ज्ञानावरण क्षयोपशमजनित आहे. मतिज्ञान श्रुतज्ञानादि अज्ञान हे क्षायोपमिक भाव आहेत. ज्ञान क्रमवर्ती, इन्द्रियसापेक्ष, अस्पष्ट असल्यामुळे हेय आहे. ह्याच कारणाने ईच्छा क्षायोपशमिक आहे.हे सर्व उदयजनित व क्षायोपशमिक विकारी भाव हेय आहेत आणि आपला शुद्ध आत्मा उपादेय आहे. एवढा निर्णय जेणे करून होईल ते सर्व व हा निर्णय हे सज्ज्ञान आहे. कारण ते सिद्धपद व शाश्वत सुखाचे कारण आहे. आणि शेष सर्व ज्ञान हे संसारविषयक सुखदुःखास कारण असल्यामुळे सज्ज्ञानरूप नाही. ते मिथ्याज्ञानाच्या कोटीत आहे.

आत्मा आणि परद्रव्य यांचा निर्णय करतात.

मूलुत्तरपयडिओ, मिच्छत्तादि असंखलोगपरिमाणा ।
परदव्वं सगदव्वं, अप्पा इदि णिच्छयणयेण ॥ ८५ ॥

मूलोत्तराः प्रकृतयो मिथ्यात्वादयोऽसंख्यलोकपरिमाणा ।
परद्रव्यं स्वकद्रव्यं आत्मा इति निश्चयनयेन ॥ ८५ ॥

अन्वयार्थ - (मूलुत्तरपयडिओ मिच्छत्तादि असंखलोगपरिमाणा परदव्वं)मूल आणि उत्तर प्रकृति आणि मिथ्यात्वादि असंख्य लोकप्रमाण परिणाम हे सर्व परद्रव्य आहेत आणि (णिच्छयणयेण सगदव्वं अप्पा इदि) आणि निश्चयनयाने आत्मा एक चैतन्यमात्र स्वक आत्मद्रव्य आहे.



भावार्थ - शरीर तर नवीन प्राप्त झालेले व नष्ट होणारे जड आहे हे प्रत्यक्ष दिसून येते. त्यामुळे तेही परद्रव्य आहे, यात विकल्पाला जागा नाही, परंतु कर्मांच्या मूल प्रकृती आणि उत्तर प्रकृती या जीवासह अनेक भवापर्यंत जातात. तरीही त्या जीवास कांही सुख देत नाहीत. वस्तुतः तेही परद्रव्यच आहे. परंतु कर्माच्या उदयामध्ये जीवाच्या स्वयं अपराधाने होणारे मिथ्यात्वकषायादि असंख्यलोकप्रमाण भाव हेही परद्रव्य आहेत. कारण आत्म्याच्या शुद्ध स्वभावापासून लक्षणाने स्वरूपाने भिन्न असल्यामुळे आत्म्याच्या शुद्ध स्वभावांत त्याची नास्तिच म्हणायला हवी. म्हणून हे रागादि जीवाचे विकारीभाव सुद्धा परद्रव्यच आहेत.

एक त्रिकालध्रुव ज्ञायकस्वरूप शुद्ध आत्मा एकमात्र स्वद्रव्य आहे. हा निर्णय विशेषत्वाने जाणून घेण्यासाठी समयसार, प्रवचनसार इत्यादि आ. कुंदकुंदाचे साहित्याचा अभ्यास करावा.

या बोधिभावनेचा समारोप करतात -

एबं जायदि णाणं हेयमुवादेय णिच्छये णत्थि ।
चिंतेज्जहि मुणि बोहिं, संसारविरमणट्ठे य ॥ ८६ ॥

एवं जायते ज्ञानं, हेयमुपादेयं निश्चयेन नास्ति ।
चिंतयेन्मुनिः बोहिं संसारविरमणार्थं च ॥ ८६ ॥

अन्वयार्थ - (एवं णाणं जायदि) याप्रमाणे हेयोपादेयाचे ज्ञान होते.(णिच्छये हेयमुवादेयं णत्थि)परंतु ज्ञान स्वयं मात्र हेय उपादेय नाही(संसारविरमणट्ठे मुणि बोहिं चिंतेज्जहि) आणि संसारापासून निवृत्ति व्हावी या प्रयोजनाने मुनी-मननशील ज्ञानी जीवांनी बोधि-अनुप्रेक्षेचे चिंतवन करावे.

भावार्थ - याप्रमाणे सज्ज्ञान, बोधि, स्वद्रव्य, परद्रव्य याचे ज्ञान होते. पण ज्ञान हे तर स्वयं हेय वा उपादेय नाही. उलट हेय व उपादेय दोहोसही जाणणे कार्यकारी आहे. जीवाने ज्ञानद्वारा अप्रयोजनभूत तत्वांचा जो निर्णय केला ती अप्रयोजनभूत तत्त्वे हेय आहेत आणि ज्या प्रयोजनभूत तत्त्वांचा निर्णय केला ती तत्त्वे उपादेय आहेत. म्हणून संसाराच्या नाशासाठी हेयोपादेयाचे ज्ञान आवश्यक आहे. म्हणून बोधि व सज्ज्ञानाच्या स्वरूपाचे चिंतवन करावे.

ज्ञान हा जीवाचा स्वभाव आहे. तो तर त्याने अनादिकाळापासून स्वीकारलेला आहेच. त्याचा नाशही होत नाही. तो नवीन ग्रहण करणे व सोडणे ही गोष्ट कशी शक्य होणार ? म्हणून ज्ञान हे तर न हेय आणि न उपादेय आहे. परंतु तत्त्व जाणण्याचा उपाय म्हणून ज्ञान हा जीवाचा सहज भाव आहे.

तसेच कोणतेही परद्रव्यही स्वरूपाने जसे आहे, तसे आहे. ते न इष्ट आहे, न उपादेय आहे. तद्वत् न अनिष्ट आहे न हेय आहे. इष्टानिष्ट बुद्धी अथवा हेयोपादेयबुद्धी हा जीवाचा विकल्प आहे. त्यामुळे अज्ञानी परद्रव्यास इष्ट-अनिष्ट अथवा हेय-उपादेय मानतो.

म्हणजे जीवाचे परिणामच हे हेय वा उपादेय आहेत. रागद्वेष मोह हे आस्रवभाव, अध्यवसान, पुण्य-पाप आदि शुभाशुभ विकार हे चेतनस्वभावापासून विलक्षण असल्यामुळे हेय आहेत. तसेच शुद्धोपयोग, शुद्ध ज्ञायकभावाच्या अवलंबनाने होणारे श्रद्धा-ज्ञान-चारित्राचे परिणाम हे उपादेय आहेत. जीवाचा ध्रुव ज्ञायक भाव हा नित्य असल्यामुळे नित्य स्वभावामध्ये हेयोपादेयपणा असू शकत नाही. याप्रमाणे बोधी याच्या स्वरूपाचे व प्राप्तीच्या उपायचे चिंतवन करून संसाराचा नाश करण्याचा पुरुषार्थ करावा.

हाच बोधि अनुप्रेक्षेचा आशयपं. जयचंदजी छाबडा या शद्वाने प्रगट करतात-

बोधि आपका भाव है, निश्चय दुर्लभ नाहिं ।
भव मे प्रापति कठिन है, यह व्यवहार कहाहि ॥

अर्थ - बोधि म्हणजे सज्ज्ञानाच्या प्राप्तीचा उपाय स्वपरविवेक असून तो जीवाचा भाव आहे. निश्चयाने जीवाच्या भावाची प्राप्ती दुर्लभ कशी असेल ? अर्थात असणार नाही. तरीही बोधीची प्राप्ती दुर्लभ आहे असे म्हणतात ते व्यवहाराने, संसार परिभ्रमणाच्या अपेक्षेने.

●●●



# बारस अणुवेक्खेचा उपसंहार

बारस अणुवेक्खाओ पच्चखाणं तहेव पडिकमणं ।
आलेयणं समाहि, तम्हा भावेज्ज अणुवेक्खं ॥ ८७ ॥

द्वादश अनुप्रेक्षातः प्रत्याख्यानं तथैव प्रतिक्रमणं ।
आलोचनं समाधिः तस्माद् भावयेदनुप्रेक्षां ॥ ८७ ॥

अन्वयार्थ - (बारस अणुवेक्खाओ)बारा अनुप्रेक्षेच्या चिंतवनामुळे(पच्चक्खाणं तहेव पडिकमणं आलेयणं समाहि) प्रत्याख्यान, प्रतिक्रमण व आलेचना समाधि साधते. (तम्हा भावेज्ज अणुवेक्खं) म्हणून अनुप्रेक्षांचे चिंतवन करा. भावना करा.

भावार्थ - अनुप्रेक्षामध्ये संसाराच्या स्वरूपाचे, मोक्षातील शाश्वत सुखाचे व त्यास कारणभूत आत्म्याच्या शुद्ध स्वभावाचाच विचार आणि चिंतवन आहे.

शुद्ध स्वरूपाच्या चिंतवनाने ध्यानाची सिद्धी होते. या वर्तमान काळातील धर्मध्यानाने तीन काळातील जीवांचे रागद्वेषादि मनवचनकायेने केलेली कृत्ये खोटी होऊन त्यांचा पीळ समाप्त होतो; त्यामुळे शुद्ध आत्मा अनुभवास येतो. त्यामुळेप्रतिक्रमण होते. तद्वत् भविष्यत्कालीन सर्व कर्मापासून भिन्न आपल्याच ज्ञायक स्वभावाच्या उपासनेने ध्यानाने भावी कर्माची आस्था राहत नाही. त्यामुळेप्रत्याख्यानही होते. तसेच वर्तमान उपासनासमयी तो ज्ञायकभावास वर्तमान रागद्वेषादि कर्मापूसन भिन्न करतो. म्हणून ती उपासना हीच आलेचना आहे. आणि तीच सम्यग्दर्शन सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्राची एकाग्रता असल्यामुळे समाधीही आहे. याप्रमाणेज्ञायक ध्रुव स्वभावाची उपासना म्हणजेच प्रत्याख्यान आहे, प्रतिक्रमण आहे, आलेचना आहे व समाधि आहेम्हणून या बारा अनुप्रेक्षांचे नित्य चिंतवन करावे.

अतएव हे प्रतिक्रमणादिक करण्याचा उपदेश देतात -

रत्तिदिवं पडिक्कमणं पच्चक्खाणं समाहिं सामइयं ।
आलेयणं पकुव्वहि, जदि विज्जदि अप्पणो सत्ती ॥ ८८ ॥

रात्रिंदिवं प्रतिक्रमणं प्रत्याख्यानं समाधिं सामायिकं ।
आलोचनं प्रकुर्वत यदि विद्यते आत्मनः शक्तिः ॥ ८८ ॥

अन्वयार्थ - (जदि अप्पणो सत्ती विज्जदे)जर आपली शक्ति व्यक्त रूपाने विद्यमान असेल तर(पडिक्कमणं पच्चक्खाणं समाहिं सामाइयं आलेयणं)प्रतिक्रमण, प्रत्याख्यान,

समाधि, सामायिक आणि आलोचना (पकुव्वहि) करावयास पाहिजे.

भावार्थ - साधूंना आपल्या शक्तीप्रमाणे प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, आलोचना, समाधी व सामायिक यासाठी प्रतिक्षण पुरुषार्थ करावयास पाहिजे. परंतु भावनादृढ होऊन शक्तीची जोपासना व वृद्धी करण्यासाठी बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन हा हमखास रामबाण उपाय आहे. म्हणून बारा अनुप्रेक्षा धर्मध्यान व शुक्लध्यानाच्या सिद्धीसाठी अत्यंत आवश्यक आहेत.

मोक्षप्राप्त जीवांना वंदन -

मोक्खंगया जे पुरिसा अणाइकालेण बारस अणुवेक्खं ।
परिभावउण सम्मं पणमामि पुणो पुणो तेसिं ॥ ८९ ॥

मोक्षंगता ये पुरुषा अनादिकालेन द्वादशानुप्रेक्षां ।
परिभाव्य सम्यक् प्रणमामि पुनः पुनस्तेभ्यः ॥ ८९ ॥

अन्वयार्थ - (अणाइकालेण जे पुरिसा बारस अणुवेक्खं सम्मं परिभावउण मोक्खं गया) अनादि काळापासून जे जीव या बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन सम्यक प्रकारे करून मोक्षास गेले आहेत(तेसिं पुणो पुणो पणमामि) त्यांना मी पुनः पुनः नमस्कार करतो.

भावार्थ - आतापर्यंत जे जीव मोक्षाला अनादिकाळापासून गेले आहे ते सर्व बारा भावनांचे चिंतवन करूनच गेलेले आहेत, बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन करणारेच जात आहेत व जातील ! हेच समयसारमध्ये भेदविज्ञानाचे महात्म्य सांगत असतांना आ. अमृतचंद्रानी सांगितलेले आहे -

भेदविज्ञानतः सिद्धा सिद्धा ये किल केचन ।
तस्यैवाभावतो बद्धा बद्धा हे किल केचन ॥ (समयसार कलश १३१)

अर्थ - जे कोणी सिद्ध झालेले आहेत ते खरोखरच भेदविज्ञानामुळेच झालेले आहेत. आणि जे कोणी संसारात कर्मांनी बद्ध झालेले आहेत, ते सर्व खरोखरच भेदविज्ञानाचा अभाव असल्यामुळेच बद्ध आहेत.

अशा सर्व सिद्ध पुरुषांना पुनः पुनः वंदन करण्याचा प्रशस्त भाव येणे स्वाभाविकच आहे. नियमसार मध्येही टीकाकार पद्मप्रभमलधारी देव कलशकाव्यात सांगतात -

इत्थं यः परमागमार्थमतुलं जानाति सद्दृक् स्वयं ।
सारासार-विचारचारुधिषणा वंदामहे तं वयम् ॥

नियमसार कलश ७२

अर्थ - याप्रमाण जो सम्यग्दृष्टी स्वयं अतुल, अनुपम अशा परमागमामध्ये प्रतिपादित अर्थाला जाणतो त्यास, सारासारविचार करण्यामध्ये ज्यांची बुद्धी निष्णात



आहे त्यांना आम्ही वंदन करतो.

येथे तर सम्यग्दृष्टीला वंदन केले आहे. मग सर्व सिद्धांना वंदन करण्याचा प्रशस्त भाव साधूना येणे स्वाभाविक आहे.

परमागमाचे सार हेच आहे की, आपल्या शुद्ध स्वरूपास जाणून त्यामध्ये लीन राहावे. जे आपल्या ज्ञानानंद स्वभावामध्ये लवलीन आहेत ते वंदनीय आहेत.

पुनः बारा अनुप्रेक्षांच्या चिंतवनाचे फळ सांगून त्याचे महत्व सांगतात -

किं पल्लविएण बहुणा, जे सिद्धा णरवरे गए काले ।
सिज्झिंजहिं जे वि भविया तं जाणह तस्स माहप्पं ॥ ९० ॥

किं प्रलपितेन बहुना, ये सिद्धा नरवरा गते काले ।
सेत्स्यन्ति येऽपि भविका तत्सर्वं जाणीहि तस्य माहात्म्यम् ॥ ९० ॥

अन्वयार्थ - (किं पल्लवियेण बहुणा) फार विस्तारपूर्वक सांगण्याने काय ?(गए काले जे णरवरा सिद्धा) भूतकालामध्ये जे मानवश्रेष्ठ सिद्ध झालेले आहेत(जे वि भविया झिज्झिजहिं) आणि जे भविष्यकाळी सिद्ध होतील(तं तस्स माहप्पं जाणीहि) ते सर्व त्या बारा अनुप्रेक्षांच्या चिंतवनाचे माहात्म्य आहे.

भावार्थ - तत्त्वतः तर सिद्धि म्हणजे काही ग्रहण व कांही सोडणे नव्हे. तर जो आपला लक्षणरूप स्वभाव आहे व होता त्याचीच तर नियतकाळी स्वयं अभिव्यक्ती मात्र झाली आहे. सिद्धिसाठी म्हणजे मोक्षासाठी न लिंग हवे, न वेष हवा. तो तर नियतीने प्राप्त संयोगमात्र आहे. मोक्ष हा तर जीवाच्याच सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राच्या एकाग्रतेनेच होतो. आजपावेतो जेवढे सिद्ध झालेत ते सर्वच रत्नत्रयाच्या एकाग्रतेमुळे त्यासच समाधि म्हणतात. व त्या एकाग्रतेची व समाधीची प्राप्ती होते त्याचे मूळ साक्षात कारण बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन हेच आहे. व जे सिद्ध होतील त्यांनाही बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन करावेच लागेल. साधू असो की साधु होण्याची लगन असणारे गृहस्थ असोत ! म्हणून आ. कुंदकुंद भावपाहुडमध्ये सांगतात -

भावइ अणुवेक्खाओ, अवरे पणवीस भावना भावि ।
भावरहिएण किं पुण बाहिरलिंगेण कायव्वं ॥ भावपाहुड गाथा९६

अर्थ - अनुप्रेक्षा सदैव भावा ! तसे आणखी दुसऱ्या पंचेवीस भावनाही भावा. भावरहित अशा बाह्य लिंगाने काय करावयाचे आहे ? भावलिंगाविना द्रव्यलिंग कार्यकारी नाही.

निज रूप निहार लखे जब ही, अंतर तम सत्वर धुल जाता ।
अपने मे होत मगन तब ही, संसार मोह सब गल जाता ॥

अर्थ - जेव्हा या जीवास आपल्या शुद्ध स्वरूपाच्या दर्शनाची प्राप्ती होते तेव्हा तात्काळ अंतरंग मिथ्यात्वाचा अंधःकार विलय पावतो; आपणामध्ये तो तेव्हा मग्न होतो आणि या संसारातील सर्व मोह (अज्ञान) व रागद्वेष वासना नष्ट होतात.

गाहा -

इदि णिच्छयववहारं जं भणियं कुंदकुंदमुणिणाहे ।
जो भावइ सुद्धमणो सो पावइ परमणिव्वाणं ॥ ९१ ॥ क्षेपक

इति निश्चयव्यवहारं यद्भणितं कुंदकुंदमुनिनाथेन ।
यो भावयति शुद्धमना, सो प्राप्नोति परमनिर्वाणम् ॥ ९१ ॥

अन्वयार्थ - (इदि कुंदकुंदमुणिणाहे जं णिच्छयववहारं भणियं)मुनिनाथ आ. कुंदकुंद देवांनी जे निश्चय - व्यवहाराचे प्रतिपादन केलेले आहे(जो सुद्धमणो भावई) जो शुद्धहृदयपूर्वक त्याची भावना करतो(सो परमणिव्वाणं पावइ)तो परम निर्वाणास प्राप्त करतो.

भावार्थ - आ. कुंदकुंददेवांनी या व अन्य प्रवचनसारादि ग्रंथामध्ये जे निश्चय आणि व्यवहाराचे प्रतिपादन केलेले आहे, ते समजून त्याची भावना करतो त्याचा मोक्षमार्ग प्रशस्त होतो व तो नियमाने मोक्ष प्राप्त करतो.

दंसणभट्टा भट्टा दंसणभट्टस्स णत्थि णिव्वाणं ।
सिज्झन्ति चरियभट्टा दंसणभट्टा ण सिज्झंति ॥ ९२ ॥ (प्रक्षिप्त)

दर्शनभ्रष्टा भ्रष्टा : दर्शनभ्रष्टस्य नास्ति निर्वाणं ।
सिध्यन्ति चरित्रभ्रष्टा दर्शनभ्रष्टा न सिध्यन्ति ॥ ९२ ॥

अन्वयार्थ - जो सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट आहे तो तर सर्व प्रकारेच भ्रष्ट आहे. कारण सम्यग्दर्शनापासून जो भ्रष्ट आहे त्यास निर्वाण प्राप्त होतच नाही. चारित्रापासून भ्रष्ट असेल तर तो (तो चारित्रामध्ये पुनः स्थापित होईल तर) सिद्ध होईल. परंतु जो दर्शनापासून भ्रष्ट आहे तो कधीच सिद्धी प्राप्त करणार नाही.

भावार्थ - आचार्यांनी सम्यग्दर्शनास धर्माचे मूळ म्हटले आहे. कारण

विद्यावृत्तस्य-संभूतिः स्थितिवृद्धिफलोदयाः ।
न सन्त्यसतिसम्यक्त्वे बीजाभावे तरोरिव ॥ ३२ ॥

रत्नकरंड श्रावकाचार श्लोक नं. ३१

अर्थ - सम्यक्त्व नसेल तर ज्ञान आणि चारित्राची उत्पत्ती, स्थिती, वाढ आणि फलप्राप्ती या चारही गोष्टी असत नाहीत. जसे बीजाचे अभावी वृक्षाची न उत्पत्ती आहे, न स्थिती आहे, न वाढ आहे, न फलप्राप्ती आहे. म्हणून येथे आ. कुंदकुंददेव



सांगतात की, जर जीव सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट होईल तर सम्यग्ज्ञान व चारित्राची संभावनाच नसल्याने तो सर्वतोपरी भ्रष्ट आहे. त्यामुळे त्यास निर्वाण-मुक्ती प्राप्त होऊंच शकत नाही. कारण तेथे तर रत्नत्रयाचाच-मोक्ष कारणाचाच अभाव आहे.

परंतु कदाचित जर तो सम्यग्दर्शनापासून भ्रष्ट झालेला नाही तथापि दुर्बलता वश जर तो चारित्रापासून भ्रष्ट असेल तर तो ज्ञानी परत आपणास चारित्रामध्ये स्थिर करू शकेल. कारण एक तर त्याची शुद्ध आत्म्याची श्रद्धा कायम असल्याने व चारित्राच्या पूर्णतेशिवाय मोक्ष होतच नाही, हे तथ्य तो समजून असतो, त्यामुळे तो पुनः आपणास चारित्रातच निश्चितच स्थापित करेल. हा जर चारित्राविना निर्वाण होतो अशीच भावना करत असेल तर तो सम्यग्दर्शनापासून निश्चितपणे भ्रष्टच असेल. म्हणून यथार्थ प्रतीती नष्ट न होता जर चारित्रामध्ये दुर्बलतेमुळे दोष लागेल तर तो दोषांचे निराकरण करून पुनः चारित्रसंपन्न होऊन निश्चितपणे निर्वाण प्राप्त करील. परंतु जर जीव श्रद्धेपासून भ्रष्ट होईल तर तो मोक्षमार्गापासून अत्यंत दूर राहील. त्यास कोणत्याही प्रकारे निर्वाण यतिधर्म असू शकणार नाही. जे राहील त्याचे मोल प्रेताच्या श्रृंगाराप्रमाणे आहे. म्हटलेच आहे की,

आप आप निहचै लखे, तत्त्वप्रतिति व्यौहार ।
जिह विन ज्ञान-चरित अफल, सम्यग्दर्श प्रधान ॥

अर्थ - जर आत्मा स्वयं आपल्या शुद्ध आत्म्यास जाणेल तर तत्त्वरुची व तदनुकुल व्यवहार प्राप्त करील. आत्मप्रतीति-भावना-विना ज्ञान आणि चारित्र निष्फळ आहे, म्हणून सम्यग्दर्शन प्रधान आहे.

●●●

| | गाथाक्रमांक | पृष्ठ |
|---|---|---|
| णिरया हवंति हेट्ठा | ३९ | ३७ |
| णिव्वेयतियं भावइ | ७८ | ७९ |
| द | | |
| दंसणभट्ठा भट्ठा | ९२ | ९० |
| दंसणवयसामाइय | ६९ | ७० |
| दुग्गंधं बीभच्छं | ४४ | ४२ |
| देहादो वदिरित्तो | ४७ | ४६ |
| प | | |
| पंचमहव्वयमणसा | ६२ | ६० |
| पंचविहे संसारे जार्ह | २४ | २३ |
| परमट्ठेण दु आदा | ७ | ६ |
| परसंतावयकारण वयणं | ७४ | ७६ |
| पारंपज्ञायेण दु | ५९ | ५६ |
| पुत्तकलत्तणिमित्तं अत्थं | ३० | २८ |
| पुव्वुत्तासवभेया | ६० | ५७ |

| | गाथाक्रमांक | पृष्ठ |
|---|---|---|
| ब | | |
| बंधप्पदेसगलणं णिज्ञरणं | ६६ | ६५ |
| बास्म अणुवेक्त्वाओ | ८७ | ८७ |
| भ | | |
| भत्तित्थि-राय-चोरकहाओ | ५३ | ५२ |
| म | | |
| मणिमंतोसहरक्खा | ८ | ६ |
| मम पुत्त मम भज्ञा | ३१ | २९ |
| मादापिदरसहोदर | २१ | २० |
| मिच्छत्तं अविरमणं | ४७ | ४६ |
| मिच्छोदयेण जीवो णिंदंतो | ३२ | ३० |
| मूलुत्तरपयडिओ मिच्छत्तादि | ८५ | ८४ |
| मोक्ख गया जे पुरिसा | ८९ | ८८ |
| मोत्तूण असुहभावं पुव्वुत्तं | ५४ | ५३ |
| मोत्तूण कुडिलभावं | ७३ | ७५ |